१० ऑक्टोबर २०१८

॥श्री॥

# श्वेताश्वतर उपनिषद

8 am

9 परमपूज्य आद्य शंकराचार्यांनी ज्या दहा उपनिषदांवर भाष्य केले आहे त्यात या उपनिषदाचा उल्लेख नाही.

10

ईश केन कठ प्रश्न मुण्ड माण्डूक्य तित्तिरिः।
ऐतरेयं च छान्दोग्यं बृहदारण्यमेव च॥

11 परन्तु तरीही हे अत्यंत महत्वाचे उपनिषद आहे. वेदातील संहितेबरोबर यातील मंत्रांचे पठण केले जाते. त्यामुळे याला 'मंत्रोपनिषद' असेही म्हणतात. तसेच म. व्यासांनी ब्रह्मसूत्रामध्ये देखील यातील वचनांचा विचार केलेला दिसतो.

कृष्णयजुर्वेदामध्ये जसे कठोपनिषद आहे, तसेच तैत्तिरीय उपनिषद आहे. त्याचप्रमाणे हे उपनिषद सुद्धा यजुर्वेदाच्या कृष्ण शाखेचे आहे. ही तीनही उपनिषदे अतिशय महत्वाची व विद्वानांच्या आवडीची आहेत.

मात्र या उपनिषदात थोडा विस्कळितपणा आहे. मंत्रांची तर्कशुद्ध संगती यात आढळत नसली तरी एक सूत्र मात्र निश्चित आहे. यात सहा अध्याय आहेत. एकूण ११३ मंत्र आहेत.
[१६ + १७ + २१ + २२ + १४ + २३]

(१६)

(१) प्रथम अध्याय - विद्वानांच्या सभेत सृष्टीच्या उत्पत्ती-विषयी प्रश्न निघाला. या दृश्य जगाचे निश्चित कारण काय? त्याचा आधार कोणता? शेवट कशामध्ये?

यावर प्रत्येकाने आपापले मत मांडले. कोणाच्या मते काल हे कारण आहे. कुणी नियति, कुणी स्वभाव, कुणी पंचमहाभूते, कुणी यदृच्छा अशी कारणे सांगितली परंतु यापैकी काहीही स्वयंभू नाही. तर ही सर्व निर्मित आहेत तेव्हा ऋषींनी ध्यान लावले. त्यात त्यांना जे दर्शन झाले त्याचे वर्णन या प्रथमाध्यायात केले आहे. परमात्मा अव्यक्त आहे.



© www.madhavraghuveer.com

June 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |

(१६)
8 am ② द्वितीयाध्याय - त्या परमात्म्याच्या प्राप्तिसाठी
ओंकाराची उपासना करावी. ध्यान करावे. ध्यानासाठी
9 उपयुक्त स्थान, भूमी, आसन, प्राणायाम सांगितले आहे
तसेच या मार्गात प्रगती होत आहे किंवा नाही हे
10 आजमावण्यासाठी काही लक्षणे सांगितली आहेत. त्या
परमपदापर्यंत पोहोचल्यावर वाटणारी धन्यता यात वर्णिली आहे.

11 (२१)
③ तृतीय अध्याय - सर्व सृष्टीचा निर्माता, पालनकर्ता,
12 संहारकर्ता अशा परमात्म्याला जाणणे म्हणजे सर्वच
जाणल्याप्रमाणे आहे. हे जाणल्याने अमृतत्वाची प्राप्ती होते.
1 pm सर्वत्र तोच भरून राहिला आहे. तो सर्वश्रेष्ठ तत्त्व आहे.
तो अणोरणीयान् महतो महीयान् असा आहे. त्या सर्वांना
2 शक्ती पुरविणाऱ्या सर्वेश्वराची यात स्तुती केली आहे.

(२२)
3 ④ चतुर्थ अध्याय - परा व अपरा प्रकृतिवर त्याचेच नियंत्रण
आहे. त्यानेच आम्हाला शुभ बुद्धी द्यावी. त्याच्यावर श्रद्धा
4 ठेवावी, त्याला शरण गेले तर तो भयापासून रक्षण करतो
आणि ज्ञानापर्यंत पोहोचण्यासाठी सहाय्यकारी होतो.

5 (१४)
⑤ पंचम अध्याय - विद्या म्हणजे काय? अविद्या म्हणजे काय?
6 क्षर व अक्षर यांच्यापलीकडे तो आहे. क्षर हे भोग्य
आहे तर अक्षर हे भोक्ता आहे. या सर्वांवर त्या
7 परमेश्वराचे नियंत्रण आहे. त्याला जाणून घेतले, त्याला
शरण गेले तर विविध योनींमधून भटकणे थांबते.

(२३)
⑥ षष्ठाध्याय: - समारोपामध्ये मूळकारण, समर्पणभाव
उपासना, ध्यान, नियंता याविषयी मार्गदर्शन आहे. मृगांदी
आपल्यामध्ये असून तो सापडत नाही. त्यासाठी मार्ग कोणता?
Birthday / Anniversary परमात्म्याबद्दल गुरुविषयी श्रद्धा हाच उपाय आहे.

© www.madhavaguruveer.com

या उपनिषदाचे द्रष्टे आहेत, श्वेत नावाचे ऋषी! या ब्राह्मणकुमाराचे पालनपोषण कुण्या श्रेष्ठ महात्म्याने अत्यंत वात्सल्याने केले होते. त्या शुद्ध सात्विक अशा वातावरणात या श्वेताच्या बुध्दीचा व ग्रहणशक्तीचा उत्तम विकास झाला. त्याने आपल्या पालक पित्याकडून विद्या प्राप्त केली. आणि जे अध्ययन केले त्याविषयी किंवा भोवतालच्या घटना, प्रसंग माणसांबद्दलही तो सखोल चिंतन करत असे. हे करत असताना आपल्यातले दोष, अवगुण तो दूर करत असे. स्वत:ला घडवत असे. अशी त्याने अनेक शास्त्रे अभ्यासली. ग्रंथ वाचले.

योग्य वेळी त्याने गृहस्थाश्रमही स्वीकारला. यातही अर्थ कामामध्ये तो शुचिता पाळत असे. प्रपंचातील कर्तव्ये चोख बजावत असताना तो सतत प्रसन्न दिसायचा. त्याच्या विचारानुसार त्यागाचा हट्ट नसावा. भोगाची लालसा नसावी. आपण होऊन व्याप वाढवू नये. परंतु येणाऱ्याचा कंटाळाही करू नये. आपल्या गुणांचा डंका वाजवू नये. तसेच आपले दोषही लपवू नये. दंभापासून दूर रहावे. निंदास्तुतीमध्ये अडकू नये. मात्र दुसऱ्यांच्या गुणांचे जरूर कौतुक करावे. दोष दिसले तर तटस्थ रहावे. सतत ईश्वरस्मरण असावे.

या अत्यंत शुद्ध आचरणामुळे त्याच्या विचारांमध्ये सहजता आली. विवेक आणि संयम हा त्याचा स्थायीभाव झाला. बऱ्याचदा तो एकांतात रहात असला तरी त्याने लोकांना कधी टाळले नाही. उलट सर्वांच्या प्रश्नांना तो समाधानकारक उत्तरे देत असे. या सर्व गोष्टींमुळे अनेक शुभ गोष्टी घडू लागल्या. चित्त शुद्ध होत गेले. श्रद्धा भक्तीमध्ये वृद्धी झाली. सद्गुरूंची कृपा होतीच आता अहंता क्षीण झाली तसतसा ज्ञानाचा उदय झाला.

©www.madhaveeraghuveer.com

११ ऑक्टोबर २०१८

प्रथमोऽध्यायः।

8 am
हरिः ॐ ब्रह्मवादिनो वदन्ति — — प्रश्न
किं कारणं ब्रह्म कुतः स्म जाता।
9
जीवाम केन क्व च सम्प्रतिष्ठाः।
अधिष्ठिताः केन सुखेतरेषु
10
वर्तामहे ब्रह्मविदो व्यवस्थाम् ॥१॥

11
आतापर्यंतच्या उपनिषदांची सुरुवात ॐ ने झाली होती. मात्र हे उपनिषद हरिः ओम ने आरंभ होते. हरि म्हणजे
12
हरण करणारा. जगताच्या भासाचे हरण करून त्याचे खरे स्वरूप दाखवणारा किंवा अज्ञानाचे हरण करणारा हा आहे.
1 pm
किंवा 'मी' चे हरण करून अद्वैत प्रचीतिला आणून देणारा।
संत साहित्यामध्ये हरिः ओम म्हणताना हा हरी
2
'केवल ब्रह्म' म्हणून समजला जातो. ॐ या ध्वनिच्या पूर्वी जो अस्तित्वात होता — तो अज, अनन्त, निर्गुण, निराकार इ० आहे तो 'हरी'।
इथे अनेक विद्वान, ऋषी-मुनी यांची ब्रह्माविषयी,
4
त्याच्या प्राप्तिविषयी चर्चा सुरु आहे. त्यातून विचार स्पष्ट होत जातात. न्यून असेल तर त्यावर मार्ग निघतो. एखाद्या
5
मतावर सर्वांगीण विचार केला जातो. अशा चर्चेला प्रारंभ झाला असता त्यात प्रश्न-प्रतिप्रश्न केले गेले —
6
या जगाचे कारण काय? जे दिसते आहे ते कशाने बनले आहे? याचा कच्चा माल कुठला? या सर्व प्रश्नांचे
7
उत्तर एकच! ते म्हणजे ब्रह्म!
ऐतरेय (१.१.१) मध्ये म्हटले आहे.
इदम् अग्रे एक आत्मा वै आसीत्।
या सृष्टीनिर्मितीपूर्वी केवळ एक आत्माच अस्तित्वात होता. त्याव्यतिरिक्त काहीही नव्हते. त्यामुळे त्यापासूनच या जगाची निर्मिती झाली असणार.



© www.madhaveeradhuveer.com

१२ ऑक्टोबर २०१२

ब्रह्म हे जगाचे उपादानकारण किंवा समवायकारण तर आहेच शिवाय निमित्तकारण (चेतन) आहे.

१. जगतः कारणं ब्रह्म किम्?
या जगाचे कारण असलेल्या ब्रह्माचे स्वरूप काय?
प्र. जगतः कारणं किम्? उ. ब्रह्म

२. वयं कुतः जाता स्म? वयं – जीव/मानव
आपण कुणापासून उत्पन्न झालो

३. केन जीवामः?
कुणामुळे आम्ही जिवंत राहतो? सजीव स्थिति कुणामुळे टिकून राहते?

४. क्व च सम्प्रतिष्ठा?
विलीन झाल्यावर आम्ही कुणामध्ये सामावून राहतो? म्हणजेच आमचा लय कशामध्ये होतो?

५. सुखेतरेषु केन अधिष्ठिताः वर्तामहे?
सुखदुःखांच्या अनिमितेच्या भोग कुणाच्या द्वारे प्रेरित होऊन आम्ही घेतो? आचरण करतो? ही व्यवस्था कुणाची?

६. कुणाही विचारवंताला असे प्रश्न पडायला हवेत.
सृष्टीमध्ये जड व चेतन असे दोन भाग स्पष्ट दिसतात.
जड – वायु, द्रव, घन
चेतन – अंडज, जारज, स्वेदज, उद्भिज
त्यातही बाल्य, यौवन, जरा या अवस्था निरंतर येत असतात. त्यामागचा प्रेरक कोण? कोणत्या उद्देशाने हा सर्व पसारा घातला आहे. या विश्वाची गती, स्थिती अंत कुठे आहे? अंतिम गंतव्य स्थान कोणते? आम्ही स्वाधीन की पराधीन?



© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

उत्तरे

काल: स्वभावो नियतिर्यदृच्छा
भूतानि योनि: पुरुष इति चिन्त्या।
संयोग एषां नत्वात्मभावात्
आत्माप्यनीश: सुखदु:खहेतो: ॥२॥

आता प्रत्येकजण आपापले मत मांडू लागला------

**काळ** वस्तू किंवा प्राणी कुठल्यातरी वेळी जन्मतो, अस्तित्वात येतो व कुठल्यातरी वेळी मरतो, नष्ट होतो. सृष्टीची उत्पत्ति ही कधीतरी काळी झाली, तसेच प्रलयही कधी काळी होईल. उत्पत्ति, स्थिती व लय हे काळातच होतात. तेव्हा काळच हेच सृष्टीचे कारण आहे.

सार्‍या घटना काळामुळेच होतात. काळच आम्हाला जन्माला घालतो, वाढवतो, परत नेतो. प्रत्येक लहान मोठ्या घटनेशी काळच जोडलेला आहे.

पण काळाला स्वतंत्र अस्तित्व नाही. तो कशावर तरी अवलंबून आहे. सूर्यामुळे दिवसरात्र होते. काळाचे विभाग आहेत कला — विकला — काष्ठा — क्षण — विपल — दण्ड — घटि — मुहूर्त — प्रहर — दिवस — रात्र — सप्ताह — पक्ष — मास — अयन — संवत्सर। त्यामुळे काळ हा सृष्टीचे कारण असू शकत नाही यावर दुसरा म्हणाला.

**स्वभाव** — सृष्टी स्वभावत:च प्रकट झाली. त्या त्या वस्तूच्या ठिकाणी ते ते बीज असते. त्यातून पुढील विस्तार होतो. आंब्याच्या कोयीतून आंब्याचे झाड जन्मते पाणी वाहून जाते. बर्फ गार असतो आणि दाहक असतो. हे सारे ~~व्यवहार~~ स्वभावच त्या व्यवहाराच्या मुळाशी आहेत

**नियती** म्हणजे दैव। किंवा नियति म्हणजे नियुक्ती

सर्वामागची सूत्रे नियतीच हलवत असते. नियतीपुढे कुणाचेही काहीही चालत नाही, नियतीपुढे विनकाही टिकत नाही. प्रत्येक गोष्टीच्या मागे नियती असली तरी ती आपले आपण काम करत नाही दुसरा कुणीतरी हवा. ∴ नियती हे कारण नाही.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am **यदृच्छा** म्हणजे काही कारण नसताना घडलेली गोष्ट किंवा
भगवद् इच्छेने झालेली, सहज, नैसर्गिक.
9 **पंचमहाभूते** त्यांना देखील कुणीतरी निर्माण केले आहे
त्यामुळे ते मूळ कारण असू शकत नाही.
10 **योनि** म्हणजे कारण. किंवा प्रकृति. परंतु प्रकृति जड आहे
ती स्वत: काहीच करु शकत नाही. पुरुषाकडून
11 प्रेरित होऊन ती कार्य करत असते.
**चेतन पुरुष** हे कारण असेल का? परंतु तो तर उदासीन
12 आहे, अकर्ता आहे. तो निर्मितीच्या फंदात
पडणारच नाही.
मग या सर्वांच्या संयोगाने सृष्टी निर्माण झाली
1 pm असेल. परंतु त्यांना एकत्र कोणी आणले?
मग आत्मभाव (जीव) हे कारण असेल का? परंतु
2 जीव तर परवश-अनीश असतो. तो स्वत:साठी काही
3 ठरवू शकत नाही तर तो सृष्टीची निर्मिती कसा करणार? य
तिचे नियम कोण आखणार? त्यात बौद्धिक वा अन्य
4 कसलीच क्षमता नाही.
यावरून अंतिम निर्णय काहीच झाला नाही.

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveraghuveer.com

१४ ऑक्टो. २०१८

8 am ते ध्यानयोगानुगता अपश्यन
देवात्मशक्तिं स्वगुणैर्निगूढाम् ।
9 यः कारणानि निखिलानि तानि
कालात्मयुक्तान्यधितिष्ठत्येकः ॥३॥

10 ध्यान करणे म्हणजे इतर सर्व विषय बाहेर काढून मन
11 केवळ एकाच विषयावर केंद्रित करणे. प्रत्येकाच्या
मतानुसार जी कारणे समोर आली ती मूळ कारण
12 नाहीत असा निर्णय जेव्हा झाला तेव्हा आता नेमके
मूळ कारण काय असेल याचा शोध घेण्यासाठी----
1 pm त्या सर्वांनी ध्यान केले. तेव्हा त्यांच्या लक्षात आले
की परमात्मदेवाची शक्तीचे या सर्वांवर नियंत्रण आहे.
2 जिच्या ताब्यात या सर्व गोष्टी आहेत तीच मूळ कारण
असणार. थोडक्यात परमात्मदेवच या सर्वांचे मूळ कारण आहे.
यः एकः तानि निखिलानि कालात्मयुक्तानि कारणानि अधितिष्ठति।
3 ध्यानयोगानुगता - ध्यानात्मक (एकाग्र) पद्धतीने रचनात्मक
4 (निषेधात्मक नव्हे) ब्रह्माचे चिंतन करते असता वृत्ती ब्रह्माकार
होते. ज्याचे चिंतन करावे वृत्ती तशी तदाकार होते.
5 देवात्मशक्ती - देव + आत्मा + शक्ती
जगदीश जीव जगत्
6 हे तिन्ही ज्या वस्तूवर भासमान होतात ती सद्वस्तू - परब्रह्म
स्वतःच्या ठिकाणी या तीन गोष्टींचा भास निर्माण
7 करण्याची परमात्म्याची जी शक्ती ती माया!
ही मायाशक्ती कशी आहे?
निःसत्त्वा - परमात्म्याच्या दृष्टीने ती काहीच नाही
कार्यगम्या - त्या अदृश्य शक्तीला तिच्या कार्यावरून ओळखता येते
ज्ञाननिवर्त्या - ज्ञानाने ती निवृत्त होते
अनादि - प्रारंभ सांगता येत नाही.
Birthday / Anniversary अनिर्वचनीया - तिचे वर्णन करता येत नाही.

Short (Rapid)

तमेकनेमिं त्रिवृतं षोडशान्तं
शतार्धारं विंशतिप्रत्यराभिः ।
अष्टकैः षड्भिर्विश्वरूपैकपाशं
त्रिमार्गभेदं द्विनिमित्तैकमोहम् ॥४॥

ध्यानामुळे तरल अवस्था प्राप्त होते. त्यात सूक्ष्म दर्शने घडतात. ऋषींना ध्यानावस्थेमध्ये परमात्म्याच्या अचिंत्य-शक्तीचे दर्शन घडले. ते असे ----

विश्व जणू काही एक प्रचंड चक्र आहे. या संपूर्ण चक्राला वेढून असणारी एक नेमि (धाव) आहे. ती याला एकत्र ठेवते. कोणत्याही चक्राच्या मध्यभागी एक तुंबा वा नाभि असते. त्यातून अनेक आरे निघतात. मोठा परीघ असेल तर प्रतिआरे असतात. त्या आऱ्यांच्या भोवती लाकडी वेटोळा असते व ते लाकूड लवकर झिजू नये म्हणून लोखंडी धाव असते

विश्वचक्राच्या रूपकामध्ये
तुंबा / नाभि म्हणजे अज्ञान आहे
दोन निमित्ते - पापपुण्य (यामुळेच जन्म घ्यावा लागतो.)
या चाकाचे तीन मार्ग - आधिभौतिक, अधिदैविक, आध्यात्मिक
देहपतनानंतर " " - देवयान, पितृयान, अधोगती
लाकडाचे तीन घेरे - त्रिगुण
षोडशान्त - सोळा टोके - सूक्ष्म अष्टधा प्रकृति व स्थूल अष्टधा
विंशति २० आरे - दहा इंद्रिये, पंचविषय, पंचप्राण
या आऱ्यांना शोभिवंत करण्यासाठी फीत, [illegible], [illegible]
ती सहा अष्टके - (१) अष्टधा प्रकृति (२) सप्तधातू, त्वचा [illegible]
(३) जाणीव - पंचज्ञानेंद्रिय, मन, बुद्धी, अहंकार (४) देवयोनींचे अष्टक
(५) षड्गुण - ऐश्वर्य, वैराग्य, ज्ञान, बल, यश, श्री, धर्म
(६) अष्टमहासिद्धी -

© www.madhaveeraghuveer.com

August 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

*Priority*

FRI JUL 2 2010

Wk 26, 183-182

१. पंचमहाभूते + मन + बुद्धी + अहंकार — अष्टधा प्रकृति
२. सप्तधातु - अस्थि मांस मज्जा रक्त रस वीर्य त्वचा मेद
३. [illegible] - चक्षु श्रोत्र घ्राण रसना, त्वचा, मन, बुद्धी, अहंकार
४. देवयोनी - ब्रह्मा, प्रजापति, देव, गंधर्व, यक्ष, राक्षस, पितृगण, पिशाच
५. गुणाष्टक - दया, क्षमा, शौच, अनसूय, अनायास, अकृपण, अस्पृह, मंगल
६. अष्टसिद्धी - अणिमा, लघिमा, महिमा, गरिमा, प्राप्ति, प्राकाम्य, वशित्व, ईशित्व

पञ्चस्रोतोऽम्बुं पञ्चयोन्युग्रवक्रां
पञ्चप्राणोर्मिं पञ्चबुद्ध्यादिमूलम् ।
पञ्चावर्तां पञ्चदुःखौघवेगां
पञ्चाशत् भेदां पञ्चपर्वामधीमः ॥५॥

मागच्या ४ थ्या मंत्रात चक्राच्या रूपात हे ब्रह्मांड दिसले. आता त्याला नदीची उपमा दिली आहे. दिसायला जरी एकच सलग नदी दिसत असली तरी क्षणाक्षणाला नदी बदलत असते. तिच्यातील पाणी सतत नवीन असते. जग तसेच आहे.

ह्या पाच ज्ञानेंद्रियांमुळे हे जग जाणवते ती ज्ञानेंद्रिये म्हणजे (चक्षु, श्रोत्र, घ्राण, त्वचा व जीभ) पाच स्रोत आहेत. ही ज्ञानेंद्रिय पाच सूक्ष्मभूतांपासून निर्माण झाली आहेत म्हणून ही सरिता पाच उद्गमस्थान असलेली पंचयोनी आहे. पण तिचा प्रवाह मोठा, जोराचा आहे म्हणून ती उग्रवक्रा आहे. वाकडा तिकडा प्रवाह म्हणजे प्रपंचातील गुंतागुंत आहे. उर्मी म्हणजे लाटा म्हणजेच हालचाल।

पाण्यातील लाटांमुळे हालचाल होते तर शरीरातील वायुमुळे हालचाल होते म्हणजेच पाच प्राणांच्या लाटा या नदीवर उठतात.

पाच प्रकारचे ज्ञान मनात होते. पंचज्ञानेंद्रिये केवळ माहिती आत घेतात. त्यावर मन विचार करते. निर्णय घेते

Birthday / Anniversary

© www.madhaveeragiveer.com

Priority

July 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

8 am म्हणून सर्व सुखदु:खांचे किंवा विश्वाभासाचे कारण मन हेच आहे. या नदीतील भोवरे माणसाला खेचून घेतात,
9 आकर्षित करतात. पंचविषय हे पाच भोवरे आहेत. एखादा भोवऱ्यात अडकला तर माणूस बाहेर निघणे कठीण असते,
10 विषयांचे तसेच आहे.

या नदीत पाच प्रकारच्या दुःखांचे वेग आहेत.
11 जन्म मृत्यु जरा व्याधि दुःख दोषानुदर्शनम् ।
प्रसूतिकाळ मरण म्हातारपण रोग गर्भवास ही दुःखे त्रास देतात.
12 पाच प्रकारचे क्लेश हे पाच पर्व आहेत.
अविद्या — अज्ञान
1 pm अस्मिता - अहंकार
राग — प्रेम / अनुकूल वृत्ती
2 द्वेष — प्रेम नसणे / प्रतिकूल वृत्ती
मृत्यु - मरणाची भीती / अभिनिवेश
3 पंचाशत - ५० प्रकारच्या वृत्ती अंतःकरणात उठतात.
षट्चक्रांच्या दलांची एकत्रित संख्या ५० आहे.
4 मूलाधार - ४ पाकळ्या | स्वाधिष्ठान - ६ | मणिपूर - १०
अनाहत - १२ " | विशुद्ध - १६ | आज्ञाचक्र - २
5 प्रत्येक दलाचा एक एक वर्ण आहे. अ पासून क्ष पर्यंत ५० वर्ण आहेत. प्रत्येक वर्णाची एक याप्रमाणे ५० मनोवृत्ती आहेत.
6 श्री. वरदानंद - पाच कोश - अन्न, प्राण, मनो, विज्ञान, आनंदमय
थोडक्यात काय तर दृश्य पसारा हा संपणारा आहे मात्र
7 त्यातील चैतन्य हे शाश्वत / टिकणारे आहे.
ही मायानदी सुद्धा शाश्वत नाही पण ती वाटते कारण त्यामागची सत्ता / तत्त्व शाश्वत आहे.



© www.madhavveeraghuweer.com

१६ ऑक्टोबर २०१८

8 am सर्वाजीवे सर्वसंस्थे बृहन्ते
अस्मिन् हंसो भ्राम्यते ब्रह्मचक्रे ।
9 पृथगात्मानं प्रेरितारं च मत्वा
जुष्टस्ततस्तेनामृतत्वमेति ॥६॥

10

Chosen सर्व भूतांना उत्पन्न करणाऱ्या, जगवणाऱ्या, सर्वांचे
11 आश्रयस्थान असलेल्या, आकाराने बृहत् असलेल्या या ब्रह्मचक्रामध्ये हंसः म्हणजे जीव फिरत राहतो. का?
12 तर प्रेरक परमात्म्यापासून तो स्वतःला भिन्न समजतो म्हणून! पण तेच परमात्म्याच्या कृपेने जर दोघे भिन्न
1 pm नसून एकच आहे असे वाटले तर तो अमृतत्व प्राप्त करतो.

या संसारबंधनात पडण्याचे कारण व त्यातून
2 सुटण्याचा उपाय या मंत्रात सांगितला आहे.

केवल ब्रह्म हे एकमेवाद्वितीय आहे त्याला
3 जेव्हा अनेक रूपे घेण्याची इच्छा झाली तेव्हा त्याची क्रियाशक्ती जागृत झाली व ते थोडे खालच्या पायरीवर
4 आले म्हणजे [illegible] झाले. यालाच ब्रह्मचक्र, मायाचक्र, संसारचक्र अशी नावे आहेत.

5 सर्व जीवांना जन्म देणारे, जिवंत ठेवणारे आणि नाश करणारे हे मायाचक्र आहे ही त्याची लीला आहे. या
6 महान विश्वात हा जीव भटकत राहतो. या योनीतून त्या योनीत भटकणाऱ्या जीवाला हंस म्हटले आहे.

7 हन् - मारणे, हत्या करणे या अर्थाबरोबरच त्याचा गतिवाचक अर्थही आहे. जीवाच्या ठिकाणी सत् चित् आनंद किंवा अस्ति भाति प्रिय हे ब्रह्माचे गुण असतातच परंतु मायामुळे नाव व रूप मिळताच तो आपले खरे रूप विसरून जातो.

अंतःकरणातील (चैतन्य) वृत्तीशी एकरूप झाले की त्यालाच (शरीर, मन, बुद्धी) तो सर्वस्व मानू लागतो त्यालाच 'मी' समजू लागतो.

Birthday - Anniversary

©www.mauliveeraghu...com

जगदीशाचाच अंश असून जीव स्वतःला त्यापासून
वेगळे मानू लागतो आणि त्यामुळे पुन्हापुन्हा या संसार
चक्रात अडकतो

चक्रात अडकण्याचे कारण समजले की खरे तर
उपाय सापडायला हवा. माझे खरे स्वरूप चैतन्य आहे.
मी म्हणजे शरीर नव्हे. शरीर हे केवळ वस्त्र आहे हे
मनोमन पटले की तो वेगळेपणाने उरत नाही. विश्वाचा
निर्माता होतो.

स्वामी विद्यारण्य— गायत्री उपासना— वरदान— मीच परमात्मा
स्वरूप ज्ञान झाल्यावर परमात्म्याशी एकरूपता साधते
ब्रह्मविद् ब्रह्म एव भवति। कठोपनिषद - नायमात्मा -----
चित्तशुद्धी होऊन आपली पात्रता वाढवली की आत्मा
प्रसन्न होऊन दर्शन देतो. जुष्टः अमृतत्वम् एति।
जुष्टः — स्वीकृत झालेला, पात्र, निवडलेला
असा अमर झालेला पुन्हा जन्म घेत नाही ∴ मरतही नाही.
जन्माबरोबर मृत्यु येतोच. | जीवासंगे जन्मे मृत्यु जोडे
जातस्य हि ध्रुवो मृत्यु | जन्मजात | राज्यत्याग काननयात्रा सर्व कर्मजात

उद्गीतमेतत् परमं तु ब्रह्म
तस्मिंस्त्रयं सुप्रतिष्ठाक्षरं च।
अत्रान्तरं ब्रह्मविदो विदित्वा
लीना ब्रह्मणि तत्परा योनिमुक्ताः ॥७॥

ज्याच्या माहिम्याचे, श्रेष्ठतेचे वर्णन वेदांनी गायलेले
आहे ते हे परब्रह्म सर्वांचा आश्रय आहे. त्यातच
तीनही (स्वर्ग, पृथ्वी, पाताळ) स्थित आहेत. त्यांना कुठेही
विनाश नाही. ब्रह्म जाणणारे ब्रह्मविद त्याला आपल्या
हृदयातच अनुभवतात. व त्याचा आनंद घेतात ते
तत्परायण होतात. ब्रह्मात विलीन होतात. ब्रह्मरूप होतात.



© www.madhaveeraghuveer.com

इथे नुसते त्रयम् म्हटले आहे. शंकराचार्यांच्या मते ते तीन म्हणजे भोक्ता, भोग्य व नियंता असे आहेत.

परंतु जे काही आहे त्याचे अधिष्ठान ब्रह्मच आहे, प्रपंच हा अध्यास आहे. मूळ आहे ते ब्रह्मच आहे.

ब्रह्माशिवाय प्रपंच नाही पण
प्रपंचाशिवाय ब्रह्म असू शकते

त्रय (तीन) मध्ये काय काय समाविष्ट असू शकते?

प्रणव — अकार – उकार – मकार
ब्रह्मा — विष्णु — महेश
विराट – हिरण्यगर्भ – ईश्वर
अवस्था — जागृती — स्वप्न — सुषुप्ती
लोक — स्वर्ग — पृथ्वी — पाताळ
त्रिपुटी — ध्याता – ध्यान – ध्येय
विश्व – तैजस – प्राज्ञ
त्रिगुण — सत्व — रज — तम

या सर्व भेदांचे अधिष्ठान ब्रह्मच आहे. ब्रह्म या सर्वांत आहे व त्याहून वेगळेही आहे.

परमात्मा देश, काल, वस्तु यांनी परिच्छिन्न नाही. तो विभागल्यासारखा वाटतो पण भिन्न नाही.

त्याचा अनुभव आला की तो सर्वत्र घनदाट भरला आहे हे समजते. मी त्याहून वेगळा नाही. तत्परायण आहे म्हणजे ब्रह्मच आहे. माझे चालणे, बोलणे, बसणे उठणे सर्व ब्रह्मामध्येच आहे हे समजते तो जीवन्मुक्त होतो.

हेच जीवनाचे ध्येय, हीच अंतिम पराकाष्ठा हाच ब्रह्मानंद आहे. हेच अमरत्व प्राप्त करणे आहे.

©www.madhaveeraghuveer.com

२० ऑक्टोबर २०१८

संयुक्तमेतत्क्षरमक्षरं च
व्यक्ताव्यक्तं भरते विश्वमीशः।
अनीशश्चात्मा बध्यते भोक्तृभावात्
ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः॥८॥

अपरा व परा प्रकृतीच्या संयोगाने बनलेल्या व्यक्त व अव्यक्त, स्थूल व सूक्ष्म जगाचे भरण पोषण ईश्वरच करतो. तोच ईश सर्वांचे सुयोग्य संचालन, नियंत्रण करतो. परंतु परतंत्र (अनीश) जीवात्मा हा स्वतःला विषयांचा भोक्ता समजत असल्यामुळे बंधनात अडकतो. तो विषयांकडे लक्ष देत असतो, परमात्म्याकडे नाही. पण जेव्हा तो त्या परमेश्वराला जाणतो तेव्हा सर्व पाशांतून मुक्त होतो. तो म्हणजे मी हा अनुभव आला की बंधन उरत नाही.

क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते॥१५-१६॥
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः॥१५-१७॥
सर्व भूतमात्रांची शरीरे ही नाशिवंत, क्षर आहेत. त्यात असणारा जीवात्मा हा अक्षर किंवा कूटस्थ म्हणून ओळखला जातो. हीच ईश्वराची मायाशक्ती आहे परंतु परमात्मा दोघांहून भिन्न व उत्कृष्ट आहे. तोच सर्वांमध्ये प्रविष्ट होऊन तीनही लोकांना धारण करतो.

जीव स्वतःला भोक्ता मानतो त्यामुळे तो विविध भोगांच्या मागे धावण्यात स्वतःला धन्य समजतो. ही भोगांची इच्छाच त्याचे बंधन ठरते. ईश्वर या बद्धजीवाला, त्याच्या इच्छेला, आसक्तीला नियंत्रित करतो. आठ प्रकारचे पाश मनुष्याला बांधतात. खरे तर कुणीच आम्हाला बांधले नाही! मानतो म्हणून बंधन आहे! मनामुळेच बद्ध.

घृणा शंका भयं लज्जा जुगुप्सा इति पंचमी।
कुलं शीलं च वित्तं च अष्टपाशाः प्रकीर्तिताः॥

Birthday / Anniversary

उंट - व्यापारी - बंधन

August 2010 | Priority | THU JUL 8 2010 | Wk 27, 189-176

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

8 am
ज्ञाज्ञौ द्वावजावीशनीशा
वजा ह्येका भोक्तृभोग्यार्थयुक्ता।
अनन्तश्चात्मा विश्वरूपो ह्यकर्ता
त्रयं यदा विन्दते ब्रह्ममेतत् ॥९॥

न + अज । ईश + अनीश । द्वौ एव अजौ
ज्ञ असलेला ईश्वर व अज्ञ असलेला जीव.
ईशन करणारा (नियंत्रण) ईश्वर व नियंत्रणात असणारा,
परवश असणारा जीव हे दोघेही अज आहेत, ज्यांना
जन्म नाही असे आहेत. वस्तुतः अज हे ब्रह्माचे विशेषण
आहे पण परमात्माच जीव व जगत् रूपाने भासतो,
ही दोन्ही त्याचेच रूपे आहेत.

| जीव | ब्रह्म |
|---|---|
| स्वतःच्या शरीरावरही सत्ता नाही | सर्व जगावर नियंत्रण |
| अल्पेश्वर | ईश्वर (शास्ता) |
| अनाप्तकाम | आप्तकाम |
| एका शरीरात राहतो | अनंत शरीरांचा स्वामी |
| अविद्यामायेची उपाधी | (~~…~~) (विद्यामायेची) उपाधी |

एकच अज ब्रह्म नामरूपामुळे, उपाधि भेदामुळे दोन
वाटतात. एकदा उपाधि दूर सारली की सर्वत्र अस्ति - भाति -
प्रिय म्हणजेच सत् - चित् आनंद रूपाने ब्रह्मच आहे.
माया अनेक भोग्य वस्तु समोर ठेवते व जीवात्मा
स्वतःला भोक्ता समजू लागतो. ही अजा म्हणजे
जन्माला न आलेली माया मुळात अस्तित्वातच नाही.
तरीही जीवात्म्याला बांधून ठेवते.
एक परब्रह्मच खरे बाकी सारे भास आहेत.
" " सत् " " असत् "
जीव माया व ईश्वर हे सर्व भासच आहेत.

Birthday / Anniversary

©www.madhaveeragupte.com

9 FRI JUL 2010

Wk 27, 190-175

Priority

July 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

२४ ऑक्टोबर २०१८

# — आत्मा —

(१) सर्वं आप्नोति, व्याप्नोति, समाप्नोति - सर्वात व्याप्त असणारा, सर्वांना व्यापून असणारा.

(२) आदत्ते इति आत्मा - सर्वांना ग्रहण करणारा, सर्वात असणारा, विलीन करणारा.

(३) अतति इति आत्मा - सर्वत्र पसरलेला, विद्यमान असणारा, सीमा नसणारा.

(४) अत्ति इति आत्मा - सर्वांना खाणारा, आपल्यात सामावून घेणारा.

हा अकर्ता आहे. तो काहीच करत नाही. विश्व त्याच्यावर भासते. सर्वत्र तो आणि तोच असतो. वेगळे काहीच नाही.

जीव ईश्वर व माया हे तिन्ही त्या ब्रह्मावर भासतात. आत्म्यावर त्यांचा अध्यारोप केला जातो. विश्व सगळे वरवरचे भासणारे आहे. खरे एकच ब्रह्म आहे.

त्याला जाणून घेतल्यावर जीवजाची दृष्टी उघडते, त्यामुळे मायेचे आवरण दूर होते. पंच क्लेश नाहीसे होतात. अविद्या, अस्मिता, अभिनिवेश, राग, द्वेष. अंतिमतः जन्ममरणाच्या फेऱ्यातून त्याची सुटका होते.

क्षरं प्रधानममृताक्षरं हरः
क्षरात्मानावीशते देव एकः।
तस्याभिध्यानाद् योजनात् तत्त्वभावात्
भूयश्चान्ते विश्वमायानिवृत्तिः॥१०॥

प्रधीयते अस्मिन् इति प्रधानम्। महाप्रलयात ज्यात सर्व ठेवले जाते व उत्पत्तिसमयी ज्यातून सर्व बाहेर काढले जाते ते प्रधान। इथे प्रधान म्हणजे बीज ठेवण्याची कोठी

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

क्षरात्मानौ एकः देवः ईशते। क्षर म्हणजे प्रकृति व आत्मा म्हणजे जीव, या दोघांचे ईशन करणारा एक देव आहे तो म्हणजे हर। तो स्वयंप्रकाशी व सर्वप्रकाशी आहे. दिव्यते इति देवः। अविद्येचे हरण करणारा तो हर आहे.

त्याचेच सतत ध्यान करावे. डोके मिटल्याबरोबर जेव्हा वृत्ती तदाकार होते तेव्हा खरे ध्यान लागते, प्रचीती येते.

अभिध्यान - अभि म्हणजे सन्मुख, समोर, परंतु ध्रोडेस वर अभितः - सर्वत्र, जिथे तिथे तोच दिसतो. सर्वत्र त्याचेच दर्शन होते. जग वासुदेवमय होते

तत्त्वभावात् योजनात् म्हणजे त्याच्याशी जोडून घ्यायचे. माझ्यातील तत्त्व व त्याच्यातील तत्त्व एकच आहे असा भाव व्हायला हवा. आणि हे पुन्हा पुन्हा स्वीकारायला हवे. त्याचा निदिध्यास हवा. हा ब्रह्मभाव जागृत झाला की दृश्य विश्व लटके, कमी महत्त्वाचे वाटू लागते. दरवरचे, न टिकणाऱ्या विश्वाविषयी आसक्ती उरत नाही, तो प्रगट झाला की विश्व दिसत नाही आणि ते कपट की मात्र आभास होतो.

प्रगटे तंव तंव न दिसे। लपे तंव तंव आभासे।
प्रगट न लपाला असे। न खोमता तो॥

अज्ञानी विविध रूपांनी नटलेले विश्व पाहतो. परंतु विश्वरूपाने पसरलेला ईश्वर पाहत नाही मात्र संत सर्वत्र घनदाट पसरलेल्या त्या चैतन्याला पाहतात. स्त्री पुरुष, पशु-पक्षी दिसले तरी जाणवत नाहीत. त्यामागचे चैतन्यच केवळ दिसते.

IMP

नवल उदेला चंडांशु। मावळवीत विश्वाभासु। ज्ञानरूपी सूर्य उगवला की जगाचा भास मावळतो

विश्वमायानिवृत्तिः - विश्व आहे तसेच कायम असतेच पण विश्व ही माया आहे असे समजल्यावर त्याच्यापुरते विश्व नाहीसे होते. विश्वरूपाने विलसत असलेले चैतन्य जाणवते.



© www.madhaveeraghuveer.com

8 am ज्ञात्वा देवं सर्वपाशापहानिः
क्षीणैः क्लेशैर्जन्ममृत्युप्रहाणिः ।
9 तस्याभिध्यानात् तृतीयं देहभेदे
विश्वैश्वर्यं केवल आप्तकामः ॥११॥

10 त्या एकमेव परब्रह्माला जाणणे म्हणजे तेच होणे.
11 तो व मी वेगळा नाही हे यथार्थपणे समजणे
तो विश्वंभर सर्वत्र आहे तसाच माझ्यातही तोच
12 आहे हे समजले की अहंकाराचा, अविद्येचा, अज्ञानाचा
पाश सुटून जातो
1 pm वस्तुतः आत्मा बंधमुक्तच आहे, आपणच कल्पनेने
बंध निर्माण करतो. पण एकदा का त्याचे ज्ञान झाले
2 की त्यातून सुटका होते. क्लेश ५ प्रकारचे आहेत.
१. अविद्या - स्वतःच्या स्वरूपाचे विस्मरण
3 २. अस्मिता - मी परमेश्वराहून वेगळा
३. राग - अनुराग, अनुकूल गोष्टींविषयी प्रेम
4 ४. द्वेष - प्रतिकूल गोष्टींविषयी अप्रियता
५. अभिनिवेश - मृत्यूचे भय
5 एकदा का त्या थोरल्या देवाला जाणले की
कसलेही बंधन नाही, पाश नाही, क्लेश नाहीत, जन्म-मृत्यु
6 नाही. त्याच्या अभिध्यानाने तृतीय अवस्थेचे वैभव प्राप्त
होते. त्याला देहपातानंतर विश्वाचा ईश्वरभाव प्राप्त होतो.
7 तो केवळ होतो आप्तकाम होतो. धन्य होतो.
पहिल्या दोन चरणात ज्ञानप्राप्तीचे फळ सांगितले आहे
दुसऱ्या " " ध्यानमार्गाने ब्रह्मप्राप्ति " "
विराट देहाच्या दिशेने क्रमाकडे टाकलेले पहिले पाऊल,
हिरण्यगर्भात समष्टि शरीरात " दुसरे "
सर्व विश्वाच्या नियंत्याशी जोडणे तिसरे "
तो नित्य, बुद्ध शुद्ध पुरुषोत्तमाच्या दिशेने " चवथे " आहे.

Birthday / Anniversary

©www.madhaveraghulveer.com

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **August 2010** | | | | | | |
| M | T | W | T | F | S | S |
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

*Priority*



8 am एतद् ज्ञेयं नित्यमेवात्मसंस्थं
नातः परं वेदितव्यं हि किञ्चित्।
9 भोक्ता भोग्यं प्रेरितारं च मत्वा
सर्वं प्रोक्तं त्रिविधं ब्रह्ममेतत्॥१२॥

10 तो देव, परमात्मा कुठे आहे? तर तो आपल्या
11 हृदयातच आहे. तोच ज्ञेय म्हणजे जाणून घेण्यास योग्य आहे. म्हणून श्रेष्ठ या जगात जाणण्यासारखे
12 काहीही नाही. त्याला जाणले की मग जाणण्यासारखे काही उरतच नाही. यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्य
1 pm मवशिष्यते।
छांदोग्य (६.१.३) - माती जाणली की मातीपासून होणाऱ्या
2 सर्व गोष्टी जाणल्याप्रमाणेच आहे. सोने - अलंकार
नाव वेगळी, उपयोग निराळे पण मुख्य तत्त्व एकच आहे
विविध वस्तू वा प्राणी निराळे असले तरी त्या ब्रह्मानेच
3 घेतलेले वेगळे अलंकार आहेत.
भोक्ता - जीव - अक्षर
4 भोग्य - विश्व - क्षर
प्रेरिता - ईश्वर - पुरुषोत्तम
5 त्रिविध प्रकारांनी ओळखले जाणारे ते ब्रह्मच आहे.

6 वह्नेर्यथा योनिगतस्य मूर्ति-
र्न दृश्यते नैव च लिङ्गनाशः।
7 स भूय एवेन्धनयोनिगृह्य-
स्तद्वोभयं वै प्रणवेन देहे॥१३॥

योनिगतस्य वह्नेः मूर्तिः न दृश्यते।
योनि (उगमस्थान) असलेल्या लाकडात वन्हि
दिसत नाही. म्हणजे तो जाणवत नसला तरी त्यात असतो

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

8 am म्हणजे त्याचा लिंगनाश होत नाही. म्हणजे अग्नी सूक्ष्म रूपाने (लिंग/लक्षण रूपाने) असतोच. तो डोळ्यांनी दिसत नसला तरी लाकडात अग्नि सूक्ष्म रूपाने असतोच.

हवा तेव्हा लाकडातून (इंधनयोनीतून) पुन्हा अग्नीचे ग्रहण करता येते. तसेच देहामध्ये परब्रह्म असला तरी प्रत्यक्ष दिसत नाही पण म्हणून काही परब्रह्माचा नाश होत नाही.

पुष्पे गन्धं तिले तैलं काष्ठे वह्निः पयो घृतम् ।
इक्षौ गुडं तथा देहे पश्यात्मानं विवेकतः ॥

मग हा जो दिसत नाही तो दिसण्यासाठी काही उपाय आहे का?

IMP

स्वदेहमरणिं कृत्वा प्रणवं चोत्तरारणिम् ।
ध्याननिर्मथनाभ्यासादेवं पश्येन्निगूढवत् ॥ १४ ॥

त्याप्रमाणे काष्ठातील गुप्त अग्नीला बाहेर काढण्यासाठी अरणीचे मंथन करावे लागते, त्याप्रमाणे लपलेल्या, न दिसणाऱ्या परमात्म्याला पाहण्यासाठी घुसळावे लागते.

त्यासाठी आपला देह ही खालची अरणी आहे, व प्रणव म्हणजे ॐकार ही वरची अरणी म्हणजे मंथा आहे. त्याचा निरंतर जप करणे हे मंथन आहे. त्यासाठी देह व मन स्थिर हवे. ध्यानासाठी हे आवश्यक आहे.

मुंडकोपनिषदात प्रणवाला धनुष्याची उपमा दिली आहे
प्रणवो धनुः शरो ह्यात्मा ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते ।
अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत् तन्मयो भवेत् ॥

तर कठोपनिषदात यमदेव ॐकाराची महती सांगतात
एतत् हि एव अक्षरं ब्रह्म एतद् हि एव अक्षरं परम् ।
एतत् हि एव अक्षरं ज्ञात्वा यो यदिच्छति तस्य तत् ॥
एतदालम्बनं श्रेष्ठमेतदालम्बनं परम् ।
एतदालम्बनं ज्ञात्वा ब्रह्मलोके महीयते ॥

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

ॐकारोपासनेने ब्रह्मप्राप्ति होते हे निश्चित अशी ग्वाही सर्वच उपनिषदे देतात.

आपल्या शरीरातही ॐ कार आहेच.

१. डोळे, भुवया व नाक मिळून — कारण शरीराचा ॐकार

२. पसरलेले दोन्ही हात व हृदय — सूक्ष्म शरीराचा ॐकार

३. दोन्ही पाय व कटिप्रदेश यांचा स्थूल शरीराचा ॐकार

या ओंकाराचे सतत ध्यान करणे म्हणजेच प्रयत्न। सातत्यम् इति ध्यानम्।

तच्चिन्तनं तत्कथनम् अन्योन्यं च प्रबोधनम्।
एतदेकं परत्वं च ब्रह्माभ्यासं विदुर्बुधाः॥

इथे दिलेला अरणीतून अग्नि उत्पन्न करण्याचा दृष्टांत अत्यंत समर्पक आहे. कारण ज्या वाणीने ओंकाराचा जप करायचा ती वाणी अग्निरूपच आहे.

तिलेषु तैलं दधनीव सर्पिः
आपः स्रोतस्सु अरणीषु चाग्निः।
एवमात्माऽत्मनि गृह्यतेऽसौ
सत्येनैनं तपसा योऽनुपश्यति॥१५॥

तिळात तेल असते, दह्यात तूप असते, सुक्या नदीतही खड्ड्यांखाली पाणी असते, अरणीत अग्नि असतो. तसाच स्वतःमध्ये आत्मा असतो. अशा रीतीने तपाने त्याला जाणले असता तो प्राप्त होतो.

आपल्यातील परमात्मा जाणण्यासाठी योग्य दिशेने काही प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी त्याची आस हवी, जीव व्याकुळ व्हायला हवा. मोक्षाची ओढ हवी. परमेश्वराचे अनुसंधान हवे. चित्तशुद्धी, शुद्धाचरण, सततच्या ध्यास हवा. नंतर तपाने, संयमाने, मन एकाग्र करून त्याच्या प्राप्तिसाठी प्रयत्न केले तर तो निश्चित प्राप्त होतो.



© www.madhaveeraghuveer.com

15 THU JUL 2010 — Priority

Wk 28, 196-169

July 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

8 am सर्वव्यापिनमात्मानं क्षीरे सर्पिरिवार्पितम्।
आत्मविद्यातपोमूलं तद् ब्रह्मोपनिषत् परम्॥ १६॥

9 ज्याप्रमाणे दुधात तूप नक्की कुठे आहे असे सांगता
10 येत नाही, ते सर्वत्र व्याप्त असते. त्याचप्रमाणे परमात्मा हा या जगात सगळीकडे आहेच. तो नाही
11 अशी जागाच नाही.

मग तो प्राप्त कसा होतो?

12 आत्मविद्येच्या सहाय्याने, तपोबलाने तो प्राप्त होऊ शकतो. उपनिषदांनी त्याचे वर्णन केले आहे — सर्वात श्रेष्ठ असलेले
1 pm ब्रह्म माणूस मिळवू शकतो.

दूध → शुभ्र — तेज (सत)
2 दूध → ओजस्वी — चित → सच्चिदानंद
दूध → रसमय — आनंद

3 तोच एक विश्वरूपाने नटला आहे.
4 ज्ञान देणारा तोच, तपासाठी प्रेरणा देणारा तोच आहे.
इंद्रियांना विविध शक्ती पुरवणारा,
5 विचार करायला लावणारा तोच आहे.

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

२५ ऑक्टोबर २०१८

द्वितीयोऽध्यायः।

सर्वव्यापी, सर्वसाक्षी व सर्वज्ञ असणाऱ्या परब्रह्माला जाणण्यासाठी ध्यान साधायला हवे. या ध्यानाची प्रक्रिया या अध्यायात सांगितली आहे.

युञ्जानः प्रथमं मनस्तत्त्वाय सविता धियः।
अग्नेर्ज्योतिर्निचाय्य पृथिव्या अध्याभरत्॥ १॥

हे सविता, माझे मन, बुद्धि, प्राण त्या परमात्म्याला जोडण्यासाठी तू कृपा कर. (त्यामुळे ते परमेश्वरचिंतनात मग्न होतील) आमच्या इंद्रियांच्या अग्नि इ. देवता त्या त्या इंद्रियांचे प्रकाशन करतात. (वाणी-अग्नि, कान-दिशा). ते त्यांचे सामर्थ्य गोळा करून, येथून ते पार्थिव विषयांच्या वर उचलून ते इंद्रियांच्या ठिकाणीच स्थिर राहतील असे कर. त्या इंद्रियांच्या शक्तींना इंद्रियातच स्थापन कर.

ज्ञाने. -- चक्षु- सूर्य श्रोत्र - दिशा रसना- वरुण
त्वचा - वायु घ्राण - अश्विनीकुमार
कर्मेंद्रिय- हात - इंद्र पाय - विष्णु वाणी - अग्नि
उपस्थ - प्रजापति गुद - यम
चतुष्टय- मन - चंद्र बुद्धी - ब्रह्मा
चित्त - नारायण अहंकार - रुद्र
पंचप्राण - प्राण- सद्योजात, अपान - वामदेव
समान - अघोर उदान - देवता तत्पुरुष व्यान - ईशान

या अध्यायातील पहिले पाच श्लोक प्रार्थनेचे आहेत. त्याची कृपा असल्याशिवाय कोणतेही कार्य शक्य नाही. तोच विश्व निर्मितो, प्रकाश देतो, बुद्धी धारदार करतो. आपल्यात ऊर्जा भरतो. त्याच्याशी एकरूप होण्यासाठी जोडले जायला हवे. त्यासाठी मन, बुद्धी, प्राण शांत हवेत. परंतु तसे नेहमीच होत नाही. मग ही अशांतता का? इंद्रिये बहिर्मुख आहेत. पराञ्चि खानि व्यतृणत् स्वयम्भूः।



© www.madhavveeraghuveer.com

Priority घेई घेई माझे वाचे गोड नाम विठोबाचे
डोळे तुम्ही घ्या हो सुख, पहा विठोबाचे मुख ||

आत्मा त्वं गिरिजा मतिः सहचराः |

या जगातले विविध विषय इंद्रियांना आकर्षित करतात. मन त्यांच्याकडे धाव घेते. त्यामुळे मन व इंद्रिये क्षुब्ध असतात. ही बाहेर धावणारी इंद्रिये अंत वळवायला हवीत. थोडक्यात, आवृत्तचक्षु व्हायला हवे.

हे घडणे कठीण आहे. परंतु त्या त्या देवतांची कृपा प्राप्त झाली तर हे शक्य होऊ शकते. त्याचे परिणामस्वरूप म्हणून इंद्रिये इंद्रियांच्या गोलकात स्थिर होतात. सर्व इंद्रिये व मन जागच्या जागी स्थिर, शांत झाली तर त्यांना ईश्वराकडे वळवता येईल.

इंद्रियांच्या या देवता विराटाच्या एकेका अवयवातून उत्पन्न झाल्या व त्या देवता त्या त्या इंद्रियावर नियंत्रण ठेवतात. सूर्य ही डोळ्यांची देवता आहे. त्यामुळे तो प्रसन्न असेल तर दृष्टी उत्तम असते. इथे मात्र बाह्य गोष्टी प्रकाशित करण्यापेक्षा आतल्या आत्म्याला - अंतरात्म्याला पाहण्यासाठी त्याला प्रार्थना केली आहे.

इंद्रिये बाहेर धावू नयेत. जाणिवाही बाहेर जाऊ नयेत. सूर्य ज्याप्रमाणे सकाळी आपली किरणे पसरवतो व संध्याकाळी ती आवरून घेतो तसेच आमच्या इंद्रियांना गोळा करण्यासाठी सवित्याला प्रार्थना केली आहे.

इंद्रिये शांत झाली, मन - बुद्धी - प्राण शांत झाले की ते परमतत्वाशी जोडले जाऊ शकतात. शुद्ध, शांत मनात ते परमतत्व पाहता येते आणि सतत त्याचे चिंतन केले की त्याच्याशी तद्रूप होता येते.

तत्त्वग्रहणासाठी बुद्धि आणि चित्त वळवून श्रद्धा निर्माण करणारा हा सविता देवच आहे. त्याच्या सर्वग्राही प्रकाशात सर्व उपासनामार्ग उजळून निघतात. त्याच्यामुळे ध्येय स्पष्ट होते व साधनेचा मार्ग दिसू लागतो. त्या मार्गावरून जाताना गायत्री मंत्र - सवितृ मंत्र - बुद्धीला प्रेरणा द्यावी म्हणून प्रार्थना केली आहे.

Birthday / Anniversary

© www.madhavveeraghuveer.com

August 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

*Priority*

२६ ऑक्टोबर १८

SUN JUL 18 2010

Wk 28, 199-166

युक्तेन मनसा वयं देवस्य सवितुः सवे।
सुवर्गेयाय शक्त्या ॥ २॥

आम्हाला उत्पन्न करणाऱ्या परमदेवाच्या (सवितृ) आराधनारूप यज्ञात परमेश्वरावरील श्रद्धेने युक्त असलेल्या अंतःकरणाने सर्व शक्तीनिशी भगवंताच्या प्राप्तिसाठी (स्वर्गीय सुखप्राप्तिसाठी) आनंदासाठी निरंतर प्रयत्न करावेत किंवा करू (प्रयत्नामध्ये)

युक्तेन मनसा - नियंत्रण असलेल्या मनाने! मन जर स्वैर नसेल तर ते आज्ञा पाळेल.

सुवर्गेयाय - स्वर्गातही जो गेय आहे त्या परमानंदासाठी आम्ही प्रयत्न करू. भगवंताला प्राप्त करणे हा श्रेष्ठ आनंद!

सवे - आराधनारूपी यज्ञात (सप्तमी)
सवे - सवितृ देवाच्या कृपेसाठी (चतुर्थी)

युक्त्वाय मनसा देवान् सुवर्यतो धिया दिवम्।
बृहज्ज्योतिः करिष्यतः सविता प्रसुवाति तान् ॥ ३॥

आम्ही मनाला एकाग्र करून स्वर्गाला जाऊ पाहणाऱ्या इंद्रियांना शांत करून ब्रह्मानंदात मग्न करू इच्छितो. बुद्धीने त्या दिव्य ज्योतीला (परम प्रकाशरूप ब्रह्माला) जाणू इच्छितो, अनुभवू इच्छितो. प्रयत्न तरी करतो.

त्या बृहत् म्हणजे पसरणाऱ्या इंद्रियांना सतेज बुद्धीच्या प्रकाशात कल्याणकारी मार्ग दाखवावा.

हे सवित्या, तुझी कृपा झाल्याशिवाय आमच्या प्रयत्नांना यश येणार नाही. आमच्या मन बुद्धीला त्याच्याशी जोडून घेण्यास, एकरूप होण्यास समर्थ कर, शुद्ध कर व त्यात अशी ओढ निर्माण कर की ते परमात्म्याला जाऊन मिळतील.

Birthday / Anniversary अनन्यभाव + एकाग्रता हवी.

© www.madhaveeragniveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

युञ्जते मन उत युञ्जते धियो
विप्रा विप्रस्य बृहतो विपश्चितः।
वि होत्रा दधे वयुनाविदेक
इन्मही देवस्य सवितुः परिष्टुतिः ॥१॥

त्या अनादि, अव्यय, सनातन, चिरंतन ब्रह्मशक्तीच्या ठायी माझे मन बुद्धी लीन होवो. मोठ्या गोष्टीमध्ये लहान गोष्टी लीन होतात. मिसळून जातात. तो बृहत् मोठा आहे. विपश्चित म्हणजे ज्ञानी आहे. विप्र म्हणजे तृप्त आहे.

तसेच विद्यया याति विप्रत्वम्। ज्ञानी, विवेकी शाश्वताचे ज्ञान असणाऱ्या ब्राह्मणाचे लक्ष ऐहिक (अशाश्वत) गोष्टींकडे जाणारच नाही. ज्ञानोपासना, वेदरक्षण आणि परमात्म्याच्या चिंतनात गढून जाणाऱ्या खऱ्या विप्राला कशाचाही मोह नसतो. शरीररक्षणापुरते अन्न, वस्त्र, निवारा मिळाला तरी तो संतुष्ट असतो. सोऽहम् वृत्तीने शांत असतो.

परब्रह्म वयुनावित म्हणजे सर्व देहात व्याप्त आहे. सर्व चराचरात तोच भरून राहिला आहे. सर्व ब्रह्मांडे त्याच्या पोटात सामावली आहेत. तो बृहत म्हणजे भूमा आहे. भूमा म्हणजे त्याहून मोठे काही नाही. सर्वत्र घनदाट भरून वरती दशांगुळे उरला आहे असा. तो सर्व जाणतो म्हणून तो विपश्चित आहे. सर्व काही त्याचाच विलास आहे, त्याच्यातच सर्व सामावले आहे. त्याला माहिती नाही असे काहीही नाही. हे निर्माण झालेले विश्व त्याच्यातच विलीन पावणार आहे. थोडक्यात सर्व सृष्टीची आहुती परमात्म्यामध्ये दिली जाते. सर्वत्र त्याचेच दर्शन होते. यज्ञकर्म, अग्निहोत्र हे त्यानेच निर्माण केले आहे यात भेद नाहीत हा एकमेवाद्वितीय आहे.

हा या देवाची मही (महिमा) आहे. स्तुती आहे. किंवा मही म्हणजे पृथ्वी असा अर्थ घेतला तर तो आम्हाला सांभाळणारा किंवा सर्व अपराध पोटात घालणारा आहे.

© www.madhaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

२८ ऑक्टोबर ९८

युजे वां ब्रह्म पूर्व्यं नमोभि
वि श्लोक एतु पथ्येव सूरे: ।
शृण्वन्तु विश्वे अमृतस्य पुत्रा
आ ये धामानि दिव्यानि तस्थु: ॥५॥

पूर्व्य म्हणजे सर्वांच्या पूर्वी अस्तित्वात असलेले त्या परब्रह्माशी मी मन बुद्धीचे स्वामी देवतांनो (वां) तुम्हाला जोडतो. मन बुद्धीला सतत त्या शक्तिदात्याची आठवण करून दिली म्हणजे ते इतरत्र भटकणार नाही. ती शक्ती देणारा तो पुराणपुरुष ब्रह्म आहे.

त्याने आम्हाला ज्ञात्यांच्या (सूरे:) मार्गावर न्यावे. दिव्यधामी वास करणाऱ्या सर्व अमृतपुत्रांनो, तुम्ही माझी हाक, स्तुती ऐकावी आणि मला ध्यानाच्या मार्गावर घेऊन चलावे. नमोभि: - हा नमस्कार म्हणजे केवळ औपचारिक बाह्य कृती नाही तर वृत्ति नम्र आणि मन-बुद्धी तुझ्या ठायी लीन झाली आहे. प्रार्थना म्हणजे भावशून्य शब्दांचे विद्वत्तेचे पोकळ प्रदर्शन नाही तर सात्त्विक कोमल भावाने श्रद्धेने, मनापासून, मनातून उमटलेली प्रार्थनाच देवाच्या चरणी रुजू होते. अशा प्रार्थनेने देव प्रसन्न होतात. या स्तुति मंत्रांनी चित्त शुद्ध होऊन केलेल्या प्रार्थनेने ज्ञान प्राप्त करून घेण्याची पात्रता वाढते. समर्पणाची भावना मनापासून उमलते. सर्व करवून घेणारा तूच आहेस. मी केवळ माध्यम आहे.

त्वदीय वस्तु गोविंद तुभ्यं समर्पये ।

दृढ निश्चयाने मन-बुद्धीची एकाग्रता साधून सर्वांना हाक मारली आहे. आणि हा शुभ संकल्प बोलून दाखवला आहे.

या दृश्य जगातून मी मन काढून घेतले आहे. व त्या जगन्नियंत्या, निर्मात्या परब्रह्माशी एकरूप होण्यासाठी मी ध्यान ग्रहण करत आहे. सत्य संकल्पाचा दाता परमेश्वरच आहे.

Birthday / Anniversary

**21** WED JUL 2010

Wk 29 202-163

Priority मंत्र-६ ॐकार साधना
७ कृपाप्रसाद
८. आसन
९. प्राणायाम
१०. ध्यान

| July 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

8 am

अग्निर्यत्राभिमथ्यते वायुर्यत्राभिरुध्यते ।
सोमो यत्रातिरिच्यते तत्र सञ्जायते मनः ॥६॥

9

जिथे अग्निचे मंथन आणि वायुचे नियंत्रण होते आणि जिथे अत्यंत अद्भुत असा सोमरस भरभरून ओसंडतो त्या ठिकाणी परम साधकाचे मन स्थिरावते. प्रगतिच्या, उन्नतिच्या तो परमोच्च बिंदू !

**ज्ञानमार्ग** शरीराची अधरारणी करून व प्रणवाची उत्तरारणी करून मंथन केल्यावर ज्ञानरूप अग्नी प्रगट होतो.

**ध्यानमार्ग** – त्यावेळी प्राणायाम करून प्राणांचा अवरोध केला जातो. प्राण रोखला जातो. वायुवर नियंत्रण ठेवले जाते.

**कर्ममार्ग** सोमरसाच्या सेवनाने वृत्ती प्रफुल्लित होतात. सोम म्हणजे चंद्र-मनाची देवता. त्याच्या कृपेने आनंदाचे अमृत प्राप्त होते. मनाचे जिथे उल्लंघन होते. मन अमन होते तिथे ध्यान लागते. परमानंद प्राप्त होतो.

तत्र संजायते मनः । मन ध्यानाकार होऊन जाते.

ॐकार साधनेने ऊर्जा वाढते. मन शुध्द होते. प्राणायामाने श्वासावर नियंत्रण येते. शरीर व मन स्थिर होते, शांत होते. बाहेर धावणे थांबते. ध्यानासाठी सत्वगुणाचे प्राबल्य हवे

वाणी अग्निरूप आहे. या वाणीरूप अग्निचे जिथे मंथन होते म्हणजे जिथून ही वाणी स्फुरते तिथे चित्त केंद्रित करावे. परावाणी म्हणजे नाभिपर्यंत खोल उतरावे.

वायुचा जिथे अवरोध होतो. आपण जो श्वास आत घेतो तो जिथपर्यंत जाऊन थांबतो तिथे चित्त केंद्रित करावे

सोम (मन) – जिथे मनाचे उल्लंघन होते. मन अमन होते म्हणजेच वासना कल्पनांच्या पलीकडे जायला हवे. तिथे सर्व तरंग शांत होतात. त्या ठिकाणी ध्यान लागते. तत्र संजायते मनः ।

श्रुती – मनसा एव इदम् आप्तव्यम् / मनानेच परब्रह्म प्राप्त करावे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeragiiveer.com

२८ ऑक्टोबर २०१८

8 am सवित्रा प्रसवेन जुषेत ब्रह्म पूर्व्यम्।
तत्र योनिं कृणवसे न हि ते पूर्वमाक्षिपत्॥७॥

9 सवितृ देवाच्या कृपेने सर्वांचा आदि असणाऱ्या त्या
10 परब्रह्माची सेवा करावी. त्याच्या प्रसादाने बुद्धी शुद्ध,
तीव्र, एकाग्र होईल. त्या स्थिरबुद्धीने परमात्म्याचे चिंतन
11 करता करता त्याच्यातच आमचा वास होईल. एकदा का त्याच्याशी
जोडले गेलो की पूर्वीची पापे, वाईट कर्मे विघ्ने बनून मार्गात
12 येणार नाहीत.

इथे साधकाला दिलासा मिळतो. आपि चेत्सुदुराचारो ---

1 pm सूर्य (प्रसव) उगवतेमुळे पाण्याची वाफ - ढग - पाऊस - अन्नधान्य
तसेच त्याच्याच कृपेने ध्यान लागेल.

2 त्याने ध्यान करायला अनुज्ञा दिली तोच भरणपोषणाची
जबाबदारी घेतो. योगक्षेमं वहाम्यहम्।

3 सर्व चिंता त्याच्यावर सोडून द्या केवळ त्याचे चिंतन करा
तिथेच आश्रय घ्या. वास करा.

4 पूर्व किंवा पूर्त - समाजोपयोगी काम.

परमेश्वराशी एकरूप होऊन, मनामध्ये ब्रह्मभाव ठेवून
5 जे कर्म करतो ते निर्बीज होईल. बंधन पडणार नाही.

मायेच्या दोन शक्ती - आवरण, विक्षेप.
6 ज्ञानाने आवरणाचा छेद घेतला जातो
ध्यानाने विक्षेपाची निवृत्ती होते.

आसनस्थिती

7 त्रिरुन्नतं स्थाप्य समं शरीरं
हृदीन्द्रियाणि मनसा संनिवेश्य।
ब्रह्मोडुपेन प्रतरेत विद्वान्
स्रोतांसि सर्वाणि भयावहानि॥८॥

Birthday / Anniversary स्थाप्य हे आर्ष रूप आहे (स्थापयित्वा) किंवा प्रतिष्ठाप्य हवे.

जगात अनेक चांगली कामे होत असतात परंतु त्याच्या मागे प्रतिष्ठेची भूक, स्वार्थभावना असल्याली असल्यामुळे ती यज्ञकार्ये न ठरता नुसती कामेच होतात. त्यातून साधना घडत नाही. त्यासाठी मन मुक्त हवे.

त्यापूर्वी साधकाने यम-नियमांचे पालन करून योगसाधनेची पूर्वतयारी करायला हवी. ती कशी हे पुढील ३ श्लोकात सांगितले आहे.

प्रथम एका आसनावर स्थिर बसावे. कंबर मस्तक, पाठ एका रेषेत स्थिर असावे. म्हणजे मान व छाती ताठ राहील.

समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः।

केवळ एवढ्यानेच इंद्रियांच्या वृत्ति निश्चल, निस्तरंग होतील. मनाला अनुकूल स्थिती प्राप्त होईल. पाण्याला बांध घातला तर पाणी बाहेर जात नाही माघारी फिरते तसे इंद्रियांना धावू दिले नाही तर ती आत येतात. त्यांना मनासह हृदयात आणावे. परंतु त्यासाठी आलंबन (अडकून ठेवणारे) हवे. ते म्हणजे ब्रह्म - ॐकार - प्रणव किंवा गुरुदत्त मंत्र

ती जणू काही (उडुप) होडीच आहे. त्या होडीच्या सहाय्याने वासना, भावभावना तरून जाता येईल. मन स्थिर व्हायला ॐकार किंवा मंत्र उपयोगी पडतो.

एकदा आतले प्रवाह पार पडले की बाहेरचे प्रवाहही आपोआपच पार होतात. मन स्थिर होऊन ब्रह्मामध्ये लीन झाले की मानसिक कल्लोळांचाही त्रास होत नाही व पुनर्जन्माच्या, मृत्युनंतरच्या गतीच्या प्रश्न उद्भवत नाही.

प्रणवाच्या दीर्घ उच्चाराने
१. कामक्रोधादि दोष दूर होतात.
२. इंद्रिये हृदयात शांत होतात
३. परमात्म्याची प्राप्ति होते.

Birthday / Anniversary असे आसन साधल्यावर पुढे काय करावे?

© www.madhaveeraghuveer.com

## प्राणायाम

प्राणान् प्रपीड्येह सयुक्तचेष्टः
क्षीणे प्राणे नासिकयोच्छ्वसीत ।
दुष्टाश्वयुक्तमिव वाहमेनं
विद्वान् मनो धारयेताप्रमत्तः ॥९॥

आता साधकाने प्राणायाम करावा. एका नाकपुडीने श्वास घ्यावा. थोडा वेळ रोखून धरावा व मग दुसऱ्या नाकपुडीने बाहेर सोडावा. वायुचा स्वभाव वाहण्याचा आहे. त्याला रोखायचे, नियंत्रित करायचे म्हणजे त्याच्या स्वभावाविरुद्ध करायला लावणे म्हणजेच त्याला पीडा देणे. अशा रीतीने कुंभक करून प्राण क्षीण झाल्यावर हळूहळू बाहेर सोडावा.

परब्रह्मापर्यंत नेणारे मनच आहे. पण ते वायुची पुतळी आहे. सहजासहजी स्थिर होत नाही. नियंत्रणात येत नाही. दूषित (स्वैर धावणारे, अडेल, वांड) घोडे जर रथाला जोडले असतील तर सारथ्याचे कौशल्य पणाला लागते. त्यांना चुचकारून, सांभाळून घ्यावे लागते. त्यासाठी सदैव सावध असावे. प्रमाद न करता सतत दक्ष रहावे.

या दक्षतेसाठी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पूरक व रेचक श्वासांची गती नियमित करून हळूहळू कुंभकाचा अभ्यास करावा. श्वास नाकानेच घ्यावा, नाकानेच सोडावा. त्यामुळे नाठाळ घोड्यासारखी उधळणारी इंद्रिये वश करता येतात.

शरीर हे आपल्या हाती असलेले एकमेव साधन आहे. संयमाने त्याला योग्य रीतीने वळवून स्वाधीन ठेवावे लागते. ते जमले की मग एकेक सिद्धी मिळू लागते.

स्थान

समे शुचौ शर्करावह्निवालुका
विवर्जिते शब्दजलाश्रयादिभिः ।
मनोऽनुकूले न तु चक्षुपीडने
गुहानिवाताश्रयणे प्रयोजयेत् ॥१०॥



© www.madhaveeraghuveer.com

Priority
११ ध्यानातील दर्शन
१२ शरीराचा हलकेपणा।
१३ ध्यानातून लाभ/बाह्य लक्षणे
१४ सिद्धावस्था।
१५ बंधातून मुक्ति

8 am पवित्र आणि समतल भूमिवर ध्यान केले असता मन चटकन एकाग्र होते म्हणून अशी भूमी निवडावी.
9 जिथे कुठे दगड, वाळू किंवा बोचणारे खडे नसावेत. कुठे आग लागली तर ती पसरणार तर नाही ना याचे
10 भय वाटत राहील अशी जागा नसावी. नदीकाठी वा वाळवंटात जोराचा वारा सुटला तर वाळू उडून नाकात,
11 डोळ्यात जाण्याची शक्यता असते. असे ठिकाण टाळावे.
जिथे कोलाहल आहे — चव्हाटा, बाजारपेठ, मंडई
12 अशा ठिकाणी ध्यानाला बसू नये. नदीच्या अगदी काठावर बसले असता ओलीचा त्रास होऊ शकतो. किंवा पडण्याची
1 pm भीती असते. त्यामुळे अशी जागा टाळावी.
लोकांची फार वर्दळ असेल अशा धर्मशाळा,
2 देवालयांमध्ये ध्यान साधत नाही.
थोडक्यात अनुकूल स्थान निवडावे. भगभगीत
3 उजेड किंवा मन विचलित करणारे स्थान नको.
गुहा किंवा घर ही सुरक्षित जागा आहे. सोसाट्याचा वारा
4 सुटला तरी तिथे त्रास होत नाही.
अशा रमणीय ठिकाणी ध्यान चांगल्या रीतीने लागते.

5

नीहार धूमार्कानिलानलानां
6 खद्योतविद्युत्स्फटिकशशीनाम्।
एतानि रूपाणि पुरःसराणि
7 ब्रह्मण्याभिव्यक्तिकराणि योगे॥११॥

ध्यानयोगाला सुरुवात केल्यावर काही अभ्यास झाल्यावर मिटल्या डोळ्यांपुढे काही काही दिसू लागते. कधी धुके कधी धूर कधी लखलखणारा सूर्य, वारा, आग्नि, खद्योत, लखलखणारी वीज सौम्य शांत तेजाचे स्फटिक चंद्र दिसू लागतात. वा सात्विक ही ब्रह्माचीच अभिव्यक्ती असते. या रूपाने ब्रह्म प्रतीत होऊ लागते



© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

३ नोव्हेंबर २०१८

पृथ्व्यप्तेजोऽनिलखे समुत्थिते
पञ्चात्मके योगगुणे प्रवृत्ते।
न तस्य रोगो न जरा न मृत्युः
प्राप्तस्य योगाग्निमयं शरीरम् ॥१२॥

पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश या पंचमहाभूतांचे हे शरीर बनले आहे. ही तत्वे सूक्ष्म होत जाणारी आहेत. त्या पाच सूक्ष्म तत्त्वांशी योग गुणाने एकरूप झाल्यावर, साधकाचे शरीर जड राहत नाही. शरीर योगाग्निमय होते. अशा शरीराला रोग, म्हातारपण वा मृत्यु उरत नाही.

शरीराचा खालचा भाग हे पृथ्वीतत्व आहे. त्याच्याशी एकरूप व्हायचे. त्यानंतर पृथ्वीतत्व जलतत्वात विलीन करायचे. जलतत्व अग्नित, अग्नितत्व वायुत व वायुतत्व आकाशतत्वात विलीन झाले की अंती शरीरातील आकाशतत्व महदाकाशात मिसळून जाते. जो परिच्छिन्नपणा, सीमितपणा आला होता तो जातो व तो विश्वभर पसरतो. विश्व होऊनी विचरे विश्वामाजी।

लघुत्वमारोग्यमलोलुपत्वं
वर्णप्रसादं स्वरसौष्ठवं च।
गन्धः शुभो मूत्रपुरीषमल्पं
योगप्रवृत्तिं प्रथमां वदन्ति ॥१३॥

ध्यानात प्रगती झाल्याची बाह्य लक्षणे दिसू लागतात. इतरांनाही काही खुणा दिसतात. प्राथमिक सिद्धी प्राप्त होतात. साधकाचे शरीर हलके होते. त्याचे आरोग्य उत्तम राहते. वखवख थांबते. विषयांची ओढ संपते. शरीराचा वर्ण उजळतो. आवाजात गोडवा येतो, मार्दव येते. शरीराला एक चांगला गंध येऊ लागतो. मलमूत्रविसर्जनाचे प्रमाण कमी होते. अशा प्राथमिक खुणा दिसू लागतात.

8 am 10 11 12 1 pm 2 3 4 5 6 7
Birthday / Anniversary

© www.madhaveeradhuveer.com

यथैव बिम्बं मृदयोपलिप्तं
तेजोमयं भ्राजते तत् सुधान्तम्।
तद्वाऽऽत्मतत्त्वं प्रसमीक्ष्य देही
एकः कृतार्थो भवते वीतशोकः॥१४॥

तेजस्वी रत्नावर किंवा सोन्याचांदीच्या तुकड्यावर मातीचा लेप असल्यास ते चमकत नाही. मात्र तेच चांगले धुतले तर पुन्हा चमकते. त्याप्रमाणे आत्मा मूळचा तेजस्वी असला तरी कर्म व वासनांच्या संस्कारांनी तो झाकोळून जातो.

ध्यानात, योगाग्निमध्ये सर्व वासनांचा, कर्मसंस्कारांचा मळ धुतला की मूळ आत्म्याचे तेजस्वी रूप दिसू लागते. ब्रह्माचे स्वरूप व आपले स्वरूप एकच आहे हे लक्षात आले की साधक सिद्ध होऊन जातो. त्याचे दुःख संपते, भय संपते. त्याचे जीवन कृतार्थ, धन्य होते.

सुधान्तम् - अमृताची पराकाष्ठा! जीवात्म्याचा मळ जाऊन तो शुद्ध होतो, एकरूप होतो. अमृतच होतो.

त्याचे परिच्छिन्नत्व निघून जाते. तो असीम होतो.

किंवा सुधौत असा पाठभेद घेतल्यास चांगल्या रीतीने धुतलेला, स्वच्छ, शुद्ध असा अर्थ घेता येतो.

कृतार्थ - कृत (प्राप्तव्य पूर्ण झाले आहे) अर्थ.

यदाऽऽत्मतत्त्वेन तु ब्रह्मतत्त्वं
दीपोपमेनेह युक्तः प्रपश्येत्।
अजं ध्रुवं सर्वतत्त्वैर्विशुद्धं
ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः॥१५॥

आत्म्यावर वासना, कर्मसंस्कारांचा मळ जमल्याने त्याला जीवदशा आली होती. मात्र मळ गेल्यावर तो मूळस्वरूपात तेजस्वी, लखलखीत झाला.



© www.madhaveeraghuveer.com

8 am ब्रह्मतत्त्व हे इंद्रियगोचर नाही. ते स्वसंवेद्य आहे. शुद्ध आत्मा
परमात्म्याचा साक्षात्कार करतो म्हणजे तो तेच होऊन जातो.
9 यथा उदकं शुद्धे शुद्धम् आसिक्तं तादृगेव भवति।
एवं मुनेर्विजानत आत्मा भवति गौतम॥ कठ.२.१.२.१५
10 शुद्ध जलात पावसाचे शुद्ध पाणी पडते तेव्हा ते
दोन्ही एकच होतात. परमात्म्याला जाणणारा आत्मा तोच होतो.
11 दोन समान गोष्टी एकमेकांत चटकन मिसळतात
(दूध, तूप) आत्मा परमात्मा समान आहेत. प्रत्येक जीवाचे खरे स्वरूप
12 तेच आहे. हे उमगले की मग उपाधि गळून पडते. बंधन उरत
नाही. खरे तर बंधन मनाचेच असते.
1 pm सर्व तत्त्व विशुद्ध आहे. यात काहीच हीण नाही, मळ नाही
'अज' 'अविनाशी' काळाचा त्यावर कोणताही परिणाम नाही. हे
2 एकदा समजले की भय निघून जाते. पाशातून पूर्ण मुक्त होतो.

3 एषह देवः प्रदिशोऽनु सर्वाः
पूर्वो ह जातः स उ गर्भे अन्तः।
4 स एव जातः स जनिष्यमाणः
प्रत्यङ् जनास्तिष्ठति सर्वतोमुखः॥१६॥

5 वर ज्या अज, अविनाशी (कालातीत) ध्रुव (अव्यय अविकारी)
6 अतिशय शुद्ध अशा देवाचे वर्णन केले तोच देव
सर्व दिशा व अवांतर दिशांतून भरलेला आहे.
7 तो सर्वांत प्रथम (पूर्व, आदि) होता
सोम्य, सदेव अग्रे आसीत्। - ऐतरेय उपनिषद
नान्यत्किंचन मिषत्।
स ईक्षत लोकान्नु सृजा इति। त्याने भुवनांना (लोक)
निर्माण करण्याचा विचार केला.
यासाठी तो स्वतः प्रथम हिरण्यगर्भ म्हणून जन्माला
Birthday / Anniversary आला. मग सर्व गोष्टी त्याने जन्माला घातल्या. व त्या

©www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

सर्वांच्या (ग्रह, पृथ्वी, झाडे, पशु, पक्षी, माणूस) अंतरात येऊन राहिला. या सर्व जगाच्या व वस्तुमात्राच्या रूपाने तोच जन्माला येतो. प्रत्येक कणाकणात त्याचेच वास्तव्य असते. ∴ तो सर्वतोमुख आहे.

तो सहस्रशीर्ष, सहस्रपाद आहे (पुरुषसूक्त)
सर्वतः पाणिपादं तत् सर्वतोऽक्षिशिरोमुखम्। (गीता)

बहु स्याम् असे म्हणून तो बहुरूपाने व्यक्त झाला आहे हे कळले की सर्वत्र त्याचेच दर्शन होते, अगदी 'मी' म्हणजे तोच आहे हे कळले की मग भ्रांति फिटते, जीव, जगत् जगदीश सर्वत्र तोच भरून राहिला आहे अशी ब्रह्माकार वृत्ती झाल्यावर शोक कसला? मोह कसला?

यो देवो अग्नौ यो अप्सु यो
विश्वं भुवनमाविवेश।
य ओषधीषु यो वनस्पतिषु
तस्मै देवाय नमो नमः॥१७॥

सर्वत्र भरून राहिलेला तो देव अग्नित, जलात सर्वत्र आहे. त्याच्यामुळेच अग्निला दाहकता प्राप्त झाली, पाण्याला उद्धरणशक्ती, जोडण्याची शक्ती त्याच्यामुळेच आहे. समस्त भुवनांमध्ये तोच आहे ∴ ही भुवने अवकाशात आधाराशिवाय स्थिर आहे. गुरुत्वाकर्षण शक्ती त्याचीच आहे

बहुप्रसवा वसुंधरा - नटते, पोसते, धारण करते, गंध देते, उमलवते. फळांना रंग, रस भरते. सगळे धारण करणारे आहे. ओषधी - गहू, नाचणी, ज्वारी वनस्पति - आंबा पेरू, संत्री, पुन्हा पुन्हा फळ धारण करतात. हे सर्व आश्चर्यकारक असे पाहिल्यावर त्याला वारंवार नमस्कार केल्याशिवाय राहवत नाही. नमो नमः।

August 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

*Priority*

FRI JUL 2010 **30**

Wk 30, 211-154

8 am

असितगिरिसमं स्यात्कज्जलं सिन्धुपात्रे
सुरतरुवरशाखा लेखनी पत्रमुर्वी
लिखति यदि गृहीत्वा शारदा सर्वकालं
तदपि तव गुणानामीश पारं न याति॥

9

10

11

12

1 pm

2

3

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

| July 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

## तृतीय: अध्याय: (२९)

शक्तीचे [illegible]

य एको जालवानीशत ईशनीभि:
सर्वांल्लोकानीशत ईशनीभि:।
य एवैक उद्भवे सम्भवे च
य एतद् विदु: अमृतास्ते भवन्ति॥१॥

तो जालवान म्हणजे इंद्रजाल निर्माण करण्याची मायावी शक्ती असणारा असा आहे. परमेश्वराकडे सर्व शक्तींचा स्रोत आहे. सर्व शक्तिसमूहांचा तो धारणकर्ता आहे. त्याच्या ईशनी शक्तीच्या सहाय्याने तो विश्व नियंत्रित करतो.

हे विश्व सुचारु रुपाने व्यवस्थित चालवण्यासाठी त्याच्या शक्तीचे विकेंद्रीकरण - Decentrallization व्हायला हवे. त्याप्रमाणे त्याने सूर्याकडे उष्णता, ऊर्जा, प्रकाश देण्याचे काम सोपवले. वाऱ्याकडे चलनवलन देऊन तो या सर्व विश्वाचा कारभार चालवतो.

सर्वान् लोकान् - (एकूण) १४ भुवने / लोक आहेत. त्या सर्वांचे व्यवस्थापन तो ईशनी शक्तीच्या माध्यमातून करतो. आपल्या शरीरातील सर्व संस्था - पचन, रक्ताभिसरण, श्वसन इ. तोच कार्यरत ठेवतो, त्याच्या शक्तीमुळेच त्या संस्था चालतात.

तो एकटाच उत्पत्ति - स्थिती - लय या क्रिया करतो.

ज्यांना हे नीट समजते ते अमृत होतात, म्हणजे जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटतात, त्याच्याशी एकरुप होतात. ते तत्त्व जाणल्यावर जाणावयाचे काही शिल्लक रहात नाही.

उद्भव - उत्पत्ती व सम्भव - विस्तार

बीजरुपात वैभव प्राप्त करणे हा उद्भव आहे तर अंकुर, पाने हा विस्तार हा संभव आहे.

कारणही तोच आणि कार्यही तोच! निर्माण, स्थिति, लय तोच आहे. याचा अनुभव कुणालाही (सर्वांना) येऊ शकतो.

ये एतद् विदु: ते अमृता भवन्ति।



© www.madhaveeraghuveer.com

७ नोव्हेंबर २०१८

8 am

एका हि रुद्रो न द्वितीयाय तस्थु
र्य इमाल्लोकानीशते ईशनीभिः।
प्रत्यङ्गजनास्तिष्ठति संचुकोचान्तकाले
संसृज्य विश्वा भुवनानि गोपाः॥२॥

या एकालाच इथे रुद्र म्हटले आहे. सत् एकच आहे.
त्या एकाशिवाय दुसरे नाहीच. नाव कोणतेही असो -
शिव, ब्रह्म, सच्चिदानंद, तत्, वस्तु, ॐ, रुद्र, पुरुषोत्तम -
तरी तो एकच आहे.

ब्रह्माला जाणून घेण्यासाठी जमलेले विद्वज्जन शेवटी
एकाच निर्णयाप्रत येऊन पोहोचले की तो एकच या
सगळ्या विश्वाचे कारण आहे. अन्य काही नाही. ते अन्य
कोणत्याच तत्त्वावर स्थिर होऊ शकले नाहीत. न द्वितीयाय
तस्थुः। तो आपल्या ईशनी शक्तीच्या सहाय्याने सर्व
लोकांचे ईशन करतो. त्याच्यामुळेच सर्व कार्य सुरळीतपणे
चालते. तो 'विश्वानि भुवनानि' सर्व लोकांची उत्पत्ति करून
या प्रत्येकात राहून राहतो. त्यांचे रक्षण (गोपाः) करतो.
व शेवटी त्यांचा संकोच (संचुकोच) करतो. त्यांना
आवरून घेतो. गुंडाळून घेतो.

थोडक्यात उत्पत्ति - स्थिति - लय करण्याची शक्ती
त्याच्याजवळच आहे. रुद्र - रुदनं द्रावयति इति।
सर्व रोग, शोक, भय, मोह यांना पळवून लावतो तो रुद्र!
इथे रुद्र हा शब्द ब्रह्म या अर्थाने घेतला आहे.

विश्वतश्चक्षुरुत विश्वतोमुखो
विश्वतोबाहुरुत विश्वतस्पात्।
सं बाहुभ्यां धमति सं पतत्रै
र्द्यावाभूमी जनयन् देव एकः॥३॥



©www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

स: एक: देव: द्यावाभूमी जनयन्।
ज्या एका देवाने स्वर्ग, पृथ्वी, अंतरिक्ष निर्माण केले
तो एक देव आहे तरी कसा? तो कल्पनातीत
आहे. त्याला सर्व बाजूंनी डोळे, कान, हात, पाय आहेत.
सर्वत: पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम्।।१३.
किंवा पुरुषसूक्तात त्याच्या विराट स्वरूपाचे वर्णन आहे.
सहस्रशीर्षा सहस्राक्ष: सहस्रपात्।
नारायणोपनिषद् – सहस्रशीर्षं देवं विश्वाक्षं विश्वशंभुवम्।
सर्व मानव म्हणजे त्याचीच रूपे आहेत. म्हणून
त्याला हजारो डोळे, तोंडे, कान आहेत.
तोच बोलतो बालमुखातून।
तोच डोलतो ऊंच पिकातून।
कधी होऊनि देव भिकारी
अन्नासाठी आर्त पुकारी
अवती भवती असुनि दिसेना। शोधितो त्यास आकाशी।
आकाश, धरती यांना त्यानेच निर्माण केले. यातील प्रत्येक
जीवाला काय काय लागणार आहे याचा पूर्ण विचार
करून त्या त्या जीवाला आवश्यक अवयव दिले आहेत.
पशु – तीक्ष्ण नखे, सुळे, आक्रमकता
पक्षी – नख्या, पंख, चोच,
माणूस – पंच ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये, पचन, श्वसनसंस्था
रोगप्रतिकारक शक्ती. तांबड्या पांढऱ्या पेशी हे सर्व
अत्यंत कमी जागेत परंतु सक्षमतेने कामे करतात.
या ब्रह्मांडात ग्रह, तारे यांच्या कक्षा निश्चित केल्या
आहेत. प्रत्येकाचे कार्य निश्चित आहे. शक्ती दिली आहे.
हे सर्व त्या एकाने केले आहे हे पाहून त्याच्याविषयी
कृतज्ञता वाटते. परंतु आज माणूस स्वाभाविक गोष्टीच
विसरला आहे.

©www.madhaveeraghuvee.com

१५ डिसेंबर २०१२

यो देवानां प्रभवश्चोद्भवश्च
विश्वाधिपो रुद्रो महर्षिः।
हिरण्यगर्भं जनयामास पूर्वं
स नो बुद्ध्या शुभया संयुनक्तु॥४॥

इथे रुद्राची प्रार्थना व स्तुति केली आहे. या रुद्रानेच अनेक देवतांना (शक्ती / इंद्रिये) निर्माण केले, त्यांचे वर्धन केले आहे. तोच या विश्वाचे रक्षण करतो. तो सर्वज्ञ आहे.

सात स्वर्ग व सात पाताळ अशी १४ भुवने निर्माण करण्यापूर्वी त्याने हे मायाधारक प्रचंड कवच निर्माण केले. विराटाची निर्मिती केली असा जो देवांचा निर्माता, विश्वाचा अधिपती, सर्वज्ञ, हिरण्यगर्भाला निर्माण करणारा, त्याने आम्हाला शुभबुद्धीशी जोडावे. चांगली बुद्धी द्यावी. सर्वात परमात्म्याचे दर्शन घेणे म्हणजे शुभबुद्धी!

तो उद्भव म्हणजे वर उचलणारा, उन्नति करणारा, वैभव देणारा आहे. देवता म्हणजे इंद्रिये. त्यांना उत्पन्न करणारा व शक्ती देणारा तोच आहे.

रुद्र- रोदयति (रडवणारा) इति रुद्रः।

या ते रुद्र शिवा तनूरघोराऽपापकाशिनी।
तया नस्तनुवा शन्तमया गिरिशन्ताभिचाकशीहि॥५॥

हे रुद्रा तुझे जे सौम्य (अघोर) व पुण्याने (अपाप) प्रकाशित होणारे रूप आम्हाला दाखव. हे रुद्रा, तुझी शिव तनु आम्हाला दिसू दे. पर्वतावर राहणाऱ्या शिवा तुझी शांत मूर्ती आमच्यासमोर प्रकाशित होऊ दे.

रुद्र हा कशाचा स्वामी मानला तरी जीवनात प्रत्यही त्याची कृपा हवीच. नको ते काढून टाकण्याचे काम शिवच करत असतो. तो शंकर कल्याण करणारा आहे.

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

शिवाची दोन रूपे - घोर व सौम्य - आहेत.
अभिचाकशीहि - प्रकाशीत हो, कृपादृष्टीने पहा.
रुद्रचे अनेक अर्थ आहेत.
१. रुदं द्रावयति - रोगांना दुःखांना पळवून लावणारा - सौम्य
२. रोदयति - रडवणारा ——— घोर
कशिनी - सौम्य शांत व पुण्याने प्रकाशित होणारी मूर्ती
भक्ताजवळ पुण्य नसेल, सदाचार नसेल तर केवळ ज्ञानाने परमेश्वराचे दर्शन होणार नाही.

यामिषुं गिरिशन्त हस्ते बिभर्ष्यस्तवे ।
शिवां गिरित्र तां कुरु मा हिंसीः पुरुषं जगत् ॥३॥

हे गिरिशन्त, पर्वतावर राहून कल्याण करणाऱ्या शिवा, जो बाण फेकण्यासाठी तू हातात धारण केला आहेस, तो बाण कल्याणकारी कर. जीवाची (पुरुषं) वा जगाची हिंसा करू नकोस.
इषु [illegible] शब्द आहे.
प्रलयाचा देव असणाऱ्या शिवाच्या हातात बाणाच्या रूपाने विनाशिनी शक्ती आहे. परंतु त्या शक्तीच्या सहाय्याने जगाचा विनाश करू नकोस तर आमच्यातील दोष नाहीसे कर, अविद्या नाहीशी कर. तुझ्या बाणांनी आमचे रक्षण कर. आमचे कल्याण कर.
तू गिरित्र आहेस. हिमालयाचे रक्षण करणारा आहेस. तू आमचे रक्षण कर. शिवाच्या हातातील बाणाला (शूळाला) तीन टोके आहेत. त्या योगे तो त्रिकाया नाश करणारा आहे. तीन लोक, तीन ताप, त्रिपुटीचा नाश करतो.
विष्णु आम्हाला जीवनावश्यक गोष्टी देतो तर शिव नको असणाऱ्या गोष्टींचा, हानि पोहोचवणाऱ्या गोष्टींचा नाश करतो. दोघेही आमचे मंगल, कल्याण करतात.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

September 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

*Priority*

THU AUG 5 2010

५ जानेवारी २०१९

Wk 31, 217-148

8 am

ततः परं ब्रह्मपरं बृहन्तं
यथानिकायं सर्वभूतेषु गूढम्।
9 विश्वस्यैकं परिवेष्टितारं
ईशं तं ज्ञात्वामृता भवन्ति ॥७॥

10

मागील मंत्रात जीव जगताचे रक्षण करण्याची विनंती केली होती. आता हा रुद्र त्याहीपलीकडचा आहे, त्याहून श्रेष्ठ आहे. तो बृहत् म्हणजे सर्वत्र भरून राहिला आहे. सर्वव्याप्त आहे. सर्व भूतांमध्ये गुप्तरूपाने राहतो. बाहेरून दिसत नसले तरी शरीराला चालवणारा तोच आहे.

हत्तीपासून मुंगीपर्यंत सर्वांमध्ये तो भरून राहिला आहे. संपूर्ण विश्व यातच आहे आणि हा सर्व विश्वात भरला आहे.

अशा एकमेवाद्वितीय ईशाला जो जाणतो, प्रचीति घेतो अनुभवतो तो अमृत होतो म्हणजेच या जन्ममृत्युच्या फेऱ्यातून मुक्त होतो. त्याला कोणतेही बंधन रहात नाही.

हा सर्व खेळ आहे हे ध्यानात आले की तो या खेळाची गंमत बघत राहून घेऊ शकतो.

5

वेदाहमेतं पुरुषं महान्तम्
आदित्यवर्णं तमसः परस्तात्।
6 तमेव विदित्वाति मृत्युमेति
नान्यः पन्था विद्यतेऽयनाय ॥८॥

7

अहं वेद - मी जाणतो, कुणाला? तर अज्ञान अंधकाराच्या पलीकडे असणाऱ्या आदित्यवर्णाच्या तेजस्वी महापुरुषाला मी जाणतो म्हणजेच अनुभवतो.

त्याला जाणले की मृत्युला ओलांडून जाता येते म्हणजेच जन्ममरणाचा फेरा चुकतो. त्या परमपदापर्यंत (अयन - Destination) पोहोचण्यासाठी दुसरा मार्ग नाही

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

8 am त्याला जाणणे, अनुभवणे, तद्रूप होणे म्हणजे त्याच्या
मध्ये मिसळून जाणे. वेगळेपणाने शिल्लक रहाताच येत
नाही. पाण्याचा लहानसा थेंब समुद्रात मिसळला की
त्याचे अस्तित्व संपून जाते. (पुन्हा) तो बाहेर काढता
10 येत नाही. मी समुद्र झालो हे सांगायला तो परत
येत नाही. मनुष्यजीवनाचे ध्येय हेच असायला हवे.
11 हा मंत्र यजुर्वेदातील आहे. गीता - ८.९
कविं पुराणमनुशासितारम् -------
12 ब्रह्मविद ब्रह्म एव भवति।

1 pm यस्मात् परं नापरमस्ति किंचिद्
यस्मान्नाणीयो न ज्यायोऽस्ति कश्चिद्।
2 वृक्ष इव स्तब्धो दिवि तिष्ठत्येकः
तेनेदं पूर्णं पुरुषेण सर्वम्॥९॥

3
याच्या पलीकडे (परम) कोणी नाही आणि याच्या
4 अलीकडे (अपरम) काहीही नाही. याच्यासारखा श्रेष्ठ
कोणी नाही. त्याच्याहून लहान कुणी नाही. अणुमध्ये तो
5 आहेच तसेच त्याच्यापेक्षा मोठाही कुणी नाही. कारण
तो 'भूमा' आहे. त्याने सर्व ब्रह्मांड व्यापले असले तरी तो
6 दशांगुळे शिल्लक आहे. हा वृक्षाप्रमाणे स्थिर आहे.
प्रकाशमय आकाशात (दिवि) याचा सर्व विस्तार आहे.
7 इदम् म्हणून जे जे दिसते दाखवता येते ते ते सर्व
यानेच भरलेले आहे.
पर - पलीकडे, श्रेष्ठ, कारण (Raw Material)
अपर - अलीकडे, गौण, कार्य
पण याला कोणतेही कारण नाही. हा कशापासूनही
जन्मला नाही. याला आईवडील नाहीत. हा अज आहे.
Birthday / Anniversary न तस्य कारणं विद्यते न तस्य कार्यं विद्यते।

© www.madhaveeraghuveer.com

8 am ज्यान म्हणजे मोठा, वडील! याच्या पेक्षा कोणी मोठा, जुना, वडील नाही. तोच सर्वात जुना, सर्वांच्या आधीचा
9 पुराण पुरुष आहे. थोरला देव (समर्थांच्या शब्दात) आहे. विष्णुसहस्रनामामध्ये त्याला स्थविर (म्हातारा) म्हटले
10 आहे. तो इतका सूक्ष्म (व्यापक) आहे की (सर्वमावृत्य तिष्ठति) त्याच्या अति सूक्ष्मत्वामुळे त्याला जाणणे कठीण आहे.
11 तो चरात आहे तसाच अचरातही आहे. तो हा आहे.
अस्ति भाति प्रिय - सत् चित् आनन्द आहे.
12 न्यूट्रॉन, प्रोटॉन, इलेक्ट्रॉन - वेगाने फिरत आहेत.
∴ तो गतिमान आहे.

1 pm

ततो यदुत्तरतरं तदरूपमनामयम् य एतद् विदुः
2 अमृतास्ते भवन्ति अथ इतरे दुःखमेव अपियन्ति ॥१०

3 ततः - त्यापेक्षा, उत्तरतर - अधिक श्रेष्ठ, अनामय - विकाररहित
(हिरण्यगर्भापेक्षा) जे अधिक श्रेष्ठ (परब्रह्म) आहे त्याला रूप नाही
4 आकार नाही विकार (दोष) नाही. ते शुद्ध आहे.
त्यात कशाचीही मिसळ नाही. केवळ आनंद आहे.
5 अशा परब्रह्माला जाणणारे स्वतः अमृतच होऊन
जातात. परंतु त्याला जे जाणत नाहीत त्यांच्या वाट्याला
6 दुःखच येते. या परब्रह्माचा अनुभव आला की साधक स्वतः
ज्ञानस्वरूप, आनंदस्वरूप बनतो. कोणतीही उपाधि त्याला
7 बाधू शकत नाही. देही असून विदेही होतो. या मृत्युलोकात
राहत असून दुःख शोकाच्या पलीकडे जातो. स्वतः
आनंदमय होतो. नन्दति नन्दति नन्दत्येव।
परंतु ही स्वानंदाची अनुभूति ज्याची त्यालाच येते.
कारण तो सद्वस्तु इंद्रियगोचर नाही. तो स्वसंवेद्य आहे.
तो प्राप्त करणे हेच जीवनाचे सर्वोच्च ध्येय असायला
Birthday / Anniversary हवे.

© www.madhaveeraghuveer.com

8 am सर्वाननशिरोग्रीवः सर्वभूतगुहाशयः।
सर्वव्यापी स भगवांस्तस्मात् सर्वगतः शिवः॥

पुरुषसूक्त - सहस्रशीर्षा:
10 ३३ वा अध्याय - सर्वतः पाणिपादं तत्
या जगात दिसणाऱ्या सर्वांमध्ये तो एकच आहे,
11 त्यांच्या मुखामध्ये, मस्तकामध्ये, मानमध्ये तोच तर आहे
तो सर्वगत आहे. तो मंगल करणारा आहे.
12 मुख (आनन) भोगशक्ती
मस्तक — ज्ञानशक्ति
1 pm मान — आधार शक्ति
या तीनही शक्ती त्याच्याच आहेत.
2 सतशक्ती, ज्ञानशक्ती व आनंदशक्ति त्याच्या आहेत.
संधिनी, संवित, आल्हादिनी शक्ती " "
3 या शक्ती सर्वांमध्ये आहेत. तो सर्वांमध्ये आहे.
तो सर्वांत व सर्व त्याच्यात आहेत.
4 सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि।

5 महान् प्रभुर्वै पुरुषः सत्वस्यैष प्रवर्तकः।
सुनिर्मलामिमां प्राप्तिमीशानो ज्योतिरव्ययः॥१२॥

6 ईश्वर हा महान प्रभु, समर्थ, स्वामी आहे. या सृष्टीची
7 उत्पत्ति-स्थिति-संहार करण्याचे सामर्थ्य त्याच्यात आहे.
तो ईशन करणारा शासक आहे. अव्यय म्हणजे अविकारी आहे
ज्योति - प्रकाशस्वरूप, देहपुरीमध्ये राहणारा (पुरि शेते इति)
पुरुष आहे. त्याची स्वरूपस्थिति अत्यंत निर्मळ आहे म्हणून तो
सुनिर्मल आहे. परमपदाच्या प्राप्तिसाठी सत्व म्हणजे अंतःकरणाला
प्रवृत्त करणारा आहे. त्याच्यामुळेच प्रत्येकाला जिज्ञासा आहे
प्रेरणा आहे. तोच अंतःकरणातील अधिष्ठान आहे.



© www.madhaveeraghuveer.com

९ जानेवारी २०१९

8 am तो आनुन शुभसंकेत देत असतो. स्फूर्ति देत असतो
तो महान म्हणजे असीम, सद्गुणांनी संपन्न नतेच
9 देश कालाने अपरिच्छिन्न आहे. तो पूज्य, स्वामी आहे.

10 अंगुष्ठमात्रः पुरुषोऽन्तरात्मा
सदा जनानां हृदये संनिविष्टः
11 हृदा मन्वीशो मनसाभिक्लृप्तो
य एतद्विदुरमृतास्ते भवन्ति ॥ १३॥

12 जन्मलेल्या प्रत्येकाच्या हृदयात राहणारा तो आत्माराम
1 pm ज्याच्या त्याच्या अंगठ्याच्या पेराएवढा असतो. तो
मन्वीशः म्हणजे मनन करणाऱ्या मनाचा स्वामी आहे.
2 त्याच्यामुळेच मनाला विचार करण्याची शक्ती प्राप्त
होते. तो ज्ञानाचा अधिपती आहे. तो हृदयस्थित
3 मनाकडून सुरक्षित ठेवला जातो.
सूर्याची किरणे जशी सर्वत्र पसरून प्रकाश
4 देतात तशी या हृदयस्थ ज्योतिची किरणे शक्तीरूपाने
सर्व शरीरभर पसरतात. दृक्‌शक्ती, श्रवणशक्ती
5 हृदा या पदामध्ये हृ धातुचा अर्थ हरण करणे
असा घेतला तर हृद हे उपसंहाराचे स्थान आहे.
6 जिथे वृत्तींचा लय होतो, सर्व शक्ती जिथे एकत्र मिळून
जातात ते हृत हे सबीज परमात्म्याचे नाव आहे.
7 सुषुप्तीमध्ये 'मी'चा लय झालेला असतो. 'मी'
चे विस्मरण होते. मी सुंदर-कुरूप, शिक्षिका-डॉक्टर
राजा-भिकारी याची जाणीव उरत नाही. जागृतीत वैर
असणारे देखील सुषुप्तीमध्ये भान हरपून एकत्र असतात
सासू-सून / साप-बेडूक त्यामुळे गाढ झोपेत त्यांचे
अस्तित्व समजत नाही. स्वभावस्थित मनाच्या संकल्पामुळे
नाही. जागृतीमधील व्यवहारात 'मनोमा' बुद्धीमुळे

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am त्यांचे अस्तित्व लक्षात येत नाही परंतु या तिन्ही अवस्थांमध्ये तो असतोच. तो सुरक्षित परंतु
9 लपलेला आहे. गुप्त आहे. ज्यांना त्याचे हे रहस्य समजते ते मुक्त होतात.

10

सहस्रशीर्षा: पुरुष: सहस्राक्ष: सहस्रपात्।
11 स भूमिं विश्वतो वृत्वात्य दशांगुलम् ।।१३।।

12 पुरुषसूक्तातील हे मंत्र ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेदातील संहितेत येतात. इथे सहस्र म्हणजे अनंत आहे.
1 pm जीवातही तोच आहे जगातही तोच आहे. सीमितही तो आणि असीमही तोच आहे. आतही
2 तो व बाहेरही तोच आहे.
सर्व प्रकृतिला व्यापून (भूमि) तो दशांगुळे उरला
3 आहे. दशांगुळे म्हणजे शब्दश: अर्थ न घेता पाच ज्ञानेंद्रिय पाच कर्मेंद्रिये यांच्यापलीकडे तो आहे.
4 तसेच सर्व दिशा वा दशांच्या पलीकडचा आहे.
तो कारणातीत, गुणातीत, कालातीत, विषयातीत
5 आहे. अथर्वशीर्ष - त्वं गुणत्रयातीत: देहत्रयातीत: कालत्रयातीत: ,अवस्थात्रयातीत:
6 त्वं मूलाधार स्थितोऽसि नित्यम्।

7 पुरुष एवेदं सर्वं यद्भूतं यच्च भव्यम्।
उतामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति ।।१४।।

इदम् म्हणजे जे जे दाखवता येते ते ते सर्व म्हणजे हाच आहे. जे होऊन गेले किंवा होणार आहे व वर्तमानात जो अन्नाने वाढतो ते ते सर्व म्हणजे हाच पुरुष आहे.
Birthday / Anniversary तो निर्माण करतो, तोच तारतो, तोच मारतो.

© www.madhaveeraghuveer.com

September 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

*Priority*

WED
AUG
2010
11
Wk 32, 223-142

8 am अपघातातून आश्चर्यकारकरीत्या वाचवणारा तोच नियंता
आहे. तो अमृतत्वाचा ईशान(स्वामी) आहे.
9 देव तारी त्याला कोण मारी
मीराबाई, वेणाबाई।
10 तोच सर्व आहे, सर्वांमध्ये आहे, सर्वांपलीकडे आहे.

11 सर्वतः पाणिपादं तत् सर्वतोऽक्षिशिरोमुखम्।
सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति।
12 सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितम्।
1 pm सर्वस्य प्रभुमीशानं सर्वस्य शरणं बृहत्॥१७॥

2 याला एकही इंद्रिय नाही पण तरीही सर्व शक्तींनी
तो युक्त आहे. या सृष्टीतील कणाकणामध्ये हा
3 ऐकू शकतो, पाहू शकतो, वास-चव-स्पर्श करू शकतो.
त्याला कळणार नाही असे स्थानच नाही.
4 हा सर्वांचा स्वामी आहे. सर्वांपेक्षा बृहत (मोठा)
आहे, सर्वांना आश्रय(शरण) देणारा आहे. याच्यामुळेच
5 सृष्टीचे व्यवहार चालतात. तो सर्वांचे रक्षण, नियंत्रण करतो.
हा ईशान(राष्ट्रपती) आहे तसेच नियंता (प्रधानमंत्री)
6 आहे. तो ताब्यात ही ठेवतो रक्षणही करतो.
प्रत्येक हृदयातील स्पंदनामध्ये तोच जाणवतो.
7 त्या फुलाच्या गंधकोषी सांग तू आहेस का?

नवद्वारे पुरे देही हंसो लेलायते बहिः।
वशी सर्वस्य लोकस्य स्थावरस्य चरस्य च॥

सर्व स्थावर(अचर) जंगम(चर) गोष्टींवर त्याचीच
Birthday / Anniversary सत्ता आहे. नऊ दारे असणाऱ्या या शरीररूपी पुरात

© www.madhuveer.com

8 am तो राहतो म्हणून त्याला 'देही' म्हणतात.
हंस - अविद्याजनित कार्याचे हनन करणारा
9 तो हंस आहे. या देहात राहून बाहेरचे सर्व व्यवहार
करणारा तो हंस आहे.

10

अपाणिपादो जवनो ग्रहीता
11 पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः
स वेत्ति वेद्यं न च तस्यास्ति वेत्ता
12 तमाहुरग्र्यं पुरुषं महान्तम् ॥१९॥

1 pm हात पाय नसूनही हा वेगाने ग्रहण करतो, जातो.
डोळे नसून सर्व बघतो. कान नसून सर्व ऐकतो.
2 असा त्याला महान अग्र्य पुरुष म्हटले आहे.
तो सर्वांत आधी (जन्मलेला) आदि आहे.
3 किंवा अग्र म्हणजे टोक, सुर्वात सुरुवातीला तोच
होता, व शेवटी देखील तोच आहे.
4 तो पूर्ण पुरुष महान आहे.

5 अणोरणीयान्महतो महीयान्
आत्मा गुहायां निहितोऽस्य जन्तोः।
6 तमक्रतुं पश्यति वीतशोको
धातुः प्रसादान्महिमानमीशम् ॥२०॥

7
सूक्ष्माहूनही सूक्ष्म आणि मोठ्याहूनही मोठा असणारा
हा जीवरूपी गुहेत लपलेला आहे. जीव म्हणजे
प्रत्येक जीव ब्रह्मदेवापासून ते मुंगीपर्यंत! त्याची
कृपा झाली तरच त्याचे दर्शन घडते.
तो अक्रतु म्हणजे जो कर्ता/भोक्ता नाही तो!
 त्याचे दर्शन घेण्यासाठी आपण संकल्परहित व्हायला ह

September 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

*Priority*

FRI AUG 2010 13

Wk 32, 225-140

धातु < विधाता - त्याच्या प्रसादाने (कृपेने) दर्शन होते.
8 am इंद्रिये - विषयदोष काढून टाकल्याने प्राप्त होते

9 वीतशोक - ज्याचा शोक निघून गेला आहे त्याची बुद्धी सम होते. चांगल्या वाईट कोणत्याही गोष्टीने तो

10 हलत नाही. जो भेदांपलीकडे, द्वंद्वांपलीकडे गेलेला असतो त्यालाच परमेश्वराचे दर्शन घडते, अनुभवता येतो.

11

वेदाहमेतमजरं पुराणं सर्वात्मानं सर्वगतं विभुत्वात ।
12 जन्मनिरोधं ~~[illegible]~~ प्रवदन्ति यस्य
ब्रह्मवादिनो हि प्रवदन्ति नित्यम् ॥२१॥

1 pm

ज्याला मी जाणतो त्या ब्रह्मतत्त्वाचे वर्णन करताना
2 द्वितीया विभक्ति वापरली आहे.
एतम् अजरम् पुराणम् सर्वात्मानम् सर्वगतम् ।

3 ज्याला जाणायचे आहे तो वास्तविक दुसरा नाही त्याच्याशी एकरूप होऊन त्याला जाणले तरच खरे
4 आत्मज्ञान होते. परंतु अविद्येमुळे तो वेगळा, भिन्न वाटतो. अविद्या सुविद्येमध्ये पालटली की मग खरे
5 ज्ञान होते. मी तोच आहे हे समजते.

असा त्याला ब्रह्मवादी अजन्मा म्हणजे जन्माला न
6 येणारा असे म्हणतात. तर जन्मनिरोध म्हणजे जन्ममृत्यूच्या चक्रातून सोडवणारा असा अर्थ आहे. तो नित्य आहे
7 शाश्वत, चिरंतन आहे. तो विभु म्हणजे विशेषत्वाने सर्व व्यापणारा असल्याने सर्वत्र पोहचतो. त्याला विकार
नाहीत म्हणून म्हातारपण नाही. असा पुराण पुरुषाला मी जाणतो.

© www.madhaveeraghuveer.com

११ जानेवारी २०१९

## चतुर्थोऽध्यायः। २२ मंत्र

8 am
य एकोऽवर्णो बहुधा शक्तियोगाद्
9 वर्णाननेकान् निहितार्थो दधाति
वि चैति चान्ते विश्वमादौ स देवः
10 स नो बुद्ध्या शुभया संयुनक्तु ॥४॥

11 आदौ म्हणजे आधी हा एकटाच होता. त्याच्या संकल्पाने प्रकृति पुरुष निर्माण झाले. त्याच्यामध्ये ज्ञान, बल, क्रिया
12 या स्वाभाविकी शक्ती आहेत. त्यांच्या सहाय्याने त्याने हे अनेक वर्ण-रूप-आकार यांनी युक्त अशी
1 pm विविधरंगी सृष्टी बनवली. या प्रयोगासाठी त्याला कोणतेही कष्ट करावे लागले नाही. कल्पांतकाळी हे
2 विश्व पुन्हा त्याच्यामध्येच विलीन होते.
आधी तो एकटा व शेवटी तो एकटाच असतो.
3 मध्ये हे विश्व फक्त भासते.
ही लीला करणारा जो एकमेव देव आहे तो आम्हाला
4 शुभ बुद्धी देवो. व्यावहारिक जगात सर्वांचे हित ज्यात आहे ते सर्व शुभ आहे तर पारमार्थिक जगात त्याच्याशी
5 एकरूप होण्याचा ध्यास लागणे हे शुभ आहे असे शुभ करण्याची सद्बुद्धी त्याने आम्हाला द्यावी.
6 तो स्वतः निर्विशेष (सामान्य) आहे, तरीही शक्तींच्या माध्यमातून काहीही प्रयोजन नसताना विविध रूपे तो धारण
7 करतो. जेव्हा सृष्टी भासमान होते, तेव्हा ती त्याच्यातच असते आणि शेवटी त्याच्यातच विलीन होते.
निहित - लपलेला, परमेश्वर जेव्हा जीव उपाधि धारण करतो तेव्हा पशु पक्षी, जीव जंतु, मनुष्य यात सर्वांना बीजावस्थेत धारण करतो तेव्हा तो आत लपलेला असतो.
शुभ बुद्धीला त्या नित्याचा ध्यास लागू दे. तिला
Birthday / Anniversary अनित्याचा मोह होऊ देऊ नको.

8 am तदेवाग्निस्तदादित्यस्तद्वायुस्तदु चन्द्रमा।
तदेव शुक्रं तद्ब्रह्म तदापस्तत् प्रजापतिः॥२॥

9 व्यवहारात अग्निचा शोध ही महत्वपूर्ण घटना आहे.
10 त्यानंतरच मानवी संस्कृतीचा विकास झाला. या
अग्निमुळे ऊब मिळते, अन्न मिळते, सुरक्षा मिळते (यज्ञ)
11 या अग्निचे रूप घेणारा ही तो परमात्माच
आहे. तसेच आकाशातील आदित्यामुळेच दिवस-रात्र
12 ऋतु होतात. पाऊस पडतो, धान्ये पिकतात. किरणातून
ऊर्जा मिळते. त्यातून जगाचे कल्याण होते. त्या आदित्या
1 pm मध्ये हाच आहे. वायुमुळेच श्वास आहे, शीतलता आहे,
चैतन्य आहे, चलनवलन आहे. त्या वायुत हा आहे.
2 चंद्रमा तर औषधीतत्व देणारा, धान्याला पौष्टिकता
देणारा, मनाला शांति देणारा असा आहे. त्या चंद्रामध्ये
3 देखील हा आहेच. शुक्र म्हणजे तेजस्वी, प्रजोत्पत्ति करणारा
समाज घडवणारा असा आहे. तेही याचेच रूप आहे.
4 अथर्वशीर्ष - त्वं ब्रह्मा त्वं विष्णु त्वं रुद्र त्वंइंद्रः ---
शिवमहिम्न - त्वमर्कस्त्वं सोमस्त्वमसि पवन ------
5 शुक्र - तेजस्वी दीप्तिमान
अग्नि - वाक्‌शक्ती
6 आदित्य - दृक्‌शक्ती
वायु - चलनवलनशक्ती
7 चंद्रमा - मनःशक्ती
शुक्र - बीजशक्ती
आप - स्वादशक्ती
प्रजापती - जननेंद्रिय सुख
सारांश काय तर सर्व शक्तींचा स्वामी असणारा तोच
एकमेव आहे.

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

नीलः पतङ्गो हरितो लोहिताक्षः
तडित् गर्भ ऋतवः समुद्राः।
अनादिमत्त्वं विभुत्वेन वर्तसे
यतो जातानि भुवनानि विश्वा ॥४॥

नीलः - निळे आकाश, पतंग - सूर्य हरित - दिशा लोहिताक्ष - अग्नि, तडितगर्भ - मेघ (ज्याच्या पोटात वीज आहे असा) सहा ऋतु सात समुद्र या सर्वांमध्ये तूच आहेस. तुला जन्म नाही. तू स्वतःसिद्ध आहेस. तू सर्वांना व्यापणारा विभु आहेस, ज्याच्यापासून अनेक भुवने निर्माण झाली असा तू मात्र अनादि आहेस. तू कोणाहीपासून निर्माण झालेला नाहीस. जगाला आरंभ आहे म्हणजेच जग आदिमत् असले तरी तू मात्र अनादिमत आहेस. देश कालाने तू परिच्छिन्न नाहीस.

त्वं स्त्री त्वं पुमानसि त्वं कुमार उत वा कुमारी।
त्वं जीर्णो दण्डेन वञ्चसि त्वं जातो भवसि विश्वतोमुखः

घराघरातून वत्सलता, दया, क्षमा, प्रीति, सोशिकता या गुणांनी युक्त गृहिणी होऊन तू वंशाचे सातत्य राखतोस. उद्यम, सामर्थ्य, पोषण, कर्तव्यपालन करण्यासाठी पुरुष रूपाने तूच प्रगट होतोस. निष्पाप (कोवळी) बालक बालिकांच्या रूपाने तूच भेटतोस.

दुडुदुडु धावत खुदुखुदु हासत
हरि खेळे ग माझ्या अंगणी।
तोच बोलतो बालमुखातून.
तोच डोलतो उंच पिकातून
कधी होऊनि देव भिकारी। भजनासाठी मारी पुकारी
अवतीभवती असुनि दिसेना। शोधितोस आकाशी ॥

Birthday / Anniversary

© www.madhaveeragluveer.com

ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध, अनुभवसमृद्ध असा कुटुंबाचा आधार असणाऱ्या ज्येष्ठांच्या रूपाने तूच तर असतोस.

सर्व रूपांच्या सर्व अवस्थांमधून तूच आहेस. पाण्याचा रंग व आकार बदलावा तसे तुझे बदलणारे रूप क्षणोक्षणी प्रगट होत असते.

अजामेकां लोहितशुक्लकृष्णां बह्वी: प्रजा: सृजमाना सरूप:।
अजो ह्येको जुषमाणोऽनुशेते जहात्येनां भुक्तभोगामजोऽन्य:॥

आपल्याप्रमाणेच रूप प्रजा उत्पन्न करणारी लाल, शुभ्र काळ्या रंगाच्या बकरीवर एक बकरा आसक्त होतो व तिचा भोग घेत पडून राहतो. दुसरा बकरा मात्र त्या अनेक भोग भोगणाऱ्या बकरीचा त्याग करतो. तिच्याकडे तो पाहतही नाही.

ब्रह्माहून माया वेगळी करता येत नाही. ती त्याच्यासारखीच अनादि व अजन्मा म्हणजेच अजा आहे. ती तीन वर्णात प्रगट होते.

लाल- रजोगुण शुभ्र - सत्वगुण, काळा- तमोगुण

तिची अनेक नावे आहेत. अविद्या, माया, प्रकृति चिद्रूपा देवात्मशक्ती इ.

आपापल्या मनोभूमिकेमुळे तिचे ते ते रूप दिसते जशी दृष्टी तशी सृष्टी. यातूनच अनेक संप्रदाय निर्माण होतात. आपसात भांडू लागतात.

रुचीनां वैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषाम्।

साधकाने वाद न घालता इतरांच्या मतांचा योग्य तो आदर करावा. बागेतील शेकडो फुलांचे रूप, रस, गंध, गुण भिन्न असले तरी त्यांचा एकत्रित हार सुंदर दिसतो. तसेच प्रत्येक मतातील ग्राह्यांश घेतला तर बुद्धि प्रगल्भ होते. हे करताना विवेक व निष्ठा मात्र हवी

हो त्रिगुणात्मक प्रकृति विपुल प्रजा निर्माण करते
हो पृथ्वी विविध रंगांनी नटते. त्यातत्याच कोणत्यातरी
आसक्तीला जीव चिकटतो; दुःखी होतो. तरी पुन्हापुन्हा
त्या पाशात गुंतत जातो.

त्याउलट विवेकी जीव मात्र पहिल्याच चटक्याने
जागा होतो, मायेच्या आकर्षणापासून दूर सरतो. व
श्रद्धा, भक्ती, ज्ञानाचा आश्रय घेतो.

अज्ञानी मात्र गळाला लावलेल्या आमिषाला भुलतो
व आत्मनाश करून घेतो.

सांख्य मतानुसार पुरुष हा अकर्ता आहे. तो काहीही
करत नाही, नुसता असतो. प्रकृतीच सारा खेळ मांडत
असते. सगळी हौस तिचीच असते.

अमृतानुभव - तो कशातही भाग घेत नाही.
तो सोवळाच असतो. प्रकृति / शक्तीरूपाने घर-संसार
मांडते, नटवते, सजवते, विविध प्रकार करून बघते.

काही जणांच्या मते तो 'अज्ञ' असतो. ज्ञानी असले
काहींच्या मते तोच ईश्वर आहे. तो मायेत अडकत नाही,
तो मायेच्या आधीन नाही तर तो मायेचा स्वामी आहे.

पंचदशी -



केवळ परब्रह्मापुढे त्रिगुणात्मक मायेचा पडदा असतो.
त्यामुळे जे प्रतिबिंब दिसते त्यातील वरचा भाग
म्हणजे मायेला आपल्या ताब्यात ठेवणारा ईश्वर
सर खालचा भाग म्हणजे मायेच्या आधीन असलेला
जीव असतो. म्हणून एक अज्ञ त्या भोगात गुरफटतो
तर दुसरा ईश्वर स्वतंत्र असतो.

© www.madhaveeraghuveer.com

१३ ऑगं. २०१०

मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम्। पंच.
स मायी सृजतीत्याहुः श्वेताश्वेतरशाखिनः॥ १.७.२

मायेची उपाधि घेतली की तो ईश्वर बनतो. तो सृष्टी निर्माण करतो व वासनेची देहबुध्दीची उपाधि असलेला जीव बनतो. एक जीव व दुसरा शिव! वास्तविक दोघेही मुळात ब्रह्मच पण उपाधि मुळे वेगवेगळे वाटतात व वागतातही!

भुक्तभोगाम् - भोक्ता पण प्रकृतीच आहे आणि भोग ही प्रकृतिच आहे. पण ती असे भासवते की भोग घेणारा हा अज आहे. शिवपुरुष तिची ही चतुराई जाणून असल्याने तो तिच्यात अडकत नाही. तादात्म्य मानत नाही. तो मुक्त असतो आणि दुसरा (जीव) तादात्म्य मानतो म्हणून तो बध्द असतो.
असा हा खेळ चालू असतो.

द्वा सुपर्णा सयुजा सखाया
समानं वृक्षं परिषस्वजाते।
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यन
अश्नन् अन्यो अभिचाकशीति।

मुंडक - ३.१.१ हा मंत्र आला आहे.
वस्तुतः द्वौ सुपर्णौ सयुजौ अशी रूपे व्याकरणदृष्ट्या योग्य आहेत. ही आर्ष रूपे आहेत.
एकाच वृक्षावर सख्यभावाने राहणारे हे दोन पक्षी म्हणजे जीव व आत्मा. देहबुध्दी प्रबळ असणारा जीव कर्मांची फळे आवडीने खातो तर वरच्या फांदीवर बसलेला काही न खाताही जास्त तेजस्वी दिसतो. शेवटी समजते की आपले खरे शुध्द, बुध्द आत्मा हेच खरे रूप आहे.

©www.madhaveeraghuveer.com

8 am परंतु वासनांमुळे आपण या दृश्य जगात गुरफटतो
जसजसे पूर्वजन्माचे संस्कार व वासना कमी होत
9 जातात तसतसे खरे शुद्ध रूप ध्यानात येते.
वास्तविक जीव शरीराची उपाधि मानतो म्हणून
10 तो बंधनकारक आहे. मानतोच नाही तर तो
मुक्त आहे, शुद्ध आहे.

11

समाने वृक्षे पुरुषो निमग्नो
12 ऽनीशया शोचति मुह्यमानः।
जुष्टं यदा पश्यत्यन्यमीश
1 pm मस्य महिमानमिति वीतशोकः॥

2 या शरीररूपी वृक्षावर हृदयरूपी घरट्यात राहणारा
एक पुरुष (जीव) आपल्या शरीरालाच मी समजून
3 त्यातच अडकतो. मी-माझे म्हणत असतानाच
त्याच्या आयुष्यावर त्याचा ताबा नसतो. परिस्थिती
4 किंवा फळ त्याच्या इच्छेनुसार नसते. त्यामुळे तो
स्वतःला हतबल समजतो व दुःखी होतो.
5 तर त्याच वेळी वरच्या फांदीवरचा पक्षी अधिक
तेजस्वी दिसतो. समर्थ असतो. हे कसे काय? बाह्य
6 परिस्थिती काहीही असली तरी त्याची इंद्रिये स्वैर
नाहीत. तर त्याच्या ताब्यात आहेत. याला कशाचाच
7 मोह नाही. विषयोपभोगात रस नाही. त्याचे मनावर
नियंत्रण आहे. शरीर हे मला मिळालेले उपकरण आहे
हे जाणून असल्यामुळे त्याचे सामर्थ्य फार मोठे आहे
एकदा त्याचा मोठेपणा व त्याचे कारण कळल्यावर
खालचा पक्षी जसजसा वर जाऊ लागतो तसतसा त्यालाही
फळे खाण्याचा मोह सुटत जातो. व तो त्या शुद्ध
 स्वरूपाशी एकरूप होतो. त्या श्रेष्ठ पक्षाला जाणून तो स्वतः

September 2010 | Priority | SAT AUG 21 | Wk 33, 233-132

१५ जानेवारी २०१०

ब्रह्म होतो मग कुठला शोक? कसले पाप?
तो वीतशोक होतो, अमृत होतो.
त्याला समजून चुकते की हे सारे जग म्हणजे त्या ईश्वराचे ऐश्वर्य आहे. आणि मग त्याला सर्वत्र त्याच्या महिम्याचे दर्शन होऊ लागते, सर्वत्र आनंदीआनंद!
जुष्ट - भक्तांकडून सेवित
जुष - तृप्त होणे सेवा घेणे | अनायजुष्ट - शोभणारे आयीनान
अनीशया - असमर्थतेमुळे

ऋचो अक्षरे परमो व्योमन्
यस्मिन् देवा अधि विश्वे निषेदुः।
यस्तं न वेद किमृचा करिष्यति
य इत् तद् विदुस्त इमे समासते ॥८॥

ज्या ठिकाणी सर्व देव त्या पुरुषोत्तमाची सेवा करतात त्या परम आकाशात हे सर्व वेद देवतारूपाने रहातात व त्या परमात्म्याची सेवा करतात. असे ते परमाकाश अक्षर आहे. त्या आकाशापेक्षा विशाल, निरुपाधिक, अनादि चिद्घन, अंतर्बाह्य आनंदाने भरलेले भव्य दिव्य उदात्त व श्रेष्ठतम असा तो परमात्मा आहे. त्याचे वर्णन करताना वेद मौन होतात तर ऋचा कशी काय स्तुति करू शकतील? वाणी, बुद्धी, मन मुग्ध होऊन जाते. अशा त्या परात्पर ब्रह्मात सर्व काही सामावले आहे. सर्व चराचर विश्वाला त्याचाच आधार आहे. ही जाणीव होण्यातच खरे तर आयुष्याचे सार्थक आहे. मात्र समजून न घेता केलेले वेदपठण, पूजापाठ, यज्ञयाग हे सारे व्यर्थ आहे. जशी अज्ञानाशिवाय नारवारी तसा प्रकार आहे.
तुकाराम - वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा
येरांनी वहावा भार माथीं ॥

Birthday / Anniversary

© www.madhaveerghuveer.com

स्वानुभवाविण वेदांताची पोपटपंची वाया।
स्वप्नी अमृत पिऊनि कुणाची अमर जाहली काया॥

तर कबीर म्हणतात -
पोथी पढी पढी जग मुआ हुआ न पंडित कोय।
ढाई अक्षर प्रेम का पढे सो पंडित होय॥
परमे व्योमनि - भूताकाश, चित्ताकाश, चिदाकाश
म्हणजेच प्रत्यक् चैतन्याभिन्न ब्रह्मतत्त्व।

छन्दांसि यज्ञाः क्रतवो व्रतानि
भूतं भव्यं यच्च वेदा वदन्ति।
अस्मान्मायी सृजते विश्वमेतत्
तस्मिंश्चान्यो मायया संनिरुद्धः॥९॥

जे काही होऊन गेले आहे, किंवा होणार आहे म्हणजे वेद, यज्ञ, क्रतु, व्रते - हे सर्व तो मायी (मायेची उपाधि घेतलेला) परमेश्वर निर्माण करतो व तो दुसरा असतो (जीव) तो मात्र मायेने बांधला जातो.
यज्ञ हे सर्वसाधारणपणे सकाम असतात तर क्रतु निष्काम किंवा निस्वार्थपणे जनकल्याणासाठी केले जातात.

अस्मात् - १. या ब्रह्मापासून } असे २ अर्थ आहेत
२. वेदांपासून

ब्रह्मदेव सृष्टीची निर्मिती करण्यापूर्वी तप करतो. मागील सृष्टी आठवून तसेच करतो. त्यासाठी तो वेदांचे मार्गदर्शन घेतो. सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः
ईश्वर मायी आहे तर जग हे मायिक आहे
तो जग निर्माण करतो व जीव त्या मायेत बांधला जातो
म्हणजे जो बंधन मानतो तो बद्ध। परंतु ज्याला आत्मा व माया यांचे खरे स्वरूप समजते तो मुक्त।



© www.madhaveeraghuveer.com

मायां तु प्रकृतिं विद्यान्मायिनं तु महेश्वरम् ।
तस्यावयभूतैस्तु व्याप्तं सर्वमिदं जगत् ॥१०॥

माया म्हणजेच प्रकृति ! तिचा स्वामी म्हणजे महेश्वर ! त्याच्या भिन्न भिन्न अवयवांपासून हे जग निर्माण झाले आहे. त्याने हे सर्व ब्रह्मांड भरून टाकले आहे. तो सर्वत्र व्याप्त आहे.

जादूगार जसा जादूने काल्पित सृष्टी निर्माण करतो त्याप्रमाणे विश्व हा भास आहे. मनोकल्पित आहे. खरे नाही खरे आहे ते केवळ एकमेव ब्रह्म ! ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या ।
मायावी ब्रह्म स्वतःला या अनंतरूपाने प्रकाशित करते म्हणजे दाखवते. जे रूप असलेले नसते अवयव दिसतात.

या योनिं योनिमधितिष्ठत्येको
यास्मिन्निदं स च वि चैति सर्वम् ।
तमीशानं वरदं देवमीड्यं
निचाय्येमां शान्तिमत्यन्तमेति ॥११॥

विश्वात ज्या निरनिराळ्या योनि दिसतात त्या सर्वांमध्ये हाच राहतो. निर्माण झालेल्या प्रत्येक वस्तूत व प्राण्यात हा आहेच. यातूनच सर्व निर्माण होते व यातच सर्व सामावले आहे. असा तो सर्वांचे नियंत्रण करतो - ईशानम् सर्वांना वर देतो - वरद, स्तुति करण्यास योग्य आहे ईड्यम् । त्याला जाणणाऱ्याला परम शांति प्राप्त होते. मुक्ती प्राप्त होते. गुरूच्या उपदेशाने त्याला स्वतःचे रूप कळते व तो ब्रह्माशी एकरूप होतो.



©www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | 31 | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |

यो देवानां प्रभवश्चोद्भवश्च
विश्वाधिपो रुद्रो महर्षिः।
हिरण्यगर्भं पश्यत जायमानं
स नो बुद्ध्या शुभया संयुनक्तु।

इथे रुद्राला प्रार्थना केली आहे. ज्याच्या गर्भात हिरण्य आहे अशा प्रचंड विराटाला निर्माण होताना ज्याने पाहिले आहे असा रुद्र (ब्रह्म) आहे. तोच या विश्वाचा स्वामी आहे तो सर्वज्ञ आहे. देवांचा निर्माता, पालनकर्ता व संहारकर्ता तोच आहे.

ऐतरेय उपनिषद - आधी एक मोठे अंडे निर्माण झाले, नंतर त्याला अवयव फुटले. त्या अवयवातून देव निर्माण झाले. या अंड्यात १४ भुवने सामावलेली होती.

अशा रुद्राने आम्हाला शुभ बुद्धी द्यावी, जी व्यवहारात सर्वांचे हित पाहणारी व परमार्थात परब्रह्माला जाणणारी अशी आहे

यो देवानामधिपो यस्मिंल्लोका अधिश्रिताः।
य ईशे अस्य द्विपदश्चतुष्पदः कस्मै देवाय हविषा विधेम।

विविध शक्तींची रूपे म्हणजे देव. ब्रह्मच हे विश्व चांगल्या रीतीने चालण्यासाठी देवांना शक्ती देतो. त्यामुळे सर्व देवांवर त्याचेच शासन आहे. देव त्याला भितात.

भयाद् अस्य अग्निः तपति भयात् तपति सूर्यः।
भयाद् इन्द्रश्च वायुश्च मृत्युर्धावति पञ्चमः।
भीषा अस्मात् वातः पवते भीषा उदेति सूर्यः।
भीषा अस्मात् अग्निः चन्द्रश्च मृत्युर्धावति पञ्चम इति।

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

याच्यामध्ये १४ भुवने आहेत. हा द्विपाद, चतुष्पाद, पशु-पक्षी सर्वांचे ईशन करतो. अशा याला सोडून दुसऱ्या कोणत्या देवाला हविर्द्रव्य अर्पण करून पूजावे? केवळ यालाच पूजावे त्याला सर्व अर्पण करून शेवटी आपणही त्याच्यातच विलीन व्हावे हीच जीवनाची इतिकर्तव्यता आहे.

आमचे सर्व यजन-याजन, पूजा व्रते दान भजन त्याच्याच चरणी समर्पित आहे.

सूक्ष्मातिसूक्ष्मं कलिलस्य मध्ये विश्वस्य स्रष्टारमनेकरूपम्।
विश्वस्यैकं परिवेष्टितारं ज्ञात्वा शिवं शान्तिमत्यन्तमेति ॥१४॥

सूक्ष्मातिसूक्ष्म अणुरेणुमध्ये हा पूर्ण सामावलेला आहे चैतन्याच्या बीजात हाच बीजरूप आहे. अनेकविध सृष्टी निर्माण करणारा, तिला अंतर्बाह्य वेढणारा देखील हाच आहे.

कलिल - रज व वीर्य यांचा संयोग झाल्यावर त्या फलित बीजाला कलिल म्हणतात. त्यातील सूक्ष्म चैतन्य म्हणजे हाच आहे. अणुमधील गतिमान परमाणु हाच आहे. किंवा अविद्येचे कार्य असलेल्या गहन स्थानात हाच राहतो. तो अत्यंत लहान व अत्यंत मोठाही आहे.

परिवेष्टितारम् - सर्वत्र व्याप्त असलेला किंवा सर्वांना वेढून घेणारा असा अर्थ आहे

शिवाय सर्वांना वाटणारा असा तो वाटपी आहे. म्हणजे सर्वांच्या सर्व इंद्रियांना भोग देणाराही तोच आहे. प्रत्येक अवयवाला आनंद तोच देतो.

अशा त्या शिवाला जाणल्यावर, अनुभवल्यावर परम शांति प्राप्त होते सगळी खळबळ संपून जाते. परमशांतिमधील परमानंद प्राप्त होतो.

© www.madhaveeraghuveer.com

8 am
स एव काले भुवनस्य गोप्ता
विश्वाधिपः सर्वभूतेषु गूढः।
9
यस्मिन् युक्ता ब्रह्मर्षयो देवताश्च
तमेवं ज्ञात्वा मृत्युपाशांश्छिनत्ति ॥१५॥
10
सप्त स्वर्ग, सप्त पाताळ तसेच या शरीराचे रक्षण तोच
11 करतो - गोप्ता. तो विश्वाचा अधिप म्हणजे पालनकर्ता
आहे. निर्माण झालेल्या सर्वात तो गुप्त रूपाने राहतो.
12 ब्रह्मर्षि म्हणजे ज्ञानी व देवता म्हणजे शक्ती
या दोन्ही गोष्टी त्याच्याशी जोडलेल्या आहेत. दोघेही
1 pm त्याचेच ध्यान करतात. त्याच्याशी तादात्म्य साधण्यासाठी
देवदेवता व ऋषी आपला अहंकार सोडून प्रयत्नशील
2 राहतात. विशुद्ध अंतःकरणाने नाना प्रकारच्या उपासना व
साधना करून त्याची प्राप्ती करून घेतात. त्याच्याशी लीन
3 होण्याची तळमळ त्यांना लागून राहते. अशा भक्तांवर
तो प्रसन्न होतो आणि जीवाला बांधणाऱ्या कर्मादि
4 मृत्युपाशातून त्यांना मुक्त करतो. म्हणूनच मग तो
साधक पुन्हा जन्माला येत नाही.
5 काले भुवनस्य गोप्ता - म्हणजे मागील कल्पातील
संचित कर्मातून जेव्हा काही कर्म फलोन्मुख होतात तेव्हा
6 जीवाचे त्याच्या कर्मानुसार तो रक्षण करतो.
किंवा काले काले भुवनस्य गोप्ता म्हणजे वेळोवेळी
7 अवतार घेऊन विश्वाचे रक्षण करणारा तो विश्वाधिप
आहे. रक्षण करणे हेच त्याचे काम आहे.

मृत्यु ——— १. शरीर नष्ट होणे
२. अज्ञानी असणे
३. दुःखी असणे
४. परिच्छिन्न / सीमित असणे



©www.madhaveeraghuveer.com

September 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

*Priority*

FRI
AUG
2010
27
Wk 34, 239-126

8 am

घृतात परं मण्डमिवातिसूक्ष्मं
ज्ञात्वा शिवं सर्वभूतेषु गूढम।
विश्वस्यैकं परिवेष्टितारं
ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः॥१६॥

10

तुपावर येणाऱ्या सूक्ष्म निवळीमध्ये त्याचे सर्व सार

11 असते. त्याचप्रमाणे विश्वव्यापी अनंत नमदात्मा आपली सारी महत्ता आवरून घेऊन प्राणिमात्राच्या हृदयात

12 वसत असला तरि ते न कळल्याने अज्ञानी माणसे भौतिकाच्या ओढीने धावपळ करतात.

1 pm

खरे तर दूध हे पौष्टिकच आहे परंतु त्यापेक्षा त्याची साय कमी आकाराची परंतु अधिक श्रेष्ठ

2 त्या सायीचे लोणी-तूप अधिक सत्त्वयुक्त आणि त्या तुपाचा वरचा तवंग (साय) आणखी पौष्टिक।

जितके सूक्ष्म तितके सात्त्विक होत जाते. अधिक

3 कसदार, अधिक शक्तिशाली होत जाते.

4 हा एकमेव देव सर्व भूतमात्रांमध्ये लपून बसला आहे. हा विश्वाचा परिवेष्टिता आहे. सर्वांना व्यापून आहे

5 त्याला जाणले की अविद्येचा, प्रपंचाचा पाश सुटून जातो. त्याला कळून चुकते की तो शुद्ध, बुद्ध मुक्त आहे.

6 त्याचे स्वरूप त्याला कळते.

हे स्वरूप अत्यंत आनंद देणारा असल्यामुळे

7 मुमुक्षु लोकांना अत्यंत प्रिय आहे.

एकदा त्याला जाणले की सर्वच भूतमात्रांविषयी अत्यंत प्रेम वाटू लागते परंतु बंधन मात्र कसलेच उरत नाही.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

Priority



एष देवो विश्वकर्मा महात्मा
सदा जनानां हृदये सन्निविष्टः।
हृदा मनीषा मनसाऽभिक्लृप्तो
य एतद्विदुरमृतास्ते भवन्ति॥१७॥

विश्वनिर्माता परमेश्वर सर्वांच्या हृदयात वास करतो ज्ञानी व विवेकी लोक त्याची महत्ता जाणतात व आपली मन बुध्दी भावना व सर्वशक्ती पणाला लावून त्याला जाणून घेता घेता त्याच्याशी एकरूप होतात. आणि तरीसुध्दा ते संसारात राहून देखील आकाशासारखे अलिप्त असतात.

एकदा का शांती, संतोष, परमशांतीची प्राप्ती झाली की मग त्यांना शोकमोहाचा स्पर्शही होत नाही. त्या स्थितीचे वर्णन करायला शब्दभांडारही अपुरे पडे

त्या महान आत्म्याला हृदयाने, मनाने, मननाने जो जाणून घेतो तो अखंड एकरसस्वरूपाने अभिव्यक्त होतो. असे साधक स्वत: अमृत होतात.

तो विश्वकर्मा विश्व रचण्यात कुशल आहे.

तो महात्मा म्हणजे सर्व काही देऊन टाकणारा आहे.

हृदा म्हणजे जिथे सर्व हरण होते, लय होते अशी सुषुप्ति अवस्था म्हणजे तो आहे.

मनीषा - ब्रह्माकार वृत्तीने ब्रह्म जाणणे

मनसा - ब्रह्मभावनेने ब्रह्म जाणणे.

Birthday / Anniversary

September 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

*Priority*

SUN
AUG **29**
2010
Wk 34, 241-124

२६ जाने. २०१९

8 am यदाऽतमस्तन्न दिवा न रात्रिः
न सन्नचासाच्छिव एव केवलः।
9 तदक्षरं तत् सवितुर्वरेण्यं
प्रज्ञा च तस्मात् प्रसृता पुराणी॥१८॥

10 जेव्हा दिवसही नव्हता, रात्रही नव्हती, आहे-नाही
11 दोन्हीही नव्हते. अंधार नव्हता उजेडही नव्हता तेव्हा
उपाधि विरहित सापेक्षता विरहित असे ते शिवतत्त्व-
12 केवळ स्फुरण पावत होते. त्याच्यापर्यंत मन-बुद्धि-
वाणी पोहोचू शकत नाही. जडचेतनाचा सर्वाधार जो
1 pm आदित्य भास्कर तोही त्याच्यापुढे विनम्र होऊन त्याची
स्मृति जागृत ठेवून प्रकाशत आहे. जे जे काही
2 चांगले, पावन, मंगल, उदात्त ते सारे त्या विशुद्ध
प्रज्ञेतून निर्माण होत राहिले आहे.
इथे अतमा म्हणजे अज्ञानाची निवृत्ती तर
3 पुराणी म्हणजे ब्रह्मापासून सुरू झालेली अनादिसिद्ध।
4 अशी प्रज्ञा! किंवा काहींच्या मते ती श्रद्धा आहे.
सत् म्हणजे सद्गुण (व त्याचे फळ-सुख)
5 असत् " दुर्भावना, दुर्गुण (त्याचे फळ-दुःख)

नैनमूर्ध्वं न तिर्यञ्च न मध्ये परिजग्रभत्।
6 न तस्य प्रातिमा आस्ति यस्य नाम महद्यशः॥१९॥

7 या शिवतत्त्वाची विशालता केवळ अवर्णनीय आहे.
वरून, खालून, तिरपे, बाजूने त्याला पाहणे, देणे, घेणे
केवळ अशक्य आहे. त्याची नामरूपात्मक प्रतिमा बनवता
येत नाही. कोणत्याही मूर्तिरूपात तो बंदिस्त होऊ शकत
नाही. निर्विशेष, निरंजन, विलक्षण अनंत, अव्यय आणि
सनातन असे ते तत्त्व आहे आपण त्याला अनेक नावे देतो

Birthday / Anniversary

© www.madhavagnuveer.com

8 am ब्रह्म, आत्मा, शिव, परमेश्वर परंतु या कुठल्याही नावाने
तो बांधला जात नाही. कोणतेच नाव त्याचे यथार्थ
9 वर्णन करू शकत नाही. ते इंद्रियगम्य नाही.
आत्मरूपाने ते सर्वगत आहे. सहजसुलभ आहे.
10 परंतु तरीही त्याचे ज्ञान सर्वांना होत नाही तर
निर्मळ अंतःकरणाने केलेल्या ज्ञानपूर्वक भक्तीनेच
11 त्या विशुद्धाचे यथार्थ ज्ञान होऊ शकते.
त्यासाठी दृढ वैराग्याने चित्त एकाग्र करून साधना
12 करावी. एकाग्र मन स्थिर की कोणत्याही भौतिक
गोष्टींनी मन विचलित होत नाही. शेवटी ज्ञानोत्तर
1 pm भक्तीतच विलीन होऊन जाते याला दिशांचे बंधन नाही
∴ याचे नावच मुळी मोठे यश आहे. त्याला
2 कुणीही पकडता येत नाही. याच्या सारखा कुणीही नाही,
त्यामुळे त्याला कोणतीही उपमा देता येत नाही
3 न तस्य
तुम्ही न जोडीबुज कोण मोडी?
4 परिजग्रहत - ग्रह म्हणजे धारण करणे, पकडणे.
याला कोणत्याही बाजूने पकडता येत नाही. कारण हा
5 अपरिग्राह्य आहे. निरंश, निरवयव आहे.

6 न संदृशे तिष्ठति रूपमस्य
न चक्षुषा पश्यति कश्चनैनम्।
7 हृदा हृदिस्थं मनसा य एनम्
एवं विदुरमृतास्ते भवन्ति॥२०॥

याचे रूप डोळ्यासमोर आणता येत नाही. त्याला रूप नाही
आकार नाही ∴ चर्मचक्षूंनी तो दिसत नाही. तो स्वसंवेद्य
आहे. रूपादिरहित, निर्विशेष, स्वप्रकाश आहे. त्याला जाणण्यासाठी
साधनेत सातत्य हवे. मन एकाग्र झाले की हे शक्य होते.



© www.madhaveeragiweer.com

IMP

8 am अजात इत्येव कश्चिद भीरुः प्रपद्यते।
रुद्र यत्ते दक्षिणं मुखं तेन मा पाहि नित्यम्॥२१॥

तो अजन्मा आहे तर मनुष्य पुन्हापुन्हा जन्ममृत्युच्या चक्रात अडकतो. तो अव्यय, निश्चल आहे तर हा रोज बदलतो. तो अजरामर तर हा मृत्युभयाने कंपित होणारा भीरु! ही विपरीत स्थिति अविद्येमुळे निर्माण होते आणि म्हणून आपण आपल्या खऱ्या स्वरूपापासून दुरावतो. मानवाचे सार काही त्या विशुद्ध तत्त्वाच्या उलट आहे. आणि म्हणून तो त्या तत्त्वाकडे रक्षण करण्यासाठी प्रार्थना करतो.

तुझ्या दक्षिण मुखाने तू आम्हाला उपदेश कर.

शंकराला पाच तोंडे आहेत - पंचानन आहे. त्याचे दक्षिणामुख हे ज्ञानाचा उपदेश करणारे आहे. आचार्यांचे श्री दक्षिणामूर्ति स्तोत्र प्रसिद्ध आहे

IMP

मा नस्तोके तनये मा न आयुषि
मा नो गोषु मा नो अश्वेषु रीरिषः।
वीरान्मा नो रुद्र भामितो वधीः
हविष्मन्तः सदमित्त्वा हवामहे।

ही रुद्राला केलेली प्रार्थना आहे. हा मंत्र रुद्रसूक्तात आलेला आहे.

हे रुद्रा, आमची मुले बाळे, गायी, घोडे, शेती यांचे रक्षण कर. आमच्या आयुष्यावर घाला घालू नकोस. हे तेजस्वी रुद्रा आमच्या वीरांना मारु नकोस. आम्ही तुला नित्य हविर्द्रव्य घेऊन आहुति देत राहू. तुझ्या उपासनेत, पूजेत नित्य राहू.

Birthday / Anniversary

© www.madhaveerdhuveer.com

September 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

गो - गायी, इंद्रिये, वेद असे अनेक अर्थ आहेत
म्हणजे आमचे पशुधन सुरक्षित ठेव
आमची इंद्रिये सक्षम ठेव
आम्ही वेदांचे अध्ययन पठण करत राहू देत.
अश्व - कठोपनिषदात इंद्रियांना घोडे म्हटले आहे,
हे घोडे स्वैर नसावेत परंतु वेगवान असावेत.
वीर - आमचे नेते धीर वीर असावेत. परिश्रमी आणि
लोककल्याणासाठी स्वार्थ बाजूला ठेवणारे असावेत.
विपत्तीत त्यांचे धैर्य टिकून रहावे. राजकारणात त्यांची
बुद्धि सतेज राहो.
भामिनी - भामित: - तेजस्वी किंवा क्रोधाविष्ट.
तोक तनये - लहान मुले किंवा कमी वयाचे शिष्य
ही गृहस्थाश्रमी ऋषींनी केलेली प्रार्थना आहे.
आपल्या धर्मात प्रपंच व परमार्थ याची फार सुरेख
सांगड घातली आहे. कुठेही लग्न, घर संसार याला
हरकत घेतली नाही. उलट ऋषीपत्नी ही सर्व शिष्यांची
पुत्रवत काळजी घेत असे.

© www.madhaveeraghuveer.com

२४ जानेवारी २०१९

पञ्चमोऽध्यायः १४

अक्षरे ब्रह्मपरे त्वनन्ते
विद्याविद्ये निहिते यत्र गूढे।
क्षरं त्वविद्या ह्यमृतं तु विद्या
विद्याविद्ये ईशते यस्तु सोऽन्यः॥१॥

परात्पर, अनंत, अच्युत अशा ब्रह्माच्या आधारे विद्या आणि अविद्या नांदतात. त्या दोन्ही अव्यक्त आहेत.
शुद्ध सत्वगुणाने युक्त माया असते
तर अशुद्ध / मलिन सत्वगुणाने अविद्या युक्त असते.
काहींच्या मते अविद्या म्हणजेच अज्ञान किंवा अपरा विद्या किंवा माया / प्रकृति आहे.
आणि विद्या / सुविद्या म्हणजे आत्मज्ञान - ब्रह्मज्ञान किंवा जिच्यामुळे ईश्वरी सत्याचे स्वरूप कळते ती विद्या।
लौकिक जीवनात विद्या आणि अविद्या छाया प्रकाशाप्रमाणे एकमेकांत मिसळून गेल्या आहेत. परंतु विवेकाने त्यांचा समतोल सांभाळावा लागतो. अविद्येचा जोर वाढला की जीवन खालच्या पायरीवर उतरते. त्याउलट विद्येचा प्रभाव अधिक असला की जीवन वरच्या स्तरावर पोहोचते.
अविद्येचा अतिरेक झाला की आसक्ती, चंचलता, भ्रम निर्माण होतात. त्याउलट विद्येमुळे विवेक, श्रद्धा, संयम स्वभावात येऊ लागतात. श्रुतीनुसार अविद्या ही क्षर तर विद्या ही अक्षर आहे.
प्रपंच, विषय, विश्व हे सर्व क्षर आहेत. परंतु प्रपंचाचा भोग घेणारा जीव हा अक्षर आहे. तसेच प्रपंचाचा जीव असणारा शिव हा अक्षरच आहे.
मात्र या दोघांचे ईशन करणारा कोणी वेगळाच असतो. तो खरा अक्षर, अविनाशी परब्रह्म - पुरुषोत्तम।
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते।
यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः।
अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः॥

विवेकाने आपल्याला उमगू लागते की साक्षीशिवाय फळ नाही. कार्याशिवाय मुळाक नाही

तशीच विद्या आणि अविद्या यावर ईश्वराचीच सत्ता आहे. या दोन्हीचा समन्वय साधून शेवटी त्या दोन्हीच्या पलीकडे असणाऱ्या परमेश्वराची उपासना करायची आहे.

जीव आणि शिव हे दोन्ही ब्रह्माचेच अंश असले तरी ते ब्रह्म नाहीत. ते उपाधि धारण केलेले आहेत.

त्या दोघांहून अक्षर अनंत ब्रह्म वेगळे आहे.

विद्या व अविद्या या दोन्ही परब्रह्मात अव्यक्त स्वरूपात असते, त्यातील क्षरणाचा हेतू असलेली अविद्या विश्व निर्माण करते व अक्षर विद्या ही मोक्षाचे कारण होते.

विद्या व अविद्या दोन्ही अनादि व प्रवाहरूप आहेत. त्यामुळे त्या नित्य वाटतात. दोन्हीचे अधिष्ठान ब्रह्म आहे ब्रह्मज्ञान झाल्याशिवाय त्यांचा नाश होऊ शकत नाही.

| विद्या | अविद्या |
|---|---|
| जागृती | स्वप्न, सुषुप्ति |
| जगाचे वैयर्थ्य जाणणे | आभासात फसून जाणे. |
| अक्षर | क्षर |

यो योनिं योनिमधितिष्ठत्येको
विश्वानि रूपाणि योनीश्च सर्वाः।
ऋषिं प्रसूतं कपिलं यस्तमग्रे
ज्ञानैर्बिभर्ति जायमानं च पश्येत् ॥२॥

वैविध्याने भरपूर भरलेल्या या विश्वात तो विश्वंभर परमात्मा सर्वत्र भरून उरलेला आहे. सर्व रंग, सर्व आकृती, जलचर, भूचर, खेचर सर्व योनीमध्ये त्याचेच अधिष्ठान आहे. यानेच कपिलाला जन्मताना पाहिले

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

October 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

*Priority*

SAT SEP 2010 **4**

Wk 35, 247-118

8 am त्याला सर्व ज्ञानाने भरून टाकून सर्वज्ञ केले व नंतर त्यांनी इतरांना दिलेले ज्ञानही पाहिले.

9 कपिलमुनींचे सांख्यशास्त्र उपनिषदांना मान्य होते असा निष्कर्ष यावरून काढता येईल.

10 हाच सर्वांचे अधिष्ठान (आधार, बैठक, Base, चैतन्य) आहे. शिवाय अधिष्ठित म्हणजे नियमित करणे असाही अर्थ होऊ शकतो.

11 कपिलमुनि — सांख्यशास्त्राचे उद्गाते किंवा

12 सर्वात प्रथम त्याने सुवर्ण सदृश कपिलवर्णाच्या हिरण्यगर्भाला जन्माला घातले व नंतर त्याला धर्म, 1 pm ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्याने युक्त केले.

या मंत्राच्या पहिल्या दोन ओळीत अविद्येचे अधिष्ठान 2 असलेल्या परमात्म्याचे वर्णन आहे. तर पुढच्या दोन ओळीत विद्येचे अधिष्ठानही हाच आहे असे सांगितले आहे.

3

एकैकं जालं बहुधा विकुर्वन्
4 आस्मिन् क्षेत्रे संहरत्येव देवः।
भूयः सृष्ट्वा पतयस्तथेशः
5 सर्वाधिपत्यं कुरुते महात्मा ॥३॥

6 विविध आकृतींनी भरलेले हे विश्वरूप जाळे, मायेच्या योगाने पसरलेले आहे. या इंद्रजालात मोहाने 7 फसणाऱ्याला कर्मफळे कर्तृत्वभ्रांतीच्या पाशांनी जखडून ठेवतात. सृष्टीच्या प्रलयकाळी परमात्मा त्या सर्वांचा लय करून पुन्हा नवे निर्माण करतो. सृष्टीच्या परिपालनासाठी इंद्रादि लोकपालही तोच निर्माण करतो. त्या सर्वांच्या वरही त्याचीच अबाधित सत्ता आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

सकाळी सूर्याची किरणे जगभर पसरतात व संध्याकाळ झाली की तो ती आवरून घेतो त्याप्रमाणे हा परमात्मा विश्वाचे जाळे फेकतो. सर्वत्र त्याचा पसारा होतो. भिन्न भिन्न प्राणी वस्तू निर्माण करतो. आणि मग वेळ झाली की हे सर्व गुंडाळून ठेवतो. भातुकलीच्या खेळाप्रमाणे रचणे व मोडणे हे सुरू असते. परंतु एकदा संहार झाला की सर्व संपत नाही. तो पुन्हा निरनिराळे लोक निर्माण करतो त्यांची व्यवस्था पाहण्यासाठी लोकपाल निर्माण करतो. त्या सर्व विश्वाचे आधिपत्य तो करतो. त्यावर नियंत्रण ठेवतो. शासन करतो. नीटपणे व्यवस्थित हे विश्व चालवतो. पुन्हा सर्व मोडून टाकतो.

कल्पारंभ व कल्पांत असेच सुरू आहेत.

शरीरात इंद्रियांचे जाळे, समष्टीत सर्व भूतांचे जाळे तो पसरवतो व आवरून घेतो

सर्वा दिश: ऊर्ध्वमधश्च तिर्यक्
प्रकाशयते भ्राजते यदु अनड्वान् ।
एवं स देवो भगवान् वरेण्यो
योनिस्वभावान् अधितिष्ठत्येक: ॥४॥

सूर्याच्या तेजाने जशा दाही दिशा प्रकाशित होतात त्याप्रमाणे हे चराचर विश्व परमेश्वरी तेजाने व्यापून टाकलेले आहे. सूर्य जसा देदीप्यमान होऊन लखलखत राहतो त्याप्रमाणे तो एकच तेजस्वी भगवान प्रत्येक योनीमध्ये त्या त्या स्वभावाचा होऊन राहतो. विंचू, साप, सिंह असा योनीमध्ये तो त्या स्वभावानुसार वागतो. सर्वांना भोजन पुरवणारा तो एकच श्रेष्ठ देव आहे.

Birthday / Anniversary Electricity - उपकरणे.

© www.madhaveeraghuveer.com

यच्च स्वभावं पचति विश्वयोनिः
पाच्यांश्च सर्वान् परिणामयेद् यः।
सर्वमेतद् विश्वमाधितिष्ठति एकः
गुणांश्च सर्वान् विनियोजयेद् यः॥५॥

या जगाचे मूळ कारण परमात्मा। त्याने सृष्टी निर्माण केली. विविधतेने तिला नटवले, सजवले. या भेदयुक्त सृष्टीत तो अभेदरूपाने राहिला.

अविभक्तं विभक्तेषु विभक्तमिव च स्थितम्।

प्रत्येकात राहून त्याने आपले वेगळेपण सांभाळले आहे.

आदित्यात तेज तर अग्नीत उष्णता, जल प्रवाही तर वायु चलनवलन करणारा, आकाश मृदु तर पाषाण कठीण, वाघ-सिंह क्रूर तर मोर अत्यंत सुंदर. गाय गोड दूध देते तर भ्रमर गुंजारव करतात.

पुरुषाकडे दणकट शरीरबळ आहे तर स्त्रीकडे दया, क्षमा, शांति मार्दव हे सहजगुण आहेत.

शिवाय कर्मविपाकानुसार प्रत्येकाचा जीवनमार्ग तो निश्चित करत असतो. आचारातील सत्त्व रज तमानुसार त्या कर्मातही विविधता निर्माण होते. आणि इतक्या विविधतेने भरलेल्या विश्वाचे नियमन करणारा तो

तो प्रत्येक योनितील प्रत्येक जीवाला पूर्णत्वाला नेतो. जे पक्व होण्याजोगे आहे ते पक्व बनवतो हिरव्या आंबट कैरीचा पिवळाधमक आंबा होतो.

या विश्वातील प्रत्येक गोष्टीतील गुणांचा तो योग्य विनियोग करतो. या इथे काहीही टाकाऊ नाही. क्षुल्लक समजल्या जाणाऱ्या दगडधोंड्याचाही उपयोग असतो. इह किमपि लोकेऽस्मिन् न अयोग्यं न अगुणम्) त्याचा योग्य विनियोग केला तर लाभ होतो.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

जो परमात्मा सर्व योनिंचे, व्यक्तींचे स्वभाव निश्चित करतो, त्यांची योग्य वाढ करतो. या जगाच्या सुचारु संचलनासाठी त्यांचा उपयोग करुन घेतो.

सर्वांवर आधिपत्य गाजवतो. Well managed Systeme आहे. त्रिगुणांचाही वापर योग्य रीतीने व्हावा.

निद्रेसाठी तमोगुण, कार्यासाठी रजोगुण तर सत्कर्मासाठी/परमेश्वराच्या स्मरणासाठी सत्वगुण आवश्यक आहे. प्रत्येकाच्या स्वभावाचा परिपाक म्हणजे त्याला पूर्णत्वाला नेणे. आंबा हा आंब्यासारखाच हवा. तसाच ईश्वर प्रत्येकाचा विकास करत असतो. ईश्वर प्रत्येकाच्या गुणांचा योग्य उपयोग करुन घेत असतो.

माणसाने देखील परमेश्वरी कायद्याप्रमाणे वागावे या * नियमन या सृष्टीचक्राला खीळ बसेल असे तरी वागू नये. अडथळा बनू नये. प्रत्येकाने आपले काम व्यवस्थित केले तरच हे सृष्टिचक्र सुरळीतपणे चालेल. ईश्वरापर्यंत पोहोचायचे असेल तर त्याचे गुण आपल्यात उतरले पाहिजेत. मनुष्य जन्माची सार्थकता यातच आहे.

तद् वेदगुह्योपनिषत्सु गूढं
तद् ब्रह्मा वेदते ब्रह्मयोनिम् ।
ये पूर्वदेवा ऋषयश्च तद्विदुः
ते तन्मया अमृता वै ~~[illegible]~~ बभूवुः ॥ ६ ॥

वेदांचे अंतिम टोक म्हणजे वेदांत म्हणजेच उपनिषद वेदांचे सर्वश्रेष्ठ सार उपनिषदात सामावले आहे ज्यातून वेद निघाले किंवा उपनिषदे ज्यांचे वर्णन करतात त्या ब्रह्माला पूर्वदेव व ऋषी जाणतात.

पूर्वदेव — आजानदेव
कर्मदेव — स्वर्गनिर्मितीच्या वेळी ज्यांना ~~पुण्य~~



© www.madhaveeraguruveer.com

२६ जानेवारी २०१९

8 am निर्माण सत्कर्मात्यांनी पुण्य केले तेव्हा त्यांना देवत्व प्राप्त झाले अशा शक्तींना कर्मदेव म्हणतात.

9 ब्रह्मतत्त्वाची अनुभूती येणे म्हणजे ब्रह्मतत्त्वात मिसळून जाणे. कारण थोड्यांना — ऋषी, मंत्रद्रष्टे वा
10 त्रिकालज्ञानी यांना ब्रह्मतत्त्वाचा अनुभव आला आहे.

वस्तुत: ब्रह्मज्ञान हे सर्व साधकांचे ध्येय असायला
11 हवे. परंतु जीव हा त्रिगुणांनी युक्त असतो. त्याला मीपणा चिकटतो त्यामुळे तो आपल्या मूळ स्वरूपा
12 पासून दुरावतो. खरे तर जीव आणि ब्रह्म एकच आहेत.

1 pm गुणोन्वयो यः फलकर्मकर्ता
कृतस्य तस्यैव स चोपभोक्ता।
2 स विश्वरूपस्त्रिगुणस्त्रिवर्त्मा
प्राणाधिपः संचरति स्वकर्मभिः ॥७॥

3 जीव हा त्रिगुणांनी युक्त असल्याने त्रिगुणांना
4 अनुसरून वर्तन करतो. ज्या देहात तो असतो त्याचे गुण त्याला चिकटतात. सत्त्वगुण प्रबळ असेल तर सत्कर्मे सहजपणे
5 घडत राहतात. नीतियुक्त आचरण, धर्माचरण होत असते. रजोगुणाच्या प्राबल्याने भोगलालसा वाढत जाते. विषयसेवनाकडे
6 कल अधिक असतो. त्यातून हाव वाढते, लोभ बळावतो वृत्ति स्वार्थी होते. धर्मनीतिला धुडकावून लावले जाते.
7 याच्या अतिरेकातून तामसी वृत्ती जोर धरते. हातून तामसी कृत्ये होऊ लागतात. असत्यभाषण, हिंसाचार इ.

यातील पहिला मार्ग देवयान (सात्त्विक) मोक्षपदाकडे नेणारा तर दुसरा (रजोगुणी) मार्ग मध्यम म्हणजे पुन्हा पुन्हा मृत्युलोकात येऊन आशा, वासना पूर्ण करण्यासाठी कर्मे करणारा तर तिसरा (तमोगुणी) नीच योनी म्हणजे पशु कीटक योनीत जाऊन पडतो.

Priority



ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः।
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः॥

देहाच्या उपाधिमुळे हे त्रिगुण जीवाला चिकटतात. मात्र ज्ञानी माणूस इंद्रियांचा निग्रह करून त्रिगुणातीत होतो व सर्वांतून मुक्त होतो.

जीवाने देह धारण केलेला असल्यामुळे तो फळासाठीच प्रयत्न करतो. परंतु फळसुद्धा त्याच्यातील गुण प्राबल्यानुसार ठरते.

तमोगुणी — मलाच सर्व हवे.
रजोगुणी - मलाही हवे
सत्वगुणी — मला हवे तसे सर्वांनाही हवे.
शुद्ध सत्व - मिळाले वा न मिळाले तरी सारखेच.

अङ्गुष्ठमात्रो रवितुल्यरूपः
सङ्कल्पाहङ्कारसमन्वितो यः।
बुद्धेर्गुणेनात्मगुणेन चैव
आराग्रमात्रो ह्यपरोऽपि दृष्टः॥८॥

अंत:करणात अंगठ्याएवढ्या हृदयाकाशात जीवात्मा वास करतो. संकल्प आणि अहंकार यांच्या योगाने सर्व काम तो जीवात्माच करत असतो. प्रज्ञा, प्रतिमा, धारणा, स्मृति इ. बुद्धिगत शक्तीही त्याच्याच आधारे विकसित होतात. चैतन्य हे त्याचे मुख्य लक्षण आहे त्या दृष्टीने पाहिले तर त्याच्यात व ब्रह्मात काहीच फरक नाही परंतु अंत:करणाच्या उपाधिमुळे तो वेगळा भासतो. वस्तुत: हा ज्ञानरूप, रवितुल्य आहे.

बुद्धीचे गुण — संकल्प करणे अहंकार बाळगणे
आत्मगुण — शरीराचे जरा मृत्यु इ. धर्म.

Birthday / Anniversary

©www.manaveeraghuveer.com

October 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

Priority

FRI SEP 2010 10

Wk 36, 253-112

बालाग्रशतभागस्य शतधा कल्पितस्य च।
भागो जीवः स विज्ञेयः स चानन्त्याय कल्पते॥९॥

खरे पाहिले तर केस किती बारीक असतो. त्या केसाचा शंभरावा भाग आणि त्या भागाच्या पुन्हा शंभरावा भाग म्हणजे किती सूक्ष्म असेल तेवढा जीव सूक्ष्म असतो. परंतु म्हणून तो काही सामर्थ्यहीन नसतो तर अनंत होण्याचे सामर्थ्य त्याच्यात असते. कारण हा अणोरणीयान् महतो महीयान् आहे.
म्हणजेच नरामध्ये नारायण होण्याचे सामर्थ्य आहेच.
सूक्ष्म असूनही तो असीम होऊ शकतो. एक अणुही शक्तिशाली असतो. तो ब्रह्मरूप होऊ शकतो.
हा शरीरात राहतो नांदतो. परंतु शरीर नाश पावले तरी हा नाश पावत नाही.
विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति।
या विनाशी शरीरामध्ये त्या अविनाशी तत्त्वाचा वास आहे. हे जो तत्त्वतः जाणतो तोच खऱ्या अर्थाने पाहतो.

नैव स्त्री न पुमानेष न चैवायं नपुंसकः।
यद् यद् शरीरम् आदत्ते तेन तेन स युज्यते॥१०॥

या सत्स्वरूपाला पुल्लिंग स्त्रीलिंग नपुं. नाही. आत्मा एकच असतो. तो ज्या शरीरात राहतो, त्याच्याशी जोडला जातो. तसा समजला जातो. त्या त्या शरीराने तो सुरक्षित केला जातो. त्याच्याशी तो तादात्म्य पावतो त्यामुळे तो स्वतःला त्या शरीराप्रमाणे समजू लागतो. परंतु खरे तर जीवाला शरीर भेदाचा लेप पडत नाही. अंध, पंगु, मूक, बधिर, पशु, पक्षी, लता, वृक्ष - यापैकी जिथे तो वास करतो तसा आकार तो धारण करतो.

Birthday / Anniversary

© www.madhavaveeraghuveer.com

संकल्पनस्पर्शनदृष्टिमोहै
ग्रासाम्बुवृष्ट्या चात्मविवृद्धिजन्म।
कर्मानुगान्यनुक्रमेण देही
स्थानेषु रूपाण्यभिसम्प्रपद्यते ॥११॥

लिंग, वर्ण इ० आत्म्याला नसते. ते शरीराला असते, पण मग ही शरीरे त्याला कशी प्राप्त होतात?

तर सारे काही कर्मानुसार घडत असते. या कर्मामागे काय कारण असावे याचे उत्तर श्रुति देतात.

काही तरी पाहिल्यावर मनात संकल्प निर्माण होतो त्यातून ~~विषयांना~~ इंद्रियांना तो विषय हवाहवासा वाटू लागतो. मग मनाला त्याचा ध्यास लागतो. पुढे तो हव्यास वाढत जातो. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यापैकी कशाचाही हव्यास धरला तरी त्यातून असंतोष, क्रोध, लोभ, मोह निर्माण होतात. आयुष्यावर ते घाला घालतात आणि त्या पसाऱ्यात एकदा का जीव हरवला की त्याला मार्ग सापडत नाही व जन्ममृत्यूच्या फेऱ्यात तो गटांगळ्या खाऊ लागतो

नर मादी एकत्र येऊन (अपत्याचा जन्म होतो) गर्भधारणा होते. आईने घेतलेल्या भोजनामुळे गर्भाची वृद्धी होत जाते. व त्याची पूर्ति झाल्यावर बाळ जन्मते.

मात्र कधी कधी केवळ संकल्पातून, स्पर्शातून, दृष्टीतून, मोहातून जन्म होतो. पक्षी स्पर्शाची ऊब देऊन अंडी उबवतात. कासवी दृष्टीने पोषण करते. मासे केवळ बघून अंडी घालतात. असे म्हटले जाते.

मागील जन्मात त्याने जी कर्मे केली असतील त्याची फळे भोगण्यास अनुरूप असलेले शरीर किंवा परिस्थिती जेव्हा निर्माण होते त्यानुसार त्याला जन्म मिळतो. अशा प्रकारे जीव अनेक योनिमधून भटकत असतो.



© www.madhaveeraghuveer.com

स्थूलानि सूक्ष्माणि बहूनि चैव
रूपाणि देही स्वगुणैर्वृणोति।
क्रियागुणैरात्मगुणैश्च तेषां
संयोगहेतुरपरोऽपि दृष्टः॥१२॥

जीवात्मा स्थूल आणि सूक्ष्म अशी अनेक रूपे धारण करून त्रिगुणात्मक वृत्तीने अनेक कर्मे करत राहतो. मागील जन्मातील संस्कारामुळे नसतसा नवीन देह मिळतो. कोणता देह मिळणार? कुठे मिळणार? हे त्या संस्कारांवर (थोडक्यात पापपुण्यावर) ठरत असते.

संकल्प, वासना आणि वृत्तीप्रमाणे हातून कृति घडते. त्यातून बरी वाईट कृत्ये (पापपुण्य) घडतात आणि सुखदुःख देणारी फळे निर्माण होतात.

बुद्धी, मन, शरीराचे गुणधर्म इ. कारणे पुढील जन्म ठरवतात. या सर्वांचा विचार करून धर्मशास्त्राने जे नियम घालून दिले आहेत त्यावर श्रद्धा ठेवून त्याप्रमाणे वर्तन करावे. जिवाची प्रवृत्ती पाहून महात्मे त्याला मार्ग सुचवतात.

अनाद्यनन्तं कलिलस्य मध्ये
विश्वस्य स्रष्टारमनेकरूपम्।
विश्वस्यैकं परिवेष्टितारं
ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः॥१३॥

हृदयाकाशामध्ये राहणारा हा जीव अनादि व अनंत आहे. तो अनेक योनींमधून भटकत असतो. परंतु हे भटकणे कधी थांबणार? त्याला काही शेवट आहे की नाही? तर निश्चितच आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am त्या जीवात्म्याचा आधार अनंत परमात्मा आहे.
उपाधि मुळे चैतन्यरूप जीवात्मा वेगवेगळे आकार धारण
9 करतो. त्यामुळेच त्याला मर्यादा पडतात. मात्र
परमात्मा या मर्यादांच्या पलीकडे आहे. तो असीम
10 आहे. त्यामुळे या सर्व विविधतांना व्यापून पुन्हा तो
शिल्लक राहतो. तो विश्वातील प्रत्येक वस्तू, प्राणी,
11 पदार्थात आहे. त्याला कोणतेही विकार नाहीत.
मी व तो तत्त्वत: एकच आहोत. हे समजले
12 की कळू लागते की जे पाश मी मानतो ते मिथ्या
आहेत. खरे तर पाश आहेत असे मला नुसते वाटत
1 pm होते. खरा मी मुक्तच आहे. आपण प्रपंचाला धरून
ठेवतो, प्रपंच आपल्याला धरत नाही.
गोंदवलेकर महाराज — प्रापंचिक — स्वाध
2 एकदा त्याचे रहस्य कळले की सर्व पाश गळून पडतात.
3
भावग्राह्यमनीडाख्यं भावाभावकरं शिवम् ।
4 कलासर्गकरं देवं ये विदुस्ते जहुस्तनुम् ॥१४॥
5 याला मिळवायचे, जाणायचे कसे? कोणत्या मार्गाने?
खरे तर तो अगदी जवळ असूनही सापडत का नाही?
6 त्याला जाणता येते ते श्रद्धेने! श्रद्धस्व सोम्य श्रद्धस्व!
तो कसा आहे? तर
7 (अनीड) म्हणजे आधाररहित, आश्रयनसलेला - अनिकेत
त्या परमात्म्यावर सर्व काही आधारित असले तरी तो
कोणावर आधारित नाही. त्याला कोणतेही अधिष्ठान
नाही. तो सापेक्षही नाही तर तो आहेच आहे
भाव म्हणजे असणे अभाव म्हणजे नसणे
तोच सर्व काही करणारा (उत्पत्ति व लय) आहे. तो शिव
आहे. कल्याणकारी आहे, मंगल आहे. कलांचा निर्माता आहे



© www.madhaveeraghuveer.com

એકમેવાદ્વિતીય પરમાત્મા આહે.

ષોડશકળાંચા પુરુષ — પ્રાણ, શ્રદ્ધા, પંચમહાભૂતે, પંચ જ્ઞાનેંદ્રિયે - અન્ન, વીર્ય, તપ, મંત્ર કર્મ, લોક વ નામ યા સોળા કળાંચા નિર્માતા તોચ આહે.

ત્યાચ્યા અસ્તિત્વાચી ખૂણ મ્હણજે શ્વાસ પ્રાણ!

ત્યાનેચ માણસાલા બુદ્ધિ વ કર્તૃત્વશક્તી દિલી જીવનાવશ્યક કળાંચા નિર્માતાહી તોચ આહે. ત્યાચ્યાવર શ્રદ્ધા ઠેવૂન પ્રસન્ન મનાને આપલી કર્તવ્યકર્મે કરીત રાહિલ્યાને ચિત્ત શુદ્ધ હોતે ભાવ ઉત્કટ હોત જાતો સર્વત્ર ઈશ્વરાચેચ દર્શન હોત જાતે. સર્વેશ્વરાચ્યા કૃપેને હે આત્મજ્ઞાન ઝાલ્યાવર જીવ સારે કાહી સફળ પાવતો, ત્યાલા કશાચીચ કમતરતા ભાસત નાહી. ત્યાચી દેહબુદ્ધી ગળૂન પડતે તો જીવન્મુક્ત હોતો.

અનીડ — નીડ મ્હણજે શરીર, તો માવળ અસે કોણતે ઘર નાહી.

અનાખ્ય — ત્યાલા કોણતેહી નાવ નાહી, વિશેષણ નાહી ત્યાચે વર્ણન કરતા યેત નાહી.

ब्रह्म मीच, मीच तेज वारि मीच मेदिनी
मीच व्योम वायु मीच मजविणे नसे कुणी।
रुद्र मीच मीच विष्णु ब्रह्मदेव तोही मी
स्वर्ग मृत्यु सर्व ठायी पूर्ण एक मीच मी
पूर्ण एक मीच मी ॥

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

२२ फेब्रु. २०१९

# षष्ठमोऽध्यायः

स्वभावमेके कवयो वदान्ते
कालं तथान्ये परिमुह्यमानाः।
देवस्यैष महिमा तु लोके
येनेदं भ्राम्यते ब्रह्मचक्रम्॥१॥

सृष्टीच्या उत्पत्तिविषयी विचार करताना अनेक मतामतांचा गलबला (अ-३) झाला होता. काही विद्वानांच्या मते काळामुळे या सृष्टीची निर्मिती झाली तर कोणाच्या मते यदृच्छेने झाली. परंतु व्यवहारात आपण नेहमीच बघतो की कुशल कर्ता व विचारपूर्वक आयोजनाशिवाय कोणतेही क्षुल्लक कार्य सुद्धा पार पडत नाही. मग या विश्वाचे जीवनचक्र अगदी काटेकोरपणे चालवणारा विश्वकर्मा किती कुशल असेल? तो तर काळाच्याही पलीकडे आहे. (हळदीकुंकू, छात्रसमूह देशाचा कारभार)

तोच काळ निर्माण करतो, तोच स्वभाव निश्चित करतो. (मोगरा सुगंध देतो, विंचू दंश करतो, हरिण चपळ असते, आंबा गोड असतो.)

हे सर्व महिमान त्या एकमेवाद्वितीय परब्रह्माचे आहे. तोच ह्या ब्रह्मांडाचे चक्र फिरत ठेवतो. परंतु अनेक विद्वानांमध्ये मतभेद असल्याने सगळेच गोंधळलेले होते.

काळ - क्षय काळ व अक्षय काळ

स्वभाव - बीजापासून त्याच जातीचा वृक्ष बनतो परंतु बीजाचा निर्माता कोण?

काळ नेहमी क्षणापासून तरी मोजतात. शतक, सहस्र, काळ, मागच्या वर्षी, जन्मापासून, पावसाळ्यापासून मात्र तर्कशुद्ध मांडणी हवी.

Birthday / Anniversary

येनावृतं नित्यमिदं हि सर्वं
ज्ञः कालकालो गुणी सर्वविद्यः।
तेनेशितं कर्म विवर्तते ह
पृथ्व्यप्तेजोऽनिलखानि नित्यम्॥२॥

ह्या ईश्वराने हे विश्व निर्माण केले व तो त्यात अंतर्बाह्य व्यापून राहिला आहे. अशा त्याचा महिमा अपरंपार आहे. ज्ञान हेच त्याचे रूप आहे. तो काळाचाही कर्ता आहे. त्रिगुणात्मक कर्मही त्याच शक्तीमुळे विस्तारते. पंचमहाभूतांचा निर्माताही तोच आहे आणि नियामकही तोच आहे.

या सर्वांचे काम याच्या नियंत्रणाखाली (भीतीने) सुरू आहे. या जगात जे काही इदम् म्हणून दाखवता येते त्या सर्वांना याने व्यापून टाकले आहे. सर्वांवर याचे आवरण आहे. सर्व यांच्याशी संबंधित आहेत. यांच्याच अधिष्ठानावर सर्व काही उभे आहे. तो ज्ञानस्वरूप आहे. सर्वगुणसंपन्न आहे तरी गुणातीत आहे. तो सर्वज्ञ आहे. या जगाने धारण केलेली विविध रूपे (पानझड, वसंत ऋतु, ग्रीष्माची काहिली, पावसाळा) [illegible] आहेत. हा कधी नव्हता असे नाहीच. तो नित्य आहे. या अनित्य व विभक्त जगात राहणारा तो मात्र नित्य व अविभक्त आहे. तो चित् स्वरूप आहे. या सृष्टीतील प्रत्येक गोष्ट परिपूर्ण आहे. यथास्थित: वाघ सिंह- डौलदार सुळे, हरिण, ससा- चपळपणा, जिराफ- लांब मान आणि दाहकता.

मात्र प्रत्येक वस्तूवर काळाचा प्रभाव आहे. हा अव्यक्त काळ सूर्यामुळे व्यक्त झाला.— दिवस/रात्र/ काळाचे विभाग पृथ्वीच्या कक्षा, ग्रह, तारे, नक्षत्र- सर्व Universal Truth. या भेदयुक्त विश्वात अभेदाचे चिंतन करावे

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

# 17 FRI SEP 2010

Wk 37, 260-105

Priority

September 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

ज्ञानयोग।

8 am तत्कर्म कृत्वा विनिवर्त्य भूय
स्तत्त्वस्य तत्त्वेन समेत्य योगम्।
9 एकेन द्वाभ्यां त्रिभिरष्टभिर्वा
कालेन चैवात्मगुणैश्च सूक्ष्मैः ॥३॥

10 या सृष्टीची, त्रैलोक्याची निर्मिती करून त्या सर्वांवर
11 शासन करणारा तो मात्र सर्वांपासून अलिप्त आहे.
या सृष्टीच्या निर्मितीसाठी त्याने जी मूळ द्रव्ये वापरली
12 ती म्हणजे काळ आणि सूक्ष्म आत्मगुण - सत्त्व, रज, तम.
त्याने जड तत्त्वाचा चेतन तत्त्वाशी संयोग घडवून
1 pm आणला व त्यापासून चार प्रकारच्या योनि निर्माण केल्या:
उद्भिज, जारज, अंडज, स्वेदज
2 त्या परब्रह्माचा मूळ संकल्प - (कोऽहं बहुस्याम्)
तेव्हा हालचाल झाली. त्या हालचालीमुळे त्रिगुणांची जी
3 साम्यावस्था होती ती ढळली. विषम झाली. त्याची इच्छा
अव्यक्त होती ती व्यक्त होण्यासाठी काहीतरी दृश्य हवे होते,
4 त्यामुळे त्यातून महत् ब्रह्म म्हणजे मूळ माया प्रकटली
त्यातून गुणक्षोभिणी माया म्हणजेच प्रकृति व पुरुष
5 प्रकटले.
इच्छा करणे हा चेतनाचा स्वभाव असल्याने त्याला ही
6 नानात्वाची इच्छा झाली. त्यातून त्रिगुणात्मक अव्यक्त निर्माण
झाले. जीव, जगत् जगदीश्वर किंवा जीव ईश परमेश
7 किंवा क्षर अक्षर व पुरुषोत्तम।
त्यानंतर या विश्वाचा विस्तार झाला,
१. माया निर्मिती हे प्रथम कर्म मग त्यातून त्रिविध (?)
मग जड वस्तूंनी विश्व भरले परंतु त्यात चैतन्य नव्हते
मग जड चेतन्याचा संयोग घडवून आणला (समेत्य)
म्हणूनच त्याने या जड सृष्टीत प्रवेश केला. माणसाच्या
शरीरात प्रवेश करण्यासाठी त्याने मस्तकाचे विदारण केले.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

म्हणून दशमद्वाराला विद्युतद्वार किंवा नंदद्वार म्हणतात.
तो आत शिरल्यावर प्राणी हालचाल करु लागले
तो आत आहे की नाही हे कळण्याची खूण म्हणजे श्वास।
तो आहे तोवर सगळं काही चैतन्यमय आहे, तो निघून
गेला की उरते ती केवळ माती, कलेवर, शव।
म्हणूनच अगदी सुरुवातीला केवळ एकच तत्व होते,
त्यातून मग प्रकृति-पुरुष हे दोन निर्माण झाले,
मग तीन - त्रिगुण - सत्व, रज तम त्यानंतर अष्टधा प्रकृति
निर्माण झाली. अशाप्रकारे काळ आणि सूक्ष्म त्रिगुणांचा
वापर करुन त्याने हे विश्व निर्माण केले.
कालेन याचा अर्थ काही काळाने असेही करता येतो.
स्वतःला परमेश्वराशी जोडून घ्यायचे म्हणजेच जगाच्या
चेतनाशी संयोग घडवून आणायचा. हे सर्व काही सहज
सोपे नसले तरी काही काळाने जमू शकते. अभ्यास
अभ्यासाने जमू शकते. तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि---
गुरुपदेशाने स्वाध्यायाशी एकरूपता साधता येते.
त्याच जोडीला अभ्यास व वैराग्य हवे काही काळानंतर प्रचीती
येऊ लागते. परमात्म्याची भक्ती करणे हा जीवात्म्याचा गुण
आहे. त्यातून सर्वांविषयी प्रेम (सर्वभूतहिते रताः) वाढू
लागते. स्थूलाकडून सूक्ष्मापर्यंत जायचे आहे. सगुणाकडून
निर्गुणाकडे, संकुचितताकडून व्यापकाकडे जायचे आहे.
हळूहळू निर्गुण ब्रह्मापर्यंत पोहोचणे शक्य आहे.

कर्मयोग

आरभ्य कर्माणि गुणान्वितानि
भावांश्च सर्वान् विनियोजयेत् यः।
तेषामभावे कृतकर्मनाशः
कर्मक्षये याति स तत्त्वतोऽन्यः॥

त्यानंतर तो आपली नित्यकर्म पार पाडण्यासाठी त्रिगुणांचा
उपयोग करु लागला. ज्ञानप्राप्तीसाठी सत्वगुण



© www.madhaveeraghuveer.com

19 SUN SEP 2010 Priority

Wk 37, 262-103

September 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

8 am कर्म करण्यासाठी रजोगुण, सोपण्यासाठी तमोगुण
आवश्यक आहे. जीवाला हे त्रिगुण चिकटलेले आहेत.
9 याची त्याला जाणीव असते तो त्याच्या आहारी जात
नाही पण त्यांच्यावर त्याचे नियंत्रण असते.
10 जेव्हा जीव कर्माचे कर्तृत्व स्वत:कडे घेतो तेव्हा
तो पापपुण्याची जोड करतो असतो. परंतु जेव्हा तो
11 या सर्वांच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करू लागतो तेव्हा
त्याला समजते की हे त्रिगुण म्हणजे मायेचे काम आहे
12 गुणा गुणेषु वर्तन्ते। मी त्यापासून वेगळा आहे. मी
देह नाही तर मी देही आहे. हे तत्त्वत: समजले
1 pm की कर्म उरत नाही. ते नैष्कर्म्य होते. कर्मक्षय होतो.
आणि हे होताच तो मूळस्वरूपात जातो. परमेश्वराशी
2 एकरूप होतो. कारण त्याला स्वस्वरूप समजून चुकते.
मी चैतन्य आहे. मी शरीर नाही. हे समजले की सर्व
3 लटकी बंधने गळून पडतात.
पाठभेद { अन्य: म्हणजे जो तत्त्वाहून वेगळा असतो
4 अन्यत म्हणजे सर्वांहून वेगळ्या असणाऱ्या परब्रह्माप्रत जो
जो सत्वगुणांनी युक्त कर्म (सात्त्विक) करतो तो जी सर्व
5 ईश्वराला अर्पण करतो तो कधीच कर्मांनी लिप्त होत नाही,
तो या पूर्वकृत कर्मांचाही नाश होतो.
6 गुणान्वितानि — गृहस्थाने सत्कर्मे खूप करावीत. दोषयुक्त
कर्मे करू नयेत. कर्माचे तीन परिणाम होतात.
7 हीनांगपूर्ति - न्यून घालवणे.
दोषापनयन - मळ धुवून टाकणे.
गुणाधान - आवश्यक गुण वाढवणे.
विनियोग - सर्वच भाव परमेश्वराच्या ठिकाणी जोडून केवळ
परमेश्वर प्राप्तीचा लोभ/कामना करा. सर्वच वृत्तींचा लय
परमेश्वरामध्ये होऊ देत. रामे चित्तलय: सदा भवतु मे।
Birthday / Anniversary त्यानंतर अंतिमत: तो व मी एकरूप आहे हे लक्षात येते.

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

भक्तियोग

(उपासना)

आदिः स संयोगनिमित्तहेतुः
परस्त्रिकालादकलोऽपि दृष्टः।
तं विश्वरूपं भवभूतमीड्यं
देवं स्वचित्तस्थमुपास्य पूर्वम्॥५॥

या मंत्रात उपासना सांगितली आहे. तो आदि म्हणजे सर्वांचे कारण आहे, सर्वच संयोग म्हणजे जड चेतनाचा, प्रकृति पुरुषाचा आणि जीव व जडाचा संयोग हे ईश्वरी प्रेरणेने घडत असतात. याकडे दुर्लक्ष करून मीच सगळ्याचा कर्ता आहे असे म्हणणे वेडेपणा आहे. असा जीव मोहांध झालेला असतो.

परंतु अनादि अनंत असा तो परमेश्वर सर्व करूनही अकर्ता आहे. सगळ्यापासून अलिप्त आहे. जीवाला तोच प्रपंचाच्या भोवऱ्यातून सोडवतो कारण जीव म्हणजे त्याचेच रूप आहे. ईश्वर सदासर्वदा आपल्या जीवस्वरूपाचे रक्षण आणि कल्याण करत असतो. वाघ सिंहांचे दात जसे त्यांच्या पिल्लांना लागत नाहीत तसेच परमेश्वराने दिलेली दुःखे संकटे ही देखील जीवाच्या कल्याणासाठीच असतात. हे एकदा समजले की सर्वत्र त्याचेच दर्शन घडू लागते.

तो स्वतः त्रिकालातीत भूत वर्तमान भविष्य यांच्या पलीकडे आहे. तसेच तो अकल आहे त्याला कला (विभाग) नाहीत. असा तो पाहिला गेला आहे, जाणला गेला आहे. जड-चेतनाच्या संयोगाचे निमित्तकारण तोच आहे.

जे जे निर्माण झाले आहे ते त्याचेच रूप आहे. अशी अलौकिक शक्ति असणारा तो ईड्य आहे. तो सगळ्याचा आदि आहे. त्याला शोधायला कुठे लांब जायला नको. आपल्या हृदयातच त्याला पहायचे. आणि ते उपासनेमुळे शक्य होते. संयोग म्हणजे विद्या असा अर्थ घेतला तर आम्ही त्याच्याशी जोडलो आहोत हे समजणे म्हणजे विद्या म्हणजेच संयोग!

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

21 TUE SEP 2010 | Priority

Wk 38, 264-101

| September 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

ज्ञाणे

8 am स वृक्षकालाकृतीभि: परोऽन्यो
यस्मात् प्रपञ्च: परिवर्तते अयम्।
धर्मावहं पापनुदं भगेशं
ज्ञात्वात्मस्थममृतं विश्वधाम॥६॥

10

अश्वत्थ वृक्षाचे गीतेतील रूपक या संसाराचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी योजले आहे. गीता हे उपनिषदांचेच सार आहे. या संसारवृक्षाचे मूळ वर ब्रह्माशी निगडित आहे तर त्याचा विस्तार त्रैलोक्यात पसरलेला आहे. मायेच्या या पसाऱ्याचे अधिष्ठान असणारा ईश्वर मात्र त्यापासून अलिप्त आहे. हा प्रपंच सतत वाहता असला तरी ते परब्रह्म मात्र विस्तार काळ व आकृतीच्या पलिकडचे आहे. विस्तृते इति वृक्षः जो वाढतो विस्तार पावतो तो.

तो धर्मावह म्हणजे धर्म धारण करणारा आहे. दाहकता हा अग्नीचा धर्म आहे. त्याला शक्ति देणाराही हाच आहे. त्याचा धर्म ठरविणाराही हाच आहे.

पापाचा नाश करणारा व सहा गोष्टींचा समूह म्हणजे भगाने युक्त असा भगेश हाच आहे.

ऐश्वर्यस्य समग्रस्य वीर्यस्य यशसः श्रियः।
ज्ञानवैराग्ययोश्चैव षण्णां भग इतीरणा॥

हा भगवान म्हणजे सर्व शक्तींनी संपन्न आहे. हा आत्मस्थ आहे. स्वस्वरूपाचे ज्ञान होणे म्हणजे त्याला जाणणे. सोऽहम् चा अनुभव म्हणजेच त्याचे ज्ञान आहे. ज्याला असा अनुभव येतो तो अमृतच होतो.

धर्मावहः - धर्माची प्राप्ती करवणारा

करोनि धर्माचे अवलंबन। संपादुनी यथार्थ ज्ञान।
जावे जीवांनी उद्धरून। इच्छा ऐशी ईश्वराची॥

Birthday / Anniversary

October 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

*Priority*

WED SEP 22 2010

Wk 38, 265-100

२६ फेब्रु. २०१८

## अनुभवणे

तमीश्वराणां परमं महेश्वरम्
तं देवतानां परमं च दैवतम्।
पतिं पतीनां परमं परस्ताद्
विदाम देवं भुवनेशमीड्यम्॥७॥

क्रमाक्रमाने साधक प्रगति करत जातो. आणि परमेश्वराशी एकरूप होतो. ही अंतिम अवस्था आहे. तो ईश्वराचाही ईश्वर महेश्वर आहे. स्वामींचा स्वामी आहे. आमचे सद्गुरु आमच्यासाठी स्वामी आहेत, त्यांचा स्वामी स्वामीराज आहे आणि त्याहीपलीकडे राजांचा स्वामी सम्राट आहे. महेश्वर आहे. देवतांचा परम उपास्य देव तोच आहे. देवाना त्यानेच विभाग (Departments) केले आहे. देव हे शबल ब्रह्मापासून निर्माण झाले आहेत. परंतु तो त्याहीपेक्षा वर म्हणजे केवळ ब्रह्म आहे. शबल म्हणजे मिश्रित/गौण, थोडे दुय्यम दर्जाचे, कारण त्याने मायेची उपाधि स्वीकारलेली असते. परंतु या मायेच्या पलीकडे केवळ ब्रह्म आहे.

तो सर्व पतींचा पति म्हणजे पालनकर्ता आहे. तो सर्व भुवनांचा, ब्रह्मांडाचा स्वामी आहे. तो ईड्य आहे म्हणजे अतिशय वंदनीय, पूजनीय, आदरणीय Adorable आहे. त्याला अनुभवणे म्हणजे त्याच्याशी एकरूप होणे. त्याला अनुभवले की वेगळेपणा शिल्लक राहत नाही.

१४ भुवने, ७४ ब्रह्मांड आहेत. प्रत्येक ब्रह्मांडाचे ब्रह्मा विष्णू महेश वेगवेगळे आहेत. परंतु महेश्वर सर्वांचा एकच आहे. श्रेष्ठ, केवळ ब्रह्म आहे.

विदाम (विद्मः) जाणून घेऊ किंवा अनुभवू.

त्यानेच वेगवेगळ्या देवता - डोळ्यांचा सूर्य, जिभेचा अग्नि हाताचा इंद्र अशा निर्माण केल्या. त्या देवता म्हणजे त्या त्या विभागाचे पति (पालनकर्ता) आहेत. परंतु त्या सर्वांचा हा अधिपति आहे.

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

23 THU SEP 2010

Wk 38, 266-099

| September 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |

*Priority* मायेचे हे त्याचे सामर्थ्य आहे त्याशिवाय
काहीच घडू शकत नाही. गुलबकावलीच्या
कथेमध्ये जसे होते तसे काहीसे आहे
कारण साक्षात्कार मागे उभा आहे.

न तस्य कार्यं करणं च विद्यते
न तत्समश्चाभ्यधिकश्च दृश्यते।
परास्य शक्तिर्विविधैव श्रूयते
स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च॥

8 am

9

10 तो कसा आहे? सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितं
11 त्याला कोणतीही इंद्रिये नाहीत त्यामुळे तो काही
कार्य स्वतः करत नाही. त्याला कोणी निर्माण केलेले
12 नाही. त्यामुळे त्याला कारण नाही व त्याचे कार्यही नाही.
त्याच्यापेक्षा जुना कुणी नाही श्रेष्ठ कुणीही नाही
1 pm इतकेच नाही तर त्याच्या जवळपास देखील कोणी
जाऊ शकत नाही — तुझ्या न जोडी तुज कोण मोडी!
2 तो एकमेवाद्वितीय आहे.
त्याला इंद्रिये नसली तरी केवळ संकल्पमात्राने त्याने
3 हे सर्व विश्व निर्माण केले. त्याच्याकडे स्वाभाविक
शक्ती आहेत. He need not acquire those.
4 ज्ञानशक्ती, इच्छाशक्ती, क्रियाशक्ती
निर्मिती करण्यापूर्वी ज्ञान हवे. ते उत्पन्न करण्याची
5 प्रबळ इच्छा हवी आणि प्रत्यक्ष क्रिया हवी. घरनिर्मिती
त्याच्याकडे विविध शक्तींचे भांडार आहे. बघण्याची,
6 ऐकण्याची, स्पर्शाची, हुंगण्याची, स्पर्शाची, विचार/कृती
करण्याची अशा अनंत शक्ती याच्याकडे आहेत.
7 अशा या सर्वश्रेष्ठ परमेश्वराला जाणणे हेच
आमच्या जीवनाचे उद्दिष्ट असायला हवे.
ज्ञानबलक्रिया - हा कार्य करून मोठा होत नाही तर
तो मोठा आहेच.
पराशक्ति - परमात्म्यामध्ये या शक्ती कायम असतात.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

यस्तन्तुनाभ इव तन्तुभिः
प्रधानजैः स्वभावतो
देव एकः स्वमावृणोति
स नो दधातु ब्रह्माव्ययम् ॥१०॥

रेशमाचा किडा स्वतःमधून तंतु काढतो व त्याचाच कोश विणून स्वतःला गुरफटून घेतो, दडून राहतो. त्याचप्रमाणे परब्रह्म स्वतःमधून प्रकृति निर्माण करतो व तिच्यापासून निर्माण झालेल्या तीन गुणांनी (प्रधानजैः) स्वतःला झाकून घेतो त्यामुळे वरवर फक्त त्रिगुणात्मक जीव दिसतात परंतु तो काही दिसत नाही. किंवा तो तिथे असेल हेही चटकन कळत नाही. त्याला शोधण्याचे त्याला जाणण्याचे आमचे प्रयत्न कमी पडतात. तेव्हा त्याचीच मदत घ्यायची. त्यालाच प्रार्थना करायची की तूच कृपा कर आणि मला तुझ्याशी एकरूप करून घे. त्याच्या कृपेशिवाय त्याच्याशी तद्रूप होता येणार नाही.

प्रधान — (प्रकर्षेण धीयते सर्वं अस्मिन् इति प्रधानम्) सर्वांचे बीज ज्यात ठेवलेले आहे ते प्रधान म्हणजे दैवात्मक शक्ती.

परमेश्वराने कोळ्याप्रमाणेच या शक्तींच्या द्वारे मायेचे जाळे विणले. एकदा का या चेतनाची प्रचीती आली की हा विश्वाचा आभास मावळून जातो. सर्वत्र त्याचेच दर्शन घडते.

मावळवीत विश्वाभासु नवल उदेला चंडांशु ॥
जो ईश्वराला शोधील, त्यालाच ते सत्यतत्त्व कळेल त्याचा साक्षात्कार होईल.

© www.madhaveeraguruveer.com

Priority [illegible]



न तस्य काश्चित्पातिरस्ति लोके
न चेशिता नैव च तस्य लिङ्गम्।
स कारणं करणाधिपाधिपो
न चास्य कश्चिज्जनिता न चाधिपः॥९॥

त्या परब्रह्माचे काहीही लक्षण सांगता येत नाही या दृश्य जगात त्याचा कोणीही पति/पालनकर्ता नाही. त्याच्यावर नियंत्रण ठेवणारा, त्याच्यापेक्षा मोठा शक्तिशाली कुणीच नाही. त्याने केवळ संकल्पाने या ब्रह्मांडाची रचना केली. या लोकांनी त्याचे मन भरले की तो हा सगळा खेळ मोडूनही टाकेल. पण त्याला हे कर किंवा करू नकोस असे सांगणारा (नियमन करणारा) कुणीच नाही. त्याच्यापासूनच हे विश्व बनले आहे. तो सर्व अधिपतींचा अधिपति आहे. याला कोणी माता पिता स्वामी नाही. हा स्वतंत्र आहे. त्याला जाणून घ्या.

एको देवः सर्वभूतेषु गूढः
सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा।
कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः
साक्षी चेता केवलो निर्गुणश्च॥११॥

हा एकमेवाद्वितीय देव सर्व भूतमात्रांत लपून बसला आहे. तो सर्वांचा अंतर्यामी आहे. सर्वव्यापी आहे. सर्व कर्मांचा कर्ता करविता तोच आहे. सर्वांमध्ये तो साक्षीरूपाने राहतो. तो सर्वसाक्षी आहे. तटस्थ आहे. तो सर्वांना चैतन्य पुरवतो. शक्ती देतो परंतु त्याचा वापर कसा करायचा याचा निर्णय मात्र ती व्यक्ती घेते. तो गुणातीत आहे. शुद्ध आहे. त्यात काहीही मिसळलेले नाही

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

October 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

*Priority*

SUN SEP 26 2010

Wk 38, 269-096

8 am तो साक्षी आहे याचा अर्थ साक्षात् ईक्षते इति साक्षी म्हणजे तो कोणत्याही चष्म्यातून पाहत नाही, करणं
9 विना एव ईक्षते. तो निरपेक्षपणे, तटस्थ भावाने पाहतो. तो स्वयंप्रकाश सर्वभासक आहे.

10 त्याच्याशिवाय सारे असार आहे. प्रकाश स्वतः अदृश्य राहून जगाला दृश्य करतो. त्याप्रमाणे त्या निर्गुण परमेश्वराच्या
11 योगे विश्व साकार होते. Battery Cells

12 एको वशी निष्क्रियाणां बहूनां
एकं बीजं बहुधा यः करोति॥
1 pm तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीराः
तेषां सुखं शाश्वतं नेतरेषाम्॥१२॥

2 परमात्म्याचेच सर्व अंश आहेत. त्यामुळे तो जसा
3 अकर्ता तसेच जीव देखील अकर्ते आहेत. परंतु भ्रमाने कर्तेपण स्वतःकडे घेतात. सर्व जीवांना ताब्यात
4 ठेवणारा हाच आहे. तोच एका लहानशा बीजाचे रूपांतर भरघोस कणसात करतो. जमिनीत पेरलेल्या बीच्या एवढा
5 मोठा विस्तार करणारा, हा किमया करणारा जादूगार कुठे दूर नाही. तर तो आपल्याच हृदयात राहतो. परंतु तरीही
6 तो सर्वांना भेटत मात्र नाही. फारच थोड्या विवेकी पुरुषांना तो भेटतो. अशांना शाश्वत सुख लाभते.
7 उपासना सामान्यजनही करतात. परंतु काहीही न मिळाल्याने ते कंटाळतात व सोडून देतात. मात्र जे धीरपुरुष विचलित न होता श्रद्धेने, निष्ठेने सदाचारी राहून इंद्रियदमन करून त्याच्याशी जोडलेले राहतात. अशा सज्जनांना, संतांना तो दर्शन देतो. तेव्हा भक्त व भगवंत वेगळे उरतच नाहीत. थोडक्यात काय, तर अहंपणा सोडून अनन्यभावाने शरण जाणाऱ्या खऱ्या भक्ताला सदा प्रसन्न

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

८ मार्च २०१८
जागतिक महिला दिन

सुखदायक अमूल्य, निर्मल अशा परमेश्वराचे दर्शन घडते. मात्र जो हे दुर्लभ सुख सोडून क्षणभंगुर अशा विषयसुखाच्या मागे लागून भटकत राहतो त्याला ह्या ब्रह्मानंदाला मुकावे लागते.

अनुपश्यन्ति म्हणजे महात्म्यांच्या मागोमाग जाऊन ते त्याला पाहतात म्हणजे अनुभवतात.

नित्यो नित्यानां चेतनश्चेतनानाम्
एको बहूनां यो विदधाति कामान् ।
तत् कारणं सांख्ययोगाधिगम्यं
ज्ञात्वा देवं मुच्यते सर्वपाशैः ॥१३॥

जे आम्हाला नित्य (टिकाऊ, शाश्वत) वाटते - पर्वत नद्या, देश - त्यापेक्षाही जो नित्य आहे. ज्या गोष्टी चेतन (झाडे, वेली, प्राणी, कृमि) वाटतात त्यापेक्षाही जो चेतन म्हणजे इतरांना चेतना पुरवणारा आहे तो सर्वांमध्ये अनेक कामना पूर्ण करतो

कामना करणे हा चैतन्याचा गुण आहे. झाडाची मुळे पसरतात ती पोषकद्रव्ये मिळवण्याच्या इच्छेने रोपाची वाढ सूर्यप्रकाशाच्या दिशेने होते. जीवजंतु देखील अस्तित्वाची कामना करतात. मग माणूस विविध कामना करतो यात काय आश्चर्य?

एखाद्याला अत्यंत प्रिय असणारी गोष्ट दुसऱ्याला अगदी टाकाऊ वाटते.

लैलाको देखना है तो मजनूकी आँखोंसे देखो।
कामनांमध्ये विविधता आहे.

या सर्वामागचे कारण जो आहे त्याला जाणावे योगमार्गाने / सांख्यमार्गाने

Birthday / Anniversary प्रत्येक गोष्टीचे कारण शोधत मागे मागे जावे

© www.madhaveeragniveer.com

8 am व त्याच्यापर्यंत पोहोचावे. किंवा योगमार्गाने षट्चक्रांचे भेदन करून सहस्रारचक्रापर्यंत पोहोचावे.

9 कोणत्याही मार्गाने त्याला जाणले / अनुभवले म्हणजे जीवन धन्य होते. सर्व पाशातून मुक्तता होते
10 आणि मग कळून चुकते की त्याचे बंधन वाटत होते, तो भ्रम होता.

11 केनोपनिषद —

श्रोत्रस्य श्रोत्रं मनसो मनो यद्
12 वाचो ह वाचं स उ प्राणस्य प्राणः ॥ १.२॥

चोखामेळा म्हणतात —

1 pm श्रवणाचे श्रवण घ्राणाचे जे घ्राण
रसनेचे गोडपण विठ्ठल माझा॥
2 मुखाचे निजमुख अकळाचे कळ
चोखा म्हणे निजफळ विठ्ठल माझा॥

3 त्याच्याशी जे एकरूप होतात त्यांना तो सर्व ज्ञान देतो. पण त्यासाठी पात्रता आपणच मिळवायची असते.

4 ईश्वराला सोडून इतर सुखासाठी धावणे म्हणजे मृगजळ मिळवण्यासारखेच आहे. मात्र त्याच्या दारी जाणारा
5 कधीही मोकळ्या हाताने परतणार नाही. तो नित्य, सनातन, अक्षर, अव्यय, परिपूर्ण आहे.

6 तो चेतनेचे चैतन्य, प्रेरणांची प्रेरणा आहे.

कल्पतरु किंवा चिंतामणी केवळ मागितलेलेच पुरवतात.
7 परमेश्वर त्यांच्याहून उदार आहे. तो मात्र भक्ताच्या सार्‍या गरजा जाणून न मागताच पूर्ण करतो.

भक्ताच्या इच्छांवरून मनोवृत्ती ओळखता येते. आणि सर्वसामान्य राजस वृत्तीचे असतात. सत्त्व- सात्त्विक राजस- तमोगुणी। जशी ज्याची उपासना तसा त्याला देव पावतो. ईश्वराचे ज्ञान झाले की सार्‍या व्याधी

 विकार, पाप ताप गळून पडतात.

© www.madhavaraghuveer.com

8 am न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं
नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः।
9 तमेव भान्तमनुभाति सर्वं
तस्य भासा सर्वमिदं विभाति॥१५॥

10 परमात्म्याचे तेज आणि महत्ता अनुपमेय आहे.
11 सर्व तेजस्वी वस्तूंचे तेज त्याच्यासमोर फिके पडते.
कारण तो स्वयंप्रभ आहे. तो सर्वविश्वाचा निर्माता आहे.
12 सूर्यापुढे काजव्याचा प्रकाश दिसत नाही तसे
त्याच्यासमोर सूर्य चंद्र तारे विद्युत हे फिके पडतात.
1 pm मग अग्नीची तर गोष्टच सोडा.
हे सर्व त्याच्याच शक्तीने प्रकाशित झाले आहे.
2 त्याने दिलेल्या प्रकाशामुळेच हे जग आम्हाला दिसते.
सूर्याच्या प्रकाशात डोळ्यातील प्रकाशाने आम्ही पाहतो.
3 न तद् भासयते सूर्यो न शशांको न पावकः।
किंवा रवी शशी अग्नि नेणती ज्या रूपा
4 स्वप्रकाशरूपा तुज नमो। तुज नमो॥

5 एको हंसो भुवनस्यास्य मध्ये
स एवाग्निः सलिले संनिविष्टः।
6 तमेव विदित्वा अतिमृत्युमेति
नान्यः पन्था विद्यतेऽयनाय॥६-१५॥

7
• प्रकाशरूप परमात्मा समदर्शी असतो. हंस हे त्याचे
प्रतीक आहे - शुभ्र, निष्कलंक, ज्यात काही
मिसळले नाही. तो पंख पसरून स्थिर शांत उडत असतो -
सुस्थिर असतो.



© www.madhaveeragniveer.com

निरभ्र आकाशात विहार करणाऱ्या हंसाप्रमाणे तो सर्वेश्वर जगापासून अलिप्त असूनही जगावर दृष्टी ठेवतो. तो कोटि सूर्यांहून तेजस्वी आहे. त्याचे दर्शन कसे घेता येईल?

वास्तविक अग्नि दाहक असल्याने त्याला स्पर्श करणे केवळ अशक्य असले तरी त्या अग्निने जलात प्रवेश केला आहे तो शीतल सुखद व सुलभ होऊ शकतो.

पृथ्वीला वेढून असणारी आर्द्रता - अंभस
स्थूल व सूक्ष्म रूपातील पाणी - आप
प्रवाही पाण्याला सलिल

जग हे नित्य प्रवाही, परिवर्तनशील आहे तरी ते नदीप्रमाणे स्थिर वाटते. त्या प्रवाहाच्या पाण्यात अग्नि लपलेला आहे. पाणी व अग्नि या दोघांचे गुणधर्म विरोधी आहेत. त्यामुळे पाण्यातील अग्नि ही कल्पना सुस्पष्ट होत नाही. परंतु तेजापासूनच पाण्याची निर्मिती झाली आहे. आणि कारण हे कार्यात दिसत नसले तरी असतेच. तसेच पाण्याच्या सहाय्याने वीजनिर्मितीही होते.

हे एक रूपक आहे. प्रखर ज्ञानाग्नि भक्तीजलात मिसळला की सौम्य, सुलभ होतो. भक्तीच्या बळावर परमेश्वराचे तेजही सुसह्य होते. आणि एकदा ईश्वराचा प्रत्यय आला की मृत्युभयाच्या पाशातून मुक्ती मिळते. ज्ञानप्राप्तिशिवाय उद्धाराचा दुसरा मार्गच नाही. भक्ति आणि ज्ञानाच्या योगाने त्या ईश्वराच्या नामाची गोडी लागते.

सलिले अग्नि: - वीर्य हे द्रवरूप असते परंतु त्यात तेज असतेच. वीर्यात सन्निविष्ट असलेला जीव म्हणजेच हंस! त्याचा स्त्रीबीजाशी संबंध आला की अपत्यसंभव होतो.

© www.madhaveeraghuveer.com

स विश्वकृद् विश्वविदात्मयोनि
र्ज्ञ: कालकालो गुणी सर्ववित य: ।
प्रधानक्षेत्रज्ञपतिर्गुणेश:
संसारमोक्षस्थितिबन्धहेतु: ॥ १६ ॥

तो या विश्वाचा निर्माता आहे, त्याने जे विश्व निर्माण केले, त्याचे त्याला ज्ञानही आहे. तो योनिज नाही तर तो आत्मयोनि (स्वयंभू) आहे.
विष्णुसहस्रनाम - आत्मयोनि: स्वयंजातो ----
तो बळज्ञानक्रिया शक्तींनी युक्त आहे. तो काळाचाही काळ (अक्षय काळ) आहे. काळाला निर्माण करणाराही तोच आहे. त्यामुळे काळ त्याची आज्ञा पाळतो. सर्व दिव्य गुणांनी युक्त आहे. तो सर्वज्ञ आहे. प्रधान - प्रकृति, क्षेत्रज्ञ - जीव। तो सर्व जीवांना व प्रकृतीला जाणणारा आहे. परा व अपरा प्रकृतीचा स्वामी आहे. तो ईशन करतो म्हणजेच चुकल्यावर शासन करतो. त्रिगुणांचाही तो ईश आहे. सं + सृ = संसरति इति संसार: पुढे पुढे सरणारा, वाढत जाणारा की पसरणारा म्हणजे संसार! त्यात बांधणारा, ठेवणारा व सोडवणारा ही तोच आहे. अशा त्या एकमेवाद्वितीय परमेश्वराला जाणणे हेच जीवनाचे ध्येय असायला हवे. त्याला जाणले की ब्रह्मानंदाची प्राप्ती होते

© www.madhaveeraghuveer.com

November 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | | | | | |

*Priority*

SAT OCT 2 2010

Wk 39, 275-090

स तन्मयो ह्यमृत ईशसंस्थो
ज्ञः सर्वगो भुवनस्यास्य गोप्ता।
स ईशे अस्य जगतो नित्यमेव
नान्यो हेतुर्विद्यत ईशनाय॥१७॥

ज्या ज्या वस्तू त्याने निर्माण केल्या त्यांच्याशी तो एकरूप (तन्मय) झाला. कर्ता म्हणून त्याला वेगळे अस्तित्व नाही हा एक अर्थ झाला.

दुसरा अर्थ - जीव देहाशी तन्मय झाला की देहाला सर्वस्व मानू लागतो, त्यामुळे बंधनात अडकतो. पण तेच जर (देहाला 'मी' न मानता) ईशाशी समरस झाला, ईशसंस्थ झाला तर तो अमृत होतो.

तो सर्वज्ञ आहे, सर्वगत आहे या संपूर्ण विश्वाचा रक्षणकर्ता तोच आहे. या विश्वाचे ईशन करण्यासाठी त्याने विविध शक्ती निर्माण केल्या. विश्वाचा प्राण असणारा वायु, सूर्य, इंद्र, अग्नी व जगाचे नियमन करणारा यम या त्याच्याच शक्ती आहेत. त्याला या ब्रह्मांडातील विराटापासून अत्यंत सूक्ष्म वस्तूचे ज्ञान आहे. हत्तीपासून मुंगीपर्यंत.

तो Faulty part दुरुस्त सुद्धा करून देतो. जखमा आपोआप भरून येतात. हाडे जुळून येतात.

या ग्रहगोलांवर त्याचेच नियंत्रण आहे. प्रत्येकाच्या कक्षा ठरलेल्या आहेत. मात्र माणूस त्यात ढवळाढवळ करून गोंधळ करून ठेवतो.

जो बांधतो त्यालाच कसे सोडवायचे हे माहिती असते. जीव अल्पज्ञ तर तो सर्वज्ञ आहे.

दोन्हीकडे तो ज्ञानमात्र आहे. ब्रह्मामुळेच या जगाला अस्तित्व आहे. दुरास्तित्व आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

यो ब्रह्माणं विदधाति पूर्वं
यो वै वेदांश्च प्रहिणोति तस्मै।
तं ह देवमात्मबुद्धिप्रकाशं
मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्ये॥१८॥

मी म्हणजे हा देह नाही. मला यातून मुक्त व्हायचे आहे. मोक्षाची इच्छा करणारा मी मुमुक्षु आहे. मी त्या परमात्म्याला शरण जात आहे. तो असा देव आहे की आत्मज्ञानासाठी लागणारी तेजस्वी बुद्धि देणारा तोच आहे. — व्यवसायात्मिका बुद्धि (चेतसा नान्यगामिना) तो आत्मबुद्धिला प्रकाश देतो. आत्मकल्याण साधायचे असेल तर त्यालाच शरण जावे. सृष्टिनिर्मात्या ब्रह्मदेवाला देखील त्यानेच निर्माण केले. आणि ~~[illegible]~~ या कार्यासाठी मार्गदर्शन म्हणून वेदश्रुति रचून मार्गदर्शन केले.
प्र+हि - ५ प. प. - प्रहिणोति - To send forth.
या विश्वाच्या सुयोग्य संचलनासाठी त्याने वेद पाठवले.

निष्कलं निष्क्रियं शान्तं निरवद्यं निरञ्जनम्।
अमृतस्य परं सेतुं दग्धेन्धनमिवानलम्॥१९॥

त्याचे वर्णन नकाराने केले आहे. निष्कल - त्याचे तुकडे होत नाहीत. खंड नाही. तो सलग आहे. त्याला अवयव नाहीत म्हणून क्रियाही नाही.

सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम्।

तो शांत आहे. त्याच्या ठिकाणी विकार (बदल) नाही. वासना नाही. त्यामुळे क्षुब्धता नाही.

वद्य - म्हणजे सांगण्याजोगे अवद्य म्हणजे अवाच्य नाहीर, निंदनीय आणि पुन्हा निरवद्य म्हणजे निंदा करण्यासारखे त्यात काहीच नाही असे!

Birthday / Anniversary

© www.madhaveelaghuveer.com

त्याच्यात दोष नाही, पाप नाही. तो निरंजन आहे.
त्याला काजळी नाही, लेप नाही. डाग नाही, विकार नाही.
परप्रकाशी साधनांना काजळी असते. हा स्वतः
स्वयंप्रकाशी आहे. त्याला बाहेरून पुरवठा नाही.
तो अमृताचा सेतु आहे. हा या नौकेवरून
पैलतीरावर नेतो.

अग्निमध्ये टाकलेल्या इंधनाचे सर्व जळून जाते
तसा हा अविद्येचा नाश करणारा आहे. (कधी का
त्याचे सेवन झाले की अज्ञान औषधालाही शिल्लक
उरत नाही. भस्म होऊन जाते.

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते,
~~यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन।~~
ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा।

सेतु - बांध - याच्या पलीकडे अमृतत्व नाहीच हा
स्वतःच अमृत आहे. तो शांताकारम् आहे.
त्यामध्ये निंदा करण्यासारखे काहीच सापडत नाही.
याच्या आधाराने भक्त प्रसन्न, तृप्त व मुक्त होतात.
दुस्तर असा भवसागर पार करण्यासाठी हाच भक्तांचा
सेतु होतो. त्याला तनमनाने शरण गेले की भक्तांच्या
अंतःकरणात तो प्रकट होतो. मुक्ती प्राप्त होते.

यदा चर्मवदाकाशं वेष्टयिष्यन्ति मानवाः।
तदा देवमविज्ञाय दुःखस्यान्तो भविष्यति॥२०॥

आकाशाला जर कातड्याप्रमाणे लपेटून घेता आले,
आकाशाचे वस्त्र बनवता आले तर त्या परमदेवाला
न जाणता ही दुःखाचा अंत होऊ शकेल. त्रिविध
तापांचा अंत होऊ शकेल.
परंतु हे कठीण आहे. मात्र ते स्पष्टपणे न

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

सांगता अलंकारिक पद्धतीने सांगितले आहे. कारण आकाश हे सर्वांत सूक्ष्म आहे. त्याला स्थूल रूप देता येणे अशक्य आहे.

तो स्वतः सुखस्वरूप, आनंदस्वरूप आहे त्याला जाणणे म्हणजे त्याच्यामध्ये मिसळून जाणे. त्यात मिसळल्यावर कुठले दुःख? आपण आनंदस्वरूपच होऊन जातो.

तपः प्रभावात् देवप्रसादच्च ब्रह्म
ह श्वेताश्वतरोऽथ विद्वान्।
अत्याश्रमिभ्यः परमं पवित्रं
प्रोवाच सम्यगृषिसङ्घजुष्टम्॥२१॥

श्वेताश्वतर ऋषींनी तपाच्या प्रभावाने व ईश्वरकृपेने ब्रह्म जाणले. चारही आश्रमांच्या पलीकडे गेलेल्या परमहंसांना त्यांना उपदेश केला. ऋषिसमुदायाकडून सेविल्या गेलेल्या परम पवित्र ज्ञानाचा श्वेताश्वतर ऋषींनी उपदेश केला.

अत्याश्रमी - संन्यासाश्रमी.

श्वेत म्हणजे शुभ्र केवळ } हे दोन्ही ब्रह्म सांगण्याची
अश्वेत „ शबल ब्रह्म } क्षमता असणारे हे ऋषी.

Birthday / Anniversary

©www.madhavveeraghuveer.com

वेदान्ते परमं गुह्यं पुराकल्पे प्रचोदितम् ।
नाप्रशान्ताय दातव्यं नापुत्रायाशिष्याय वा पुनः ॥

अनधिकारी व्यक्तीच्या हातात ज्ञान पडले तर त्याचा दुरुपयोग होऊ शकतो. इतरांना नुकसान पोहोचू शकते. म्हणून पात्रता बघून ज्ञान द्यावे.
शेवटच्या पुनः शब्दाचा अर्थ नाहीतर (अन्यथा) असा घेतला तर पाप लागेल असा अर्थ होतो.

यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ।
प्रकाशन्ते महात्मनः ॥ २३॥

ज्याच्या हृदयात त्या परमदेवाबद्दल अत्यंत श्रद्धा आहे. तशीच श्रद्धा गुरुंवर आहे त्याच्या हृदयात हे ज्ञान प्रगटेल. उपनिषदातील गूढार्थ त्याला समजू लागतील. आणि ज्यांना कळतील त्यांच्या आचरणात आपोआप ते येऊ लागतील. श्रद्धेशिवाय ज्ञानप्राप्ति नाही.
श्रद्धावांल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः ।

© www.madhaveeraghuveer.com